साप्ताहिक
# माणूस

शनिवार । ३ ऑक्टोबर १९८१ । एक रुपया

# मोकाट पत्रकारितेला न्यायालयाची चपराक

पुण्याहून प्रसिद्ध होणाऱ्या साप्ताहिक सोबत-च्या १३ एप्रिल १९८० या अंकात अनिल थत्ते यांनी, लेखक रवींद्र पिंगे आणि साप्ताहिक माणूस यांच्यातील आर्थिक व्यवहारासंबंधी काही चुकीचा, गैरसमज निर्माण करणारा व बदनामीकारक मजकूर लिहिला होता. याबद्दल अनिल थत्ते यांनी दिलगिरी व्यक्त करावी अशी साधी अपेक्षा माणूसने बाळगली. परंतु थत्ते यांनी काहीच दाद न दिल्याने शेवटी थत्ते यांच्यावर खटला भरावा लागला. २४ सप्टेंबर ८१ ला या खटल्याचा निर्णय लागून अनिल थत्ते यांना कोर्टाने पूर्ण दोषी ठरवले व शंभर रुपये दंडाची शिक्षा दिली.

रवींद्र पिंगे यांनी थत्ते यांचा लेख प्रसिद्ध झाल्यावर सोबत साप्ताहिकाकडे खुलाशाचे पत्रही लगेच पाठवले. २–२॥ महिने उलटले तरी सोबतकारांनी पिंगे यांच्या या खुलाशाच्या पत्राला प्रसिद्धी दिली नाही. ती दिली असती तरी हा वाद चिघळून शेवटी थत्ते यांच्यावर जी नामुष्कीची पाळी आली ती आली नसती.

सोबतने खुलासा न छापल्याने पिंगे यांच्या परवानगीनेच हे खुलाशाचे पत्र माणूसने आपल्या २८ जून १९८० या अंकात प्रसिद्ध करून, पिंगे यांना काय म्हणावयाचे आहे, त्यांची याबाबत भूमिका काय आहे, हे त्यांच्याच शब्दात वाचकांसमोर ठेवले. पिंगे यांची कोणतीच तक्रार नसल्याने त्यांच्यापुरता तरी हा विषय तेव्हाच मिटला.

पिंगे यांचा हा खुलासा माणूसमधून प्रसिद्ध झाल्यावर सोबतकार पुढे सरसावले. त्यांनी 'माजगावकर, रवींद्र पिंगे–थोडा पंचनामा' असा सोबतच्या २० जुलै १९८० अंकात एक लेख लिहिला. या अंकात सोबतचे संपादक श्री. ग. वा. बेहेरे यांनी लिहिले– "सोबतमध्ये आलेला मजकूर अनिल थत्ते यांनी लिहिला नसून मीच लिहिला आहे, असेसुद्धा त्याचे उत्तरदायित्व मी स्वीकारतो. अर्थात खटल्यात मला आरोपी करणे क्रमप्राप्त आहे. अनिल थत्ते यांच्यावर म्हणजे पर्यायाने सोबतवर खटला भरण्यापूर्वी माजगावकरांनी मात्र दहादा विचार करावा. ज्या लेखकांचे पैसे द्यायचे राहिले असतील ते या निमित्त देऊन टाकून आपली पाटी स्वच्छ करावी. जे लेखक अनेकदा वेगवेगळ्या आर्थिक बाबींमुळे दुखावलेले आहेत ते आपल्या विरुद्ध साक्ष देणार नाहीत, याची खात्री करून घ्यावी. हे काम फार कष्टाचे आहे आणि खर्चाचेही आहे."

यावरून असे वाटले होते की, सोबतकारांना कोर्टकचेऱ्यांची, खटल्यांची, कायदेकानूची बरीच माहिती असावी. त्याशिवाय का एवढा दमदार उपदेश त्यांनी माणूसला केला ? पण कसले काय ? फार कष्टही पडले नाहीत. खर्चही बेताचाच झाला. माणूस विरुद्ध साक्ष देऊ नका असे एकाही लेखकाला सांगावे लागले नाही. पाटी मळलेली नव्हतीच. त्यामुळे ती मुद्दाम यानिमित्त स्वच्छ करण्याचा प्रश्नही आला नाही. सोबतकारांनी म्हटले, 'मला (बेहेऱ्यांना) आरोपी करणे क्रमप्राप्त आहे.' इतके ठामपणे ज्याअर्थी बेहेरे विधान करीत आहेत त्याअर्थी पुढेमागे बेहेऱ्यांनाही आरोपी करणे माणूसला भाग पडेल असे वाटत होते. पण इथेही बेहऱ्यांचे कायदेकानूविषयक ज्ञानाचे पितळ चांगलेच उघडे पडले. माणूसकडून जेव्हा त्यांना आरोपी करण्याबाबत काहीच हालचाल होईना तेव्हा, न राहवून, बेहेऱ्यांनीच 'मला या खटल्यात आरोपी करून घ्या' असा कोर्टाला अर्ज दिला. अर्ज वाचल्यावर कोर्टाने विचारले, 'तुमचे वकील कोण ? कुणाचा सल्ला घेऊन तुम्ही हा अर्ज केलात ? अशी काही तरतूद कायद्यात नाही. असली तर तसा संदर्भ द्या.' काही तरी गोलमाल उत्तर देऊन बेहेऱ्यांना वेळ मारून न्यावी लागली. अर्ज अर्थातच फेटाळला गेला व समोर बसलेल्या वकील

→

मंडळींचीही छानपैकी करमणूक झाली.
¤

२० जुलै १९८०च्या सोबत मधील उपरोक्त पंचनामा लेखात बेहेऱ्यांनी असेही लिहिले होते : "सोबत मधील लेखासाठी माझ्या कोणत्याही लेखकावर खटला झाला तरी तो माझ्यावरच झालेला आहे असे मी समजतो आणि त्याचा प्रतिकार करतो......यावेळेला अडचणीची एकच गोष्ट आहे की, अशा सर्व खटल्यात माझे मित्र मधुकर परांजपे यांची मला साथ होती. पण आता माणूसने मधुकर परांजपे यांच्याकरवीच कायदेशीर कारवाई करायचे ठरवले आहे म्हणून अडचण उत्पन्न झाली आहे..."

अॅडव्होकेट मधुकर परांजपे यानी बेहऱ्यांची अडचण ओळखली असावी ! एकदा खटल्याचे मुख्य कामकाज मार्गी लावून दिल्यावर त्यानी सौ. सुप्रिया सरवटे या नवीन व अभ्यासू वकिलांवरच युक्तिवाद करण्याची कामगिरी सोपवली. सौ सरवटे याचा युक्तिवाद इतका चागला झाला की, तो ऐकल्यावर आरोपी थत्ते यानाही आपण लिखाणात चूक केली असे क्षणकाल वाटून गेल्याचे, थत्ते यानीच नंतर परांजपे यांच्या चेंबरमध्ये सागितल्याचे समजले. सौ. सुप्रिया सरवटे यानी स्वच्छच सागितले की, " रवींद्र पिंगे याना पैसे मिळालेच नाहीत हे विधान साफ खोटे असल्याचे पुराव्याने सिद्ध झालेले आहे माणूस जगतो तो केवळ पैशावर किंवा अन्नावर नव्हे. त्याला त्याची प्रतिष्ठा, तेवढीच प्रिय असते. समाजानेही ती जपली पाहिजे. एखादा संपादक लेखकांना बुडवितो असे म्हणायचे, यापेक्षा बदनामीकारक अधिक ते काय असणार ? आणि तेही खोटे असताना! या लेखाचा मथळा पहा. तो काय सुचवितो? बदनामी करण्याच्या हेतूशिवाय ह्या लेखामागे काहीही हेतू नाही. माणसाने आयुष्यभर श्रम करून प्रतिष्ठा मिळवावी आणि कुणीही एकाने, लेखणीच्या एका बेजबाबदार फटक्याने तिला तडा द्यावा, हे कायद्याला मंजूर नाही. "

सुप्रीम कोर्टाच्या एका अलिकडच्या निकालाचा आधार देऊन अॅड. सरवटे यानी पुढे सागितले की, "पत्रकार किंवा लेखकाचे हक्क सामान्य माणसासारखेच आहेत. कोणा बाबतही विधान करावयाचे झाल्यास ते विधान सार्वजनिक हितासाठी आहे एवढे नुसते म्हणून चालणार नाही तर काय सार्वजनिक हित त्यामागे साभाळायचे आहे, हे देखील पुराव्याने शाबित केले पाहिजे. किंबहुना एखाद्या पत्रकाराने दुसऱ्यावर आरोप केले तर ते केवळ सत्य आहेत असे म्हणून चालणार नाही तर त्यात चारित्र्यहननाचा प्रकार नाही व सावधगिरीने लिखाण केले आहे, असे त्यानी दाखवले पाहिजे."

आरोपीचे वकील श्री अनिल गोगटे याचा युक्तिवाद यापुढे अगदीच पोकळ होता. अॅड. गोगटे यानी सागितले की, " ह्या मजकुरात बदनामीकारक काहीच नाही लेखक व संपादक आणि प्रकाशक याच्या संबंधात असे काहीतरी घडत असतेच खटला भरण्याइतके त्या गोष्टीला महत्त्व नाही आरोपी थत्ते आणि माजगावकराचे वाकडेही नाही तेव्हा बदनामी करण्याचा हेतू असेलच कसा? लेखक व संपादक दोघानीही काळजी घ्यावी असाच ह्या लिखाणामागे हेतू आहे "

पुण्याचे चीफ ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट श्री. व्ही. पी. पितळे यांच्या समोर हे खटल्याचे कामकाज चालू होते त्यानी दोन्ही बाजूचे म्हणणे तर शातपणे ऐकून घेतलेच पण ह्या खटल्याला वृत्तपत्राच्या दृष्टीने एक महत्त्व आहे, ह्या जाणीवेने अभ्यासपूर्वक निकालपत्र लिहिले आपल्या नऊ पानी निकालपत्रात न्यायमूर्तींनी, वार्ताहरानी लेखणी चालविताना केलेल्या आरोपाबाबत दक्ष राहणे कसे आवश्यक आहे, ह्याचा आग्रहपूर्वक उल्लेख केलेला आहे. निकालपत्रात पुढे म्हटले आहे : "आरोपीने केलेले लेखन हे कोणत्याही प्रकारची काळजी न घेता केलेले असून रवींद्र पिंगे याना त्याच्या लेखनाबद्दल पैसे मिळाले नाहीत, असे धादात खोटे विधान छापून टाकले आहे. आरोपीतर्फे केलेल्या उलट तपासणीत रवींद्र पिंग याना लेखनाचा मोबदला वेळेवर दिला नाही असे सुचवण्यात आले ह्यावरूनच पिंगे यांना पैसे मिळाले होते याची आरोपीला माहिती होती. रवींद्र पिंगे यानी माणूसमध्ये लिहिलेल्या पत्राचा आरोपीने आधार घेण्याचा प्रयत्न केला पण त्या पत्रात देखील पिंग्यानी पैसे मिळाल्याचेच मान्य केले आहे" सुप्रीम कोर्टाच्या निकालातील उतारा देऊन शेवटी न्यायमूर्तींनी म्हटले, "आरोपीने बेजबाबदारीने लिखाण केले आहे. ह्याच्यामागे काहीही सार्वजनिक हित दिसून येत नाही मात्र अशा खटल्यात सौम्य शिक्षा देणेच योग्य होईल. त्यामुळे १०० रू. दंड करीत आहे."
¤

पत्रकारितेत धीटपणा हवा. मोकळेपणाही हवा. पण मोकळेपणा, धीटपणा म्हणजे मोकाटपणा नव्हे अनिल थत्ते यानी असा मोकाटपणा केला म्हणून माणूसने याप्रकरणाची एवढी गंभीरपणे दखल घेतली. उगाच कोर्टकचेऱ्या लढवत राहणे यात माणूसला मुळीच रस नव्हता व नाही तसे असते तर सोबतकारांना हवे होते तसे त्यांचे नाव खटल्यात आरोपी म्हणून गुतवणे सहज शक्य होते त्यामुळे खटल्यात थोडा रंगही भरता आला असता. पण तसा काही उद्देशच नव्हता

मोकाट पत्रकारितेला शेवटी वाचकच आळा घालू शकतात. दुसऱ्यावर विनाकारण चिखलफेक करणारे लिखाण वाचकाना आवडते अशा समजुतीने काही लेखक–पत्रकार तसे लिखाण, कुठलीही तमा न बाळगता बिनधास्तपणे लिहित असतात व बहुतेक वेळा अशा लिखाणाची उपेक्षा करण्यावाचून इतर काही करणे शक्यही नसते. याचा अर्थ असे लिखाण करणारे लेखक–पत्रकार व असे लिखाण छापणारे सपादक तेवढेच शूर व झुंजार वगैरे असतात, बाकीचे सगळे भेकड व अपराधी असतात असा नसतो. पण प्रत्येक असत्याचा, बेजबाबदार विधानाचा प्रतिवाद करत राहणे, उत्तराला प्रत्युत्तर देणे शक्य नसते. म्हणून तर बेहेऱ्यांनी सोबतमधून केलेल्या पंचनाम्याला माणूसने त्यावेळी उत्तर दिले नाही. त्यातील प्रत्येक विधान खोडून काढणे मुळीच अवघड नव्हते. थत्त्यानी बेजबाबदारपणाचे, मोकाट पत्रकारितेचे अगदीच टोक गाठले त्यामुळे हा कोर्टकचेरीचा खटाटोप माणूसला करावा लागला. तो यशस्वी ठरला याचे माणूसला जरूर समाधान आहे

अर्थात थत्ते (बेहेरे) वर अपील करू शकतात. तसे झाले तर हा विषय येथे सपला असे होणार नाही. तसे न झाले व दिला तो निकाल स्वीकारून ही जोडगोळी स्वस्थ बसली तर माणूसच्या दृष्टीने हा विषय येथेच संपला आहे

—संपादक

# तुम्ही लग्न केलेत तेव्हा मांग, ढोर या जातीतल्या किती मुली पाहिल्यात?

कशावरून सुरुवात झाली ते लक्षात नाही; पण 'तो' म्हणाला, "चिटणीस, तुम्ही मला असं सांगा की, तुमच्या वडिलांनी तुमच्यासाठी बघताना, सी. के. पी. वगैरे सोडा, एकदम दलित जातीतला मुलगा बघितला का?"

"नाही. तसा विचारच मनात आला नाही. मी स्पष्ट सांगते, माझी तयारीही नाही." मी शांतपणे म्हटले.

'तो' उसळून म्हणाला, "आम्ही तेच म्हणतो. अशीच जातीयता आहे. खरी सुधारणा झालेली नाही."

"हो. खरंच. जातीयता आहेच. तुम्ही लग्न केलेत तेव्हा मांग, ढोर या जातीतल्या किती मुली पाहिल्यात?"— मी.

"नाही."

"का?"

"आई-वडिलांना पटायला पाहिजे ना!"

मी कुत्सितपणे हसले आणि म्हणाले, "अगदी अपेक्षित उत्तर दिलेत; पण माझी खात्री आहे—उत्तर खोटे आहे. आई-वडिलांची सबब सांगू नका. मी स्त्री असून ती सांगितली नाही. जेव्हा जेव्हा तुम्ही आंतरजातीय विवाहाचा विचार केला असेल—केला असणारच—तेव्हा तेव्हा तुम्ही तुमच्यापेक्षा वरच्या समजल्या जाणाऱ्या जातीतल्या मुलीचे—विशेषतः ब्राह्मण मुलीचे स्थळ पाहिलेत. फक्त त्याच बाजूने विचार केलात. मग जातीयता तुम्हाला फारच बोचायला लागली."....

असे सगळे रोखठोक, प्रामाणिक आणि स्वतःचे व दुसऱ्याचे बुरखे फाडायला न कचरणारे एक आत्मनिवेदन.
एका सवर्ण तरुणीचे.
सध्याची ज्वलंत सामाजिक समस्या
वैयक्तिक पातळीवर आणून तिचा वेध घेणारे.
दैनदिनीच्या स्वरूपातले.
सगळ्यांना अंतर्मुख करणारे....
एका ध्येयवादी दृष्टिकोनातून
समानतेकडे, समरसतेकडे
प्रवास करू इच्छिणारी
— नंदिनी चिटणीस.
तिचा प्रवास चित्रित करणारी लघुकादंबरी

# माणूस दिवाळी ८१

## लेखिका : विनया खडपेकर

## मुंबई वार्ता

# इतिहास–वस्तूंच्या उभारणीचा !

अतिपरिचयातूनच अवज्ञा सभवते असं म्हटलय ते काही खोटं नाही. मग तो अतिपरिचय मलयगिरीवरच्या चंदनकाष्ठाचा असो, नाही तर रोजच्या व्यवहारातल्या दुसऱ्या एखाद्या गोष्टीचा असो, 'माहीत असण्याचा' शिक्का एकदा बसला की मग अधिक ओळखीच्या वाटाही बंद होतात, नव-नवे तपशील ध्यानातही येत नाहीत. याचं उदाहरण घ्यायला फार लाब जायला नको. व्ही. टी स्टेशनशी निदान निम्म्या मुबईकराचा तरी रोजचा संबध येतो. पण या इमारतीकडे कोणी निरखून बघितलंय कधी ? तिची शान, तिचा राजेशाही थाट, तिच्या कळसावर दिमाखात बसवलेला आशादेवीचा पुतळा बघायला कुणाला फुरसतही नसते. तिकिटं काढायच्या दालनात सहज वर नजर टाकली तर काळसर निळचा रंगाचं, रात्रीच्या आभाळासारखं दिसणारं छत आणि त्यात चमकणाऱ्या चादण्या दिसतील. आणि केवळ व्ही. टी स्टेशनच नव्हे, फोर्टमधल्या जवळजवळ सगळ्याच इमारती म्हणजे म्युझियममध्ये माडलेल्या वस्तुच आहेत. त्या प्रत्येकीला इतिहास आहे. अर्वाचीन मुबईतल्या या वास्तुखुणा एवढ्या झपाट्यानं ऐतिहासिक ठरताहेत, की मुबईच्या या पुसत चाललेल्या, बदलत चाललेल्या रूपाचा आढावा घेणं मोठं मनोरजक ठरतं.

बॉम्बे लोकल हिस्टरी सोसायटीच्या एका सभेला उपस्थित रहाण्याचा नुकताच योग आला ही सोसायटी म्हणजे पारशी आजी-आजोबाचं शिळोप्याच ठिकाण. पारशी जमातीचं एकूणच मुबईवर अतोनात प्रेम. दुधाचे भडकते भाव आणि सीमाप्रश्न यावर जेवढ्या कळवळ्यान बोलावं, तशाच तन्मयतेनं इथले रुस्तुमअंकल आणि फ्रेनीआंटी एखाद्या इमारतीची तारीख, तिचं पूर्वीचं आणि आताचं स्वरूप अशा गोष्टीवर वाद घालत असतात. ही बूर्झ्वा किंवा हस्तीदंती मनोऱ्यातली वृत्ती झाली, अशी त्यावर टीका करता येईलही कदाचित, पण ही सारी आमची राष्ट्रीय ऐतिहासिक स्मारकं आहेत आणि या कितो तरी इमारती आजही मुबईकराच्या जीवनाचा जिवंत आणि आवश्यक भाग आहेत. मुबईचं सातत्य या इमारतींनी टिकवलं आहे. तेव्हा या इमारती जाणण, त्याची माहिती करून घेण हा मुबईच्या अस्मितेचा प्रश्न आहे

मुबईच्या इतिहासावर बोलणं हा श्री शां शं. रेग्यांचा हातखंडा गेली पंधरा वर्षं त्याचा या विषयाचा व्यासंग आहे आणि मुबईच्या इतिहासाचा ते अक्षरशः चालता-बोलता ज्ञानकोश आहेत. बॉम्बे लोकल हिस्टरी सोसायटीच्या सेमिनारच्या निमित्ताने त्यानी एकेक असे रंगतदार किस्से सुनावले की, समोरचा आपल्या खुर्चीत खिळून राहावा।

### पीर पेद्रोशहाचा पराक्रम

मुबईतल्या इमारती म्हणजे रेग्याच्या खास प्रेमाचा विषय. एफ. डब्लु. स्टीव्हन्स हा एक कल्पक वास्तुशास्त्रज्ञ मुबईला लाभलेला होता. त्यानं बाधलेल्या तीन इमारतीची गणना अजूनही मुबईतल्या महत्त्वाच्या इमारतीमध्ये केली जाईल. वास्तुकलेच्या दृष्टीनेही त्या महत्वाच्या खुणा–लँडमार्क्स–आहेत. व्हिक्टोरिया टर्मिनस, मुबई महानगरपालिका आणि पश्चिम रेल्वेचं कार्यालय ही स्टीव्हन्सची महत्त्वाची कामगिरी. या तीनही इमारतीत वास्तुकलेतली नवनवी शिखरं गाठलेली बघायला मिळतील व्ही. टी. स्टेशन आणि मुबई महानगरपालिका या दोन्ही ब्राउन स्टोनमधल्या इमारती. व्ही. टी. ची इमारत गॉथिक स्टाइलनं बाधलेली. एवढी मोठी आणि एवढी जुनी इमारत, पण प्लॅटफॉर्मवरच्या पत्र्याच्या छपरामधून कधी पाण्याचा थेंबही आत येत नाही. याचं रहस्य एका म्हाताऱ्या हमालानं सागितलं. पत्र्याला पत्रे जिथे जुळतात, त्याच्याखाली रुद आणि खोल पन्हाळी आहेत, आणि त्या पन्हाळी एक चार आणि आठ नंबरच्या प्लॅटफॉर्मवर जे पोकळ खाब आहेत त्यातून खाली सोडल्या आहेत. जिज्ञासूनी जाऊन खाबाच्या पोकळपणाची खात्री अवश्य करून घ्यावी. बाकी या छपराला कुठेही खाब नाहीत सपूर्ण इमारतीच्या वरच्या बाजूला झेप घेण्याच्या तयारीत असलेले प्राण्याचे लाबट आकाराचे पुतळे आहेत. आणि त्याच्या तोडातून गच्चीवरच्या पाण्याचा निचरा व्हावा, म्हणून पाइप बाहेर काढले आहेत. स्टेशनच्या आत काही मोरांची शिल्पं, आणि त्या वेळच्या प्रख्यात माणसाचे पुतळे आहेत. आज जिथे टॅक्सीगेट आहे त्या बाजूच्या इमारतीच्या एका भागात,

**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकविसावे

अंक : अठरावा

३ ऑक्टोबर १९८१

किंमत : एक रुपया

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी ।

चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

जमिनीत छोटं तळघर आणि त्याला ट्रॅप-दरवाजा आहे. पूर्वी तिथे सर्व स्टेशनावरच्या तिकिटविक्रीची रक्कम जमा करण्यासाठी खिडकी होती. त्या वेळी ठग, पेंढारी वगैरे लुटारूंचं प्रमाण बरंच होतं तेव्हा कुणी दरोडा घालायच्या हेतूनं आला, तर कॅशियरनं हातान सारे पैसे जमिनीवर लोटावे आणि ट्रॅप दरवाजा केवळ पायान दाबून ते सुरक्षितपणे तळघरात जाऊ द्यावे, अशी ही योजना ! व्ही. टी. स्टेशन आणि सेन्ट जॉर्ज हॉस्पिटल याच्यामध्ये एक पीर आहे सरकारी जमिनीवर हे अतिक्रमण कसं झालं आणि ते कस चालू राहिल ? याचीही एक कथा आहे. व्ही. टी स्टेशन बांधलं ते आजू-बाजूचे दगड आणि खडक फोडून त्याच्यातच हा पीरही होता. पण त्या पीरानं–पेद्रोशहानं मुकदमाच्या स्वप्नात येऊन सांगितल की, गेली तीनशे वर्षं मी इथं आहे, आता मला कुठे घालवतोस ? युरोपियन इंजिनियरनं हे ऐकलं, तेव्हा हे थडगं फोडण्यासाठी त्यान भायखळ्याहून मजूर आणवले, पण त्यांनीही हे काम करायला नकार दिला युरोपियन इंजिनियरलाही मग कुदळ मारायचा धीर होईना, आणि आजही पीर होता तिथेच राहिला आहे !

आजचं भव्य व्ही. टी. स्टेशन बांधण्याआधी इथे केवळ खडक होते आणि स्टेशनच्या नावाखाली होती पत्र्याची शेड ! शिवाय याच परिसरात खाटिकखानाही होता इथली घाण आणि गलिच्छपणा थेट आजच्या झोपडपट्टीसारखा ! तेव्हा व्ही टी. ला गाडीत बसणारी माणसं म्हणजे फक्त थर्डक्लासचे प्रवासी. ( आणि हा थर्डक्लाससुद्धा फर्स्टक्लास, सेकंडक्लास, इंटर आणि थर्डक्लास या क्रमाकातला सर्वांत शेवटचा.) युरोपियन आणि नेटिवसाहेब गाडीत बसत ते भायखळ्याला.

मुंबईतली दुसरी महत्त्वाची इमारत महापालिकेची खरं म्हणजे ही इमारत दोन रस्त्यामधल्या वेडयावाकडया त्रिकोणी जागेत आहे; पण स्टीव्हन्सचं कौशल्य एवढं की, या उणीवेचच त्यान वैशिष्टय केलं आहे. पहिली हैड्रॉलिक लिफ्ट या इमारतीत वापरात आली. त्याच्या पाण्याच्या प्रचंड टाक्या अजूनही या इमारतीच्या गच्चीवर दिसतील. पश्चिम रेल्वेच कार्यालय, कोर्टाची इमारत या साऱ्या, ज्याला 'ब्लू स्टोन' म्हटल जात अशा काळसर निळ्या दगडाच्या इमारती. पश्चिम रेल्वेची इमारत हे मुसलमानी बांधकामपद्धतीचं प्रातिनिधिक उदाहरण आहे या इमारतीची सजावट घुमटानी केली आहे आणि कुठूनही पाहिलं तरी सहा घुमट दिसावेत अशी त्याची रचना आहे.

इमारतीच्या वयाचा अंदाज, त्याच्या बांधकामाला काय साहित्य वापरलं आहे यावरूनही करता येतो. चुना आणि विटांनी बांधलेल्या इमारती १८६० पूर्वीच्या. नतरच्या सर्व महत्त्वाच्या सार्वजनिक इमारती दगडीच आहेत. कारण तेव्हाच्या गव्हर्नरनं याबाबत तसे कडक निर्बंध लादलेले होते विटा आणि चुन्याने बांधलेल्या दोन देखण्या इमारती म्हणजे टांकसाळ आणि टाउन हॉल. टाउन हॉलचा काही भाग एशियाटिक सोसायटीला वार्षिक एक रुपया भाड्यानं दिला आहे ! टाउन हॉलचं रूप अगदी साधं पण भव्य सरळ, रेखीव रेषा, भौमितिक आकार उठून दिसणाऱ्या प्रशस्त पायऱ्याचा जिना उंचच उंच छत ही टाउन हॉलची वैशिष्टय. अशा इमारती आपण बघतो त्या 'क्लिओपेट्रा', नाही तर 'टेन कमांडमेंटस'सारख्या जुन्या, इजिप्शियन, रोमन काळच्या चित्रपटात एखाद्या रॅमसिसच्या राजवाडयाची आठवण करून देईल अशी ही इमारत खास ग्रीको–रोमन शैलीतली आहे. हॉर्निमन सर्कलच्या बाजूला असलेल्या सेंट थॉमस चर्चची बांधणीही याच थाटाची !

खाजगी वसाहतीमध्ये आपल्या सौंदर्यानं उठून दिसतो तो टाटा पॅलेस. याच्या अर्ध्या भागात आज स्टर्लिंग चित्रपटगृह आहे पॅलेस या नावाला शोभावी अशी ही विटा आणि चुन्याची वास्तू १८६० पूर्वीची. टाटा पॅलेसच्याच रांगेत पुढे 'एक्स्पलनेड हाउस' आहे हेही टाटाचंच निवासस्थान. ब्राउन स्टोनमधल एक्स्प्लनेड हाउस म्हणजे अस्सल खानदानी रुबाब ! या इमारतीच्या आवारात एक सेंट बर्नार्ड कुत्र्याचा पुतळा आहे. सेंट बर्नार्ड जातीच धिप्पाड क्रौर्य या पुतळयात एवढ हुबेहूब उतरल आहे, की अपरिचित माणसाला धडकीच भरावी ! या घरात जेव्हा टाटा कुटुंबीय रहात, तेव्हा आजूबाजूच्या परिसरात दुसरं घरच नव्हतं ! रात्रीच्या वेळी सारा परिसर निर्जन होऊन जाई फक्त समोरच्या चौपाटीवर येऊन धडकणारा समुद्र ! सोबतीला, आज जिथे ओवरसीज कम्युनिकेशन टॉवर आहे त्या जागी असणारा, गॅसवत्त्याच्या प्रकाशातला राणीचा पुतळा ! अशा भयाण एकटेपणात सोबतीला, राखणीला असायचे ते इमानदार आणि उग्र सेंट बर्नार्ड कुत्रे. त्याच्यासाठी हे कृतज्ञेच स्मारक आहे !

## अशी घरं, अशी व्यक्तिमत्त्वं

गिरगावातलं एक घरही असच उल्लेखनीय. आज त्याचा मागमूसही नाही म्हणा ! हे घर होतं जगन्नाथ शंकर मुरकुटयाचं या नावानं काही बोध झाला नसेल तुम्हाला ! कारण या मुरकुटयाचं व्यवहारातल प्रचलित नाव होतं नाना शंकरशेट. त्याचा वाडा प्रचड ! वाडयाच्या दिवाणखान्यात सहा झुंबरं होती. एवढी मोठी की, एकेक झुंबर कवेत मावू नये ! झुंबराच्या वर आठ आणि खाली बारा दिवे लागायचे अशी सहा झुंबर जिथे लागतात, तो दिवाणखाना केवढा भव्य असेल याची कल्पनाच केलेली बरी ! नानाच्या वाडयाच्या बाहेर, जहांगिराच्या राजवाडयाबाहेर असे तशी मोठी घंटा होती. त्यांना कुणी भेटायला आलं, म्हणजे पहारेकरी ती घंटा वाजवत असे आणि नाना त्या व्यक्तीला येऊन भेटत. त्याची शान आणि त्यांचा मान एवढा असे की, त्या वेळी केवळ गव्हर्नर आणि आणि नाना या दोनच व्यक्तींना आपल्या गाडीला दोन घोडे जोडायची परवानगी होती ! दोन घोडयाच्या या गाडीतून, आपल्या लवाजम्यानिशी मोठ्या रुबाबात चाललेली नानाची स्वारी हा तत्कालीन गिरगावकराच्या कौतुकाचा आणि आदराचा विषय होता.

परळला आज जिथे हाफकिन इन्स्टिटयूट आहे, त्या इमारतीत पूर्वी गव्हर्नरचं निवासस्थान होतं. (परळ नाव आलं ते तिथे असलेल्या परळी वैजनाथाच्या देवळावरून ) घर सुंदर, पण आजूबाजूला दलदल आणि घाण ! मलेरिया आणि अन्य रोगाचा एवढा प्रादुर्भाव की, तिथे कुणी टिकायच नाही यावर एका युरोपियनान 'टू समर्स' या नावाच पुस्तकही लिहिल आहे दोन उन्हाळयावर तिसरा उन्हाळा तिथे कुणा साहेबानं कधी पाहिलाच नाही ! एक माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन तेवढा आपल्या विद्याव्यासंगासमवेत तिकडे मजेत राहिला.

# मी आलेय मिंटी
# एक खारोटी



स्वभाव माझा जागरूक,
वृत्ती माझी संचयी,

चालणे माझे चपळ
वागणूक माझी निगर्वी.

सेतुबंधनात आपला वाटा उचलून
रामाचा आशीर्वाद मिळवलेली

आजही थोरा–मोठ्यांचे
आशीर्वाद असेच आहेत पाठीशी.

माझं घर होतं दूर रानात
झाडांच्या ढोलीत

आता मात्र माझं घर खेड्यात, शहरात
महाबँकेच्या शेकडो शाखांत

मी आलेय मिंटी
मी म्हणजे–महाबँक

**★ बँक ऑफ महाराष्ट्र ★**

[ भारत सरकारचा उपक्रम ]

मुख्य कचेरी : ‘ लोकमंगल ’, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

आणखी एक मनोरंजक तपशील. राणीच्या बागेत आज एक उंच, भव्य दिवा बघायला मिळतो. त्या दिव्याचा भला मोठा, संगमरवरी पाया जमिनीत बुजवून टाकला आहे; पण या पायावर एक नोंद आहे-' झिरो माइल्स '! ही नोंद कसली? पूर्वी, तेव्हाच्या धोबी-तलावाजवळ आणि आजच्या मेट्रो सिनेमाजवळ हा दिव्याचा खांब ठेवलेला होता. मात्र तो दिवा कधीच पेटवला गेला नाही! धोबी-तलावाजवळ किल्ल्याची-फोर्टची हद्द संपायची आणि नागरी हद्द सुरू व्हायची. तेव्हा ही नागरी मुंबई मोजायची ही खूण-झिरो माइल्स. यापुढची अशीच एक खूण, अशाच दगडावर केलेली सापडते भायखळ्याच्या वोल्टास आगाराजवळ-फोर माइल्स एक माहिम आणि वांद्र्याच्या मध्ये-नाइन माइल्स. एक खूण सायन किंवा शीवला-मुंबईच्या शिवेजवळही सापडते

कार्यक्रमाच्या ओघात उपस्थित सभासदांनीही काही इंटरेस्टिंग माहिती पुरवली. मुंबईचं टेलिफोन एक्स्चेंज जेव्हा १९२३ साली सुरू झालं तेव्हा ते अगदी नमुनेदार होतं. क्षमता १५,००० ची; पण ती ३०,००० पर्यंत वाढवण्याचीही सोय होती. आशियातलं सर्वांत मोठं आणि जगातलं दुसऱ्या क्रमांकाचं असं हे एक्स्चेंज होतं. पहिला नंबर होता न्यूयॉर्क टेलिफोन एक्स्चेंजचा. त्या वेळेला लंडनला तार करून त्याचं तारेनं उत्तर मिळायला केवळ साडेसात मिनिटं लागत. आज मुंबईत सात आकडी फोनसुद्धा आला आहे; पण सगळ्याच टेलिफोन एक्स्चेंजची अवस्था असून अडचण आणि नसून खोळंबा, अशी झाली आहे. एका गजबजत्या शहरातलं ते 'मेसेंजरी इविल' आहे एवढंच!

बोलता बोलता गोष्ट निघाली मुंबईतल्या भूतबंगल्यांची. खरं म्हणजे आज मुंबई एवढी गजबजलेली आहे, की भुतं वगैरे तडी-पारच झाली असावीत, पण घरांना दंतकथा मात्र चिकटून आहेत. फोर्टातलं एक घर कायम बंद दिसणारं, गूढ वाटणारं तिथून प्रकाशाची रेघही कधी दिसणार नाही. याचं रहस्य म्हणजे तिथे चालणाऱ्या 'फ्री मॅसन' नामक संघटनेच्या गुप्त बैठका! कुणाला पत्ता लागू नये म्हणून त्यांनीच हे घर बंद ठेवून, काळे पडदे लावून पक्का बंदोबस्त केला आणि बघता बघता तो लोकांच्या नजरेत भूतबंगला ठरला!

नाना शंकरशेटांच्या घरातही नानांचा आत्मा तिथे वावरतो वगैरे दंतकथा पसरल्या होत्या. यामागचा संदर्भ मात्र फार करुण आहे. आपल्या समृद्ध यशस्वी जीवनाच्या शेवटी नानांवर अगदी फुटकळ आळ आला-काही लुटारू पेंढाऱ्यांना आसरा दिल्याचा! त्यातून त्यांची निर्दोष सुटकाही झाली; पण काही तांत्रिक कारणासाठी एक पैसा दंड झाला. हा आघात असह्य झाला आणि रात्री हिरकणी खाऊन नानांनी जीवनाचा अंत केला! एका उत्तुंग व्यक्तित्वाचा असा दुर्दैवी शेवट मनाला चटका लावणारा आहे!

—ललिता बर्वे

---

# इंडोनेशिया

## एका लेखकाची गळचेपी

वा. दा. रानडे

पंतप्रधान श्रीमती गांधींनी कॉमनवेल्थ पंतप्रधान परिषदेसाठी कॅनबेराला जाताना इंडोनेशियाला भेट दिली आणि अध्यक्ष सुहार्तो यांच्याशी बोलणी केली. अशा भेटीच्या वेळी दुसऱ्या देशातल्या प्रतिकूल गोष्टींबद्दल काही बोलावयाचे नसते, असा शिस्तसंमत संकेत आहे. दोन देशांचे सहकार्य वाढण्याच्या दृष्टीने हा संकेत योग्यच आहे; पण याचा अर्थ त्या देशातल्या प्रतिकूल घटनांबद्दल कधीच काही लिहू नये असा नाही.

लोकशाहीच्या पुरस्कर्त्यांनी लोकशाहीवर, नागरी स्वातंत्र्यावर आणि मूलभूत हक्कांवर जथे जेथे निर्बंध घातले जातात तेथे तेथे त्याचा निषेध केला पाहिजे. इंडोनेशियात एका लेखकाच्या लेखनस्वातंत्र्याची कशी गळचेपी चालू आहे त्याकडे मला येथे लक्ष वेधावयाचे आहे या लेखकाचे नाव प्रमोद्य अनंत टोअर. इंडोनेशियातील हे सर्वांत लोकप्रिय लेखक. त्यांच्या पुस्तकांचा खप सर्वांत जास्त आहे. 'बुमी मनोशिया (ही 'धरित्री मानवाची), ही त्यांची सर्वांत जास्त गाजलेली कादंबरी. तिच्या चाळीस हजार प्रती खपल्या. इंडोनेशियाच्या इतिहासावर चार कादंबऱ्यांची एक माला लिहिण्याचे त्यांनी योजले असून त्यापैकी ही पहिली कादंबरी आहे. इंडोनेशियन स्वातंत्र्य-लढ्याच्या इतिहासावर ती आधारलेली आहे. स्वातंत्र्य-चळवळ केव्हा सुरू आली याबद्दल डच इतिहासकारांनी जे लिहिले आहे त्याहीपूर्वी ही चळवळ सुरू झालेली आहे, असे प्रमोद्य यांना वाटते त्यांच्या या कादंबरीच्या पाच आवृत्त्या निघाल्या यावरून तिच्या लोकप्रियतेची कल्पना येईल; पण या कादंबरी मालिकेतील दुसरी कादंबरी 'अनकसेमुआ बंगसा' (बालक सर्व जगाचे) प्रसिद्ध झाली तेव्हा सरकारचा त्यांच्यावर रोष झाला. या दोन्ही कादंबऱ्यांना बंदी करण्यात आली व त्या ज्यांनी विकत घेतलेल्या असतील त्यांनी त्या सरकारकडे आणून द्याव्यात, असा हुकूम सरकारने काढला. चाळीस हजार प्रतींपैकी फक्त १९५० प्रती सरकारकडे परत आलेल्या आहेत. याचा अर्थ लोकांनी ही बंदी झुगारली आहे. रेल्वेगाड्यांतून ही कादंबरी अजूनही उघडपणे वाचली जाते.

आजच्या काळातील श्रेष्ठ दर्जाचा प्रतिभाशाली लेखक म्हणून प्रमोद्य यांची जगात

ख्याती आहे. एका जर्मन लेखकाने तर नोबेल पारितोषिकासाठी त्याचे नाव सुचविले असल्याची बातमी आहे त्याच्या या गाजलेल्या कादंबरीचे फ्रेंच, जर्मन, डच, रशियन, चिनी व जपानी भाषात भाषांतर झाले आहे इंग्रजीत त्याच्या पूर्वीच्या एका कथासंग्रहाचे भाषांतर झालेले आहे; पण या कादंबरीचे अजून झालेले नाही. त्याचे प्रकाशक त्या दृष्टीने प्रयत्न करीत आहेत.

प्रमोद्य यानी ही कादंबरी तुरुंगात लिहिली. इंडोनेशियात १९६५ साली जो उठाव झाला त्यानंतर प्रमोद्य यांना चौदा वर्षे स्थानबद्ध करण्यात आले. त्याच्यावर कोणताही आरोप ठेवला नाही किंवा खटलाही भरला नाही. स्थानबद्धतेचा बराचसा काळ त्यांना बुलबेटावरील तुरुंगात काढावा लागला. हे बेट मुख्य इंडोनेशियन बेटसमूहाच्या उत्तरेस आहे हे निर्जन बेट आहे. कारण माणसानी वसती करण्यास योग्य असे येथील वातावरण नाही; म्हणूनच राजबद्याची, कैद्याची रवानगी येथे केली जाते प्रमोद्य याना तुरुंगाधिकाऱ्यानी सुरुवातीच्या काळात लेखनासाठी पेन व कागदही दिले नाहीत आणि दिले असते तरी लिहिणार केव्हा ? सकाळी सहा ते सध्याकाळी सहापर्यंत त्यांना शेतात राबावे लागले. तुरुंगात अशा प्रकारे आठ वर्षे काढल्यानंतर इंडोनेशियाचे अंतर्गत सुरक्षा प्रमुख सुमिको यानी त्यांना लेखनसाहित्य वापरण्याची परवानगी दिली. त्यानंतर मुक्ततेपर्यंतच्या सहा वर्षांच्या काळात प्रमोद्य यानी सात कादंबऱ्या लिहिल्या. याशिवाय एक नाटकही लिहिले हे सारे लेखन त्यानी रात्री केले. रोज बारा तास काम केल्यानंतर लेखनासाठी उत्साह कसा राहणार ? पण प्रमोद्य याना अंतरीच्या ऊर्मी स्वस्थ बसू देत नव्हत्या म्हणून रात्री जागून त्यानी हे लेखन केले; पण ते प्रसिद्ध झाल्यावर प्रमोद्य सरकारच्या रोषास बळी पडले.

सरकारचा रोष व्हावा असे या कादंबरीत काय आहे ? वंदीहुकमात ॲटर्नीजनरल इस्माइल सालेह यांनी म्हटले आहे, 'ही दोन्ही पुस्तके लेखकाने फार कौशल्याने लिहिली आहेत. ऐतिहासिक माहिती देताना त्याने लक्षात येणार नाही अशा पद्धतीने मार्क्स–लेनिनच्या शिकवणीचा प्रसार त्यातून केला आहे. 'आक्षेपार्ह मजकुराचा एकादा उतारा तुम्हाला दाखविता येईल का ?' असे सालेह याना एका वार्ताहराने विचारले असता ते म्हणाले, 'सबंध पुस्तकातच मार्क्सवादाचा प्रभाव प्रच्छन्नपणे दिसून येतो. त्यातून काही भाग वेगळा काढणे अशक्य आहे.'

आपण कधीच कोणत्याही राजकीय पक्षाचे सभासद नव्हतो असे प्रमोद्य यानी सांगितले; पण पोलिसानी त्यांचा जाब-जबाब घेतला त्यात आपण इंडोनेशियन कम्युनिस्ट पक्षाचे सभासद होतो असे त्यानी म्हटले आहे. पोलिसानी जबाब दडपणाखाली घेतला काय असा प्रश्न यातून उपस्थित होतो तुरुंगातील छळाचा परिणाम त्याच्यावर झाला होता. 'चौदा वर्षांच्या कारावासाने झालेली जखम कधीच भरून येणार नाही !' अशा शब्दात त्या परिणामाची तीव्रता त्यानी व्यक्त केली; पण या साऱ्या कटु अनुभवातून त्याच्यात कटुता आलेली नाही. अनेक शतकाच्या परकीय गुलामगिरीतून मुक्त होऊन आपला देऊ स्वत चे स्वतंत्र अस्तित्व प्रस्थापित करू लागला आहे, आपल्याला झालेला तुरुंगवास म्हणजे राष्ट्रीय घडामोडीचाच एक भाग आहे असे ते मानतात.

प्रमोद्य आपण कोणत्याही राजकीय पक्षाचे नाही असे म्हणत असताना ते कम्युनिस्ट असल्याचा शिक्का त्याच्यावर सध्याची राजवट मारीत आहे याचे कारण या राजवटीला त्याचा विरोध आहे. या वरोधाच्या खऱ्या कारणापासून लोकांचे लक्ष दुसरीकडे वेधण्यासाठी आणि त्याच्याबद्दल प्रतिकूल मत निर्माण करण्यासाठी त्याना कम्युनिस्ट ठरविण्यात येत आहे. ते खरोखर कट्टर कम्युनिस्ट असते तर त्याच्या कलाकृतीत प्रचारकी सूर दिसला असता आणि नोबेल पारितोषिकासाठी त्याची शिफारस झालीच नसती आणि कम्युनिस्ट देशांनी त्यांच्या साहित्याचा गौरव करून त्याना लेनिनपारितोषिक दिलेही नसते. तसे घडलेले नाही याचा अर्थच ते कम्युनिस्ट नाहीत. कम्युनिस्ट विचारप्रणाली व्यापक अर्थाने त्याना पटत असेल; पण ते कम्युनिस्ट पक्षाला बाधलेले नाहीत

आशियातील देशाशी, तेथील साहित्यिकाशी आपणास निकटचे संबंध प्रस्थापित करायचे असतील, सहकार्य वाढवायचे असेल तर त्यांच्या भाषा आपण शिकल्या पाहिजेत. तेथील चांगल्या साहित्याचा आपल्या भाषात अनुवाद केला पाहिजे, प्रमोद्य याच्या कादंबरीचे इंग्रजीत भाषांतर झालेले नाही म्हणून त्याच्या साहित्याशी आपला परिचय नाही. इंग्रजीवर आपण किती अवलंबून आहोत याचे हे निदर्शक आहे. या कादंबरीचे ज्या इतर भाषांत भाषांतर झाले आहे त्या अवगत असणारांनी, मराठीत, हिंदीत तिचा अनुवाद करायला हवा. □

## वर्गणीदारांसाठी सूचना

वर्गणीदारांना दिवाळी अंक वर्गणीतच दिला जातो. ज्यांना दिवाळी अंक रजिस्टर्ड पोस्टाने पाहिजे असेल त्यांनी १५–१०–८१ पूर्वी तीन रुपये पाठवावेत.

अंक व्यवस्थित मोजून पोस्टाच्या ताब्यात दिले जातात. तरीही अंक न मिळाल्यास प्रथम स्थानिक पोस्टाकडे चौकशी करावी. तेथे लेखी तक्रार द्यावी व तक्रारीची एक प्रत आमच्याकडे पाठवावी. अंक शिल्लक असल्यास अवश्य पाठवू.

ज्याची वर्गणी १० ऑक्टोबर किंवा त्यासुमारास सपली असेल व ज्यांची पुढील वर्षाची वर्गणी जमा नसेल त्यांना दिवाळी अंक पाठविला जाणार नाही.

जे वर्गणीदार कार्यालयातून दिवाळी अंक नेणार असतील त्यांनी १५–१०–८१ पूर्वी तसे कळवावे.

–व्यवस्थापक, माणूस

## उत्तरमीमांसा : २५ :

**स. शि. भावे**

# व्यवहार आणि सत्याग्रह

काल गांधीजयंती.

या निमित्ताने अनेक आठवणी आणि अनेक प्रश्न मनात आले. आजच्या परिस्थितीत गांधीजी असते, तर त्यांनी काय केले असते असा प्रश्न मनात आला आणि जयप्रकाशाप्रमाणेच त्यानी न्यायासाठी आदोलन उभारले असते असे त्या प्रश्नाचे नि:सदिग्ध उत्तर तावडतोब मिळाले

'उत्तरमीमासे'त पूर्वी विचारलेले प्रश्न विशेष तीव्रतेने जाणवले 'नित्य विधायकतेची प्रेरणा सामान्य माणसाना कशी मिळते?'—असा प्रश्न उत्तरमीमासा : २ मध्ये विचारला होता. अलीकडेच, 'छोटी माणसे स्वत:पेक्षा मोठी कामे कशी करू शकतात?' (उत्तरमीमासा : २३) आणि 'स्वच्छ लोकानी, उर्मटपणाने वागवणाऱ्या अस्वच्छ लोकाच्या मनातून आक्रमकवृत्ती कशी दूर करावी?' (उत्तरमीमासा : २४)—असे प्रश्न विचारले होते.

गाधीजीजवळ या प्रश्नाची कोणती उत्तरे आहेत? ती उत्तरे कितपत परिणामकारक आहेत? असा विचार काल, गाधीजयंतीच्या निमित्ताने, अधिक ठळकपणाने मनात आला.

विधायकतेच्या प्रेरणेबद्दल गाधी म्हणतील की ही प्रेरणा खरे म्हणजे प्रत्येकात असतेच. यावर जर विचारले, की मग, ही विधायकता सर्वांच्या वर्तनात सारखी का दिसत नाही? तर ते उत्तरतील की सर्वजण निरनिराळ्या कारणानी भ्यालेले असतात, म्हणून ही विधायकता प्रत्येकाच्या मनात कमी-अधिक प्रमाणात दडपलेली असते. म्हणून विधायकतेसाठी अभय हा गुण हवा. पूर्ण अभय कोणाजवळ असेल? तर नि:स्पृहाजवळ म्हणून अपरिग्रह

सामान्य माणसाकडून प्रश्न येईल, 'का हो, ही दिशा आदर्शाकडे जाते, आमच्या सर्वसामान्य व्यवहारात या दिशेचा काय उपयोग? आपण काही व्यावहारिक गुणाच बोलू या!'

मला हा प्रश्न रास्त वाटला, महत्त्वाचाही वाटला गाधींच्या तत्त्वाचा व्यवहारात उपयोग होतो का? होऊ शकेल का? म्हटले, विचारी, अनुभवी मित्राना विचारून पाहू या!

¤

एका समजस, विचारी मित्राला विचारले.

तो म्हणाला, 'सत्याग्रहशास्त्राचा आणि तत्राचा व्यवहारात उपयोग होतो इतकेच नव्हे, तर सत्याग्रहाचाच व्यवहारात उपयोग होतो. मात्र आपल्याजवळ सयम हवा, सहिष्णुता हवी, कितीही काळ वाट बघण्याइतका धीर हवा!'

'हे पुन्हा आदर्शवादाकडे जाणं झालं,' मी म्हणालो, 'व्यवहाराचं काय?'

मित्र शात होता. म्हणाला, 'तेच सांगतोय मी,' जरा धीर धर. माझी हकीकत ऐक...महिन्यापूर्वीच मी सिंहगडन मुबईहून आलो शिवाजीनगरला उतरलो पुरता अंधारही पडला नव्हता. जवळ-दूर अशा दहा-बारा रिक्षा होत्या; पण आत गिऱ्हाईक बसून रिक्षा चालती होते आहे, असं दिसेना. जवळ जाऊन पाहिलं तर मामला नेहमीचा. रिक्षावाला विचारी, 'कुठं जायचं?' गिऱ्हाईक समजा म्हणालं, 'मॉडर्न हायस्कूल' तर रिक्षा नाही.

'स्त्रिया असोत, मुलं-बाळ असोत, जड सामान असो, प्रकार हाच; मग विचार केला. आपणच काही तरी करायला पाहिजे. पण नेमकं काय करायचं? मारामारी? नाही मारामारीन कोणताच प्रश्न सुटत असा नाही, म्हणून मारामारी नाही; पण रिक्षावाल्याची दंडेली तर चालता कामा नये. मग सत्याग्रहानं वागायचं ठरवलं.'

'म्हणजे नक्की काय केलंस?' माझं कुतूहल वाढल होत. रिक्षावाल्याशी याने सत्याग्रह केला म्हणजे काय केलं असेल?

'एका रिक्षाशी गेलो,' मित्र सागू लागला विचारलं, 'रिक्षा खाली आहे का?'

तशी त्यानं विचारलं, 'कुठ जायचं?'

मी म्हटल, 'मी विचारलयं, रिक्षा खाली आहे का? हो का नाही ते सागा रिक्षावाले. आत बसल्यावर कुठं जायच ते सागेन!'

'या माझ्या पवित्र्यान तो प्रथम दचकला. नंतर खूप रागावला. म्हणाला, 'रिक्षा खाली नाही!'

त्यावर मी शातपणे रिक्षात बसलो. म्हणालो, 'रिक्षा खाली आहे. कारण मीटरचा बावटा वर आहे.'

'बावटा वर असला म्हणून काय झालं? मला यायचं नाही!'—रिक्षावाला. आता तो पुरता चिडला होता

'रिक्षा सार्वजनिक ठिकाणी उभी आहे. बावटा खाली नाही की आडवा नाही. चागला उभा आहे. याचा अर्थ तुझी रिक्षा गिऱ्हाइकासाठी मोकळी आहे. अर्थात तुला नाही म्हणता येणार नाही!' मी त्याला माझा प्रवाशाचा हक्क नीट शातपणाने समजावून सागितला'

मित्र आता सागण्याच्या रगात आला होता. म्हणून मीही मधे काही न बोलता ऐकत राहिलो. मित्राची गोष्ट चालू होती...

'माझ्या शातपणान रिक्षावाला बहुधा दमला असावा. मी जी 'भूमिका' म्हणून माडत होतो, तो बहुधा त्याला पीळ वाटला असावा. त्यानं दांडा ओढून इजिन सुरू केलं आणि विचारलं,

'कुठं जायचं?'

'बावटा खाली टाका म्हणजे सागतो'

'बरं' असं वैतागानं म्हणून त्यानं बावटा खाली केला. पुन्हा विचारल, 'कुठं घेऊ?'

'आधी डेक्कन जिमखाना पोलिसठाण्यावर. नंतर कर्वेरोडच्या आपल्या घरी!' मित्रानं सागितलं.

'पोलिसस्टेशनवर काय काम?' त्यानं गुरकावून विचारलं

'तो तुमचा प्रश्न नाही. पोलिसठाण्यावर माझं काम आहे ते ठिकाण पुणे हद्दीत आहे. येथून जवळ आहे रस्ता चागला आहे. तुम्हाला मी सांगेन त्या ठिकाणी रिक्षा

न्यायला हवी !' मित्राने पुन्हा शांतपणे स्वतःची भूमिका मांडली.

'पोलिसा-बिलिसाकडे काही आपण येणार नाही.' असं म्हणून रिक्षावाल्याने इंजिन बंद केलं हाताची घडी घालून तो बसला.

'हे पहा, तुम्ही जितका वेळ थांबायचं तितकं थांबा. नंतर मात्र पोलिसठाण्यावर न्या !' मित्र शांतपणे मागे रेलून बसला आणि पुन्हा हळूच म्हणाला, 'या थांबण्याचा वेटिंग चार्ज मात्र मी देऊ लागत नाही कारण तुमच्या कारणासाठी तुम्ही थांबला आहात आणि हो चढत्या मीटरकडे माझं लक्ष आहे.'

एव्हाना त्या रिक्षाभोवती कडं जमा व्हायला सुरूवात झाली होती. दोन-तीन इतर रिक्षावाले, जवळच्या मद्रासी हॉटेलमधले तीन चार वेटर, एक हातगाडीवाला, दोन बस कंडक्टर, तीन-चार भिकारी आणि जाता येता थांबून भुवया उंचावणारे प्रवासी नागरिकही! या लोकांच्या उपदेशाची आठवण होऊन मित्र गोष्ट सांगता सांगता वैतागला.

ते लोक त्याला त्यांचे व्यवहारी शहाणपण सांगत होते. म्हणत होते—'सोडून द्या हो. हे रिक्षावाले असेच त्यांच्या नादी लागून कुठं आपला वेळ खराब करून घेता !' दुसरे एक म्हणाले, 'अहो, तुम्ही मास्तर दिसता कशाला आपली लेव्हल सोडता ?' त्या रिक्षावाल्याला मात्र कोणी काही सांगत नव्हते. कारण तो भलताच उग्र चेहरा करून बसला होता

इतर दोन रिक्षावाल्यांनीही मित्राला सांगितलं, 'त्यांच्या नादी लागू नका, साहेब ? आम्ही नेतो तुम्हाला चला !'

पण मित्राचा निर्धार कायम होता. नव्हे, प्रत्येक नव्या प्रतिकाराबरोबर तो वाढतच होता. पंधरा मिनिटे झाली, अर्धा तास झाला, तास झाला मित्र रिक्षात मागे शांतपणे बसून, रिक्षावाला पुढच्या सीटवर बसून मधे दहा मिनिटे रिक्षावाला चक्क चहा पिऊन आला, मीटर पळत होता. भाडे चढत होते

दीड तासानंतर रिक्षावाल्याची सहनशीलता संपली म्हणाला, 'चला साहेब, कुठं न्यायचं तिकडे न्या !'

'डेक्कन जिमखाना पोलिसठाण्यावर आणि मीटवर साडेचार रुपये झाले आहेत, ते बिलात धरायचे नाहीत.' मित्राने शांतपणे आणि ठामपणे सांगितले

मग रिक्षा पोलिसाकडे गेली. मित्राने तिथे तक्रार नोंदवली स्वतःची जबानी दिली. रिक्षावाल्याची जबानी घ्यायला लावली या सगळ्यात आणखी दीड तास गेला

या ठिकाणी मी विचारले, 'मग पोलिसांनी काय केलं.'

मित्र म्हणाला, 'पोलिस त्याचा परवाना एक आठवड्यासाठी रद्द करावा असे म्हणत होते. पण मी म्हटलं, आज ताकीद द्या. त्याचा धंदा कशाला मारता ?'

गोष्ट संपली.

मी त्याला विचारलं, 'या साऱ्यात तू काय साधलस ? तुझे तीन तास तसे वायाच गेले की नाही ?'

'का ? त्या रिक्षावाल्याला समज नाही का मिळाली ?' मित्र

'समज मिळून काय होणार ? नुसत्या ताकदीऐवजी परवाना रद्द झाला असता तर खरी समज मिळाली असती.'—मी.

'पोलिसांनी दिलेली समज मला म्हणायची नाही' मित्र म्हणाला, 'त्याला माझ्या वागण्यानं जी समज मिळाली तिच्याविषयी मी बोलतो आहे. त्याला समजलं की, प्रत्येक गिऱ्हाईक काही आपल्यामुळे नमत नाही. माझ्या या अनुभवानंतर, तो इतर गिऱ्हाईकांशी आता सावधपणानं, नियमाची जाणीव ठेवून आणि माणुसकीनं वागेल.'

'पण तुझ्या एकट्याच्या या सत्याग्रहानं काय होणार ? तू असं असं प्रकरण लावून धरलंस हे किती जणांना कळणार ?' माझी शंका.

'आपण वागायला लागलं की सगळीकडे आपोआप कळत जातं. आता तूच लिहीशील की केव्हा तरी याच्यावर आणि एकदा का जास्त जास्त लोक असे सत्याग्रहाच्या पद्धतीनं वागायला लागले की इतरही लोकांना तसं वागावं लागेल. म्हणजे, वागावं लागेल एवढेच नव्हे तर वागावसं वाटेल'—मित्र

'हे तुझं शेवटचं मत मला तितकंस पटत नाही. तुला एक वागावस वाटत म्हणून सगळ्यानाच तसं वागावंसं वाटेल, हे कशावरून ?' पुन्हा माझी शंका

'थोडंस स्वतःच्या अनुभवावरून, आणि थोडंस निरीक्षणावरून. सांगतो तुला. हे नक्की की, गांधीवादी सत्याग्रह पद्धतीत असा एक भाग आहे की तो कळला, उमजला, की आवडायलाच हवा.' प्रचंड आत्मविश्वासाने मित्र म्हणाला.

'कोणता तो भाग बरं ?'—माझ्या नकळत माझ्या स्वरात त्याच्या आत्मविश्वासासंबंधी उपरोध.

माझ्या उपरोधाकडे सहजपणे दुर्लक्ष करून मित्र सांगू लागला

'तो भाग म्हणजे पूर्ण आत्मनिर्भरता, आणि त्यामुळेच पूर्ण आत्मप्राप्ती'—गंभीरपणाने मित्र

'या सूत्रावर भाष्य करावं गुरुजी'. त्याच्या वाढत्या गंभीरपणाबरोबर माझा वाढता उपरोध.-यावर पुन्हा मित्राचा वाढता शांतपणा. म्हणाला—

'तू चेष्टा कर पण तू विचार करशील तेव्हा तुला कळेल की, असं शंभर टक्के पूर्ण आत्मनिर्भर होणं ही किती अवघड, जवळजवळ अशक्य, गोष्ट आहे.'—मित्र.

'मला ते अवघडच नव्हे, तर अशक्य वाटतं. पण तू आत्मनिर्भर, आत्मप्राप्ती, असे जडजंबाल शब्द वापरू नकोस. या शब्दानी बोध होण्याऐवजी भीति मात्र वाटते. साध्या व्यवहाराच्या भाषेत सांगता येत असेल तर सांग'. मी मित्राला पुन्हा डिवचलं.

'सांगतो. तुला समजेल अशा सोप्या भाषेत सांगतो' मित्राने टोला परतवला. तो पुढे सांगू लागला—

'हे बघ व्यवहारातही आपल्याला कोणतं दुःख सर्वांत जास्त टोचतं ? आणि कोणता अपमान सर्वांत जास्त बोचतो ? तू सांग.'

'याचना आणि याचना करावी लागावी, असं परावलंबन' मी उत्स्फूर्तपणे बोलून गेलो.

'बरोबर !' मित्राने शिक्षकवृत्तीने आता मला ताब्यात घेण्याचं ठरवलेलं दिसलं. म्हणाला,

'व्यवहारात स्वयंपूर्ण, आणि म्हणून स्वावलंबी असावं, असा आपला प्रयत्न असतो कारण त्यातच आपला स्वाभिमान म्हण, अहंकार म्हण, सुरक्षित राहू शकतो. मग आपल्याला कोणी फट म्हणू शकत नाही. बरोबर ?'

'बरोबर.'—मी नकळत रुकार भरला.

'तर हे व्यवहारात स्वयंपूर्ण असणं आणि स्वावलंबी असणं—हे देखील सत्याग्रहाच्या मार्गानंच सर्वांत उत्तम जमतं.'

'ते कसं ?'— मी

'कारण सत्याग्रहाचा मार्ग हा एकमेव मार्ग असा आहे की, जो प्रतिक्रियात्मक आचरणाचा मार्ग नाही. बाकी सामाजिक जीवनात आपण बहुधा प्रतिक्रियात्मकच वागत असतो. कुणी आपल्याशी चांगलं वागलं की आपण चांगलं वागतो. कुणी वाईट वागलं तर वाईट वागतो. होय ना ? या प्रतिक्रियात्मक वागण्यात आपलं परावलंबन असतं. आपण कसं वागावं, ते आपल्या नकळत, इतरच ठरवीत असतात. आपण फक्त प्रतिक्रिया देत राहतो. '– मित्र.

' पण जशास तसं वागणं हाच साधा व्यवहार नाही का ?' मी.

' व्यवहार आहे; पण हा व्यवहार पूर्णपणे स्वनियंत्रित नसतो. म्हणूनच मग आपण कधी फसतो. कधी आपले अपेक्षाभंग होतात. इतरांच्या वागण्यानुसार आपण हेलकावत जातो. आपलं स्वतःचं, स्वतंत्र, इतरांवर अवलंबून नसलेलं, असं आपल्याजवळ काहीच उरत नाही. '– मित्र.

' हे व्यवहारात कसं आणायचं ?'– मी.

'आपलं ध्येय काय नि तत्त्व काय ते आधी निश्चित करायचं. आणि त्याच्याशी सुसंगत असं वागत राहायचं. त्याला अनुकूल-प्रतिकूल कशाही प्रतिक्रिया येवोत. यात इतरांचा अपेक्षाभंग कधी होणार नाही. आपली फसगत कधी होऊ शकणार नाही. ' मित्र.

'पण इतरांचे गैरसमज होतील. आपल्याला त्रास होईल. त्याचं काय करायचं ?' मी.

' परावलंबी, प्रतिक्रियात्मक वागून गैरसमज किंवा त्रास टळतात काय ? इतरेजन अशा सर्वांचं समाधान आपण कधीच करू शकत नाही. एकाचं समाधान होईल तर दुसरा दुखावेल. म्हणून स्वतः विचारपूर्वक ठरवलेला मार्गच उत्तम. त्यात कधीकधी कमी-जास्त व्यावहारिक त्रास असेल; पण त्यात आपल्या मनाला अखंड समाधान असेल ! आत्मनिर्भर हा शब्द आता वापरू का ?'– मित्राने वादातील पूर्णविरामाची घोषणा केली.

पण मी पूर्णविराम दिला नव्हता. मी विचारलं, ' त्यात कधीकधी टोकाचा धोका होईल. जखमी व्हावं लागेल. मरावंही लागेल !'

' ही ज्याची त्याची निवड आहे. स्वतःला कसंबसं जगवत, संभाळत राहायचं की आपला आत्मसम्मान अखंड ठेवायचा ?' मित्र ठाम होता.

' पण तुम्ही तुमचा सम्मान संभाळला म्हणून इतर कशाला सांभाळतील? ते तुम्हाला त्रास देत राहतील. शिव्या देत राहतील. ते थांबण्याची हमी तुझ्या तंत्रात कुठे आहे ?' हा मुद्दा मला बिनतोड वाटला.

पण मित्राने या मुद्याचाही विचार केला होता. म्हणाला–

' दुसऱ्यांचं वाईट वागणं थांबवणं हे शक्य नाही. कारण अविनाश नेहमी म्हणतो तसं– दुसरे हे नेहमी दुसरे असतात. त्यांनी आपल्या सारखंच वागावं असं आपण म्हणू शकत नाही. आपण आपण असणं एवढंच आपण, साधलं तर साधू शकतो. त्यात इतरांनी शिव्या दिल्या तर तो त्यांचा आत्माविष्कार असतो, आपला अपमान नसतो.' मित्र बोलतच होता–

' समज, एखाद्या, लहान मुलाला आपली खोडी काढायची असली की ते काय करतं ? आजूबाजूला कुणी नाही असं पाहून ते आपल्याला शिवी देतं. समजा, आपण किंवा दुसऱ्या कुणी, त्याला झापलं तर ते लांब, सुरक्षित अंतरावर पळतं आणि तिथून वाकुल्या दाखवतं. यात अपमान मानायचा तर त्या पोराला बरोबरीचं मानल्यासारखं होतं. कारण आपण ज्यांना बरोबरीचं किंवा आपल्याहून उंच मानतो, त्यांच्याकडूनच आपला अपमान होऊ शकतो. '


□

मित्र गेला. वाद-चर्चा संपली. माझा विचार चालूच राहिला.

मला त्याचा शांत राहण्याचा मुद्दा पुरता पटू शकत नव्हता; पण त्याचा प्रतिवादही करता येत नव्हता. ' खलहिंसा' ही सेनापती बापटांनी सांगितलेली अपरिहार्य हिंसा योग्य म्हणता येईल असं वाटत होतं आणि त्याच वेळी ' खल' कोण हे कोणी ठरवायचं, अपरिहार्य हिंसा करण्याचा अधिकार कुणाला, या प्रश्नांची निरामय उत्तरं मिळू शकत नाहीत, हेही जाणवत होतं.

मला मान्य झाला होता तो मित्राचा आत्मसम्मानाचा आणि स्वावलंबनाचा मुद्दा. गांधीजींच्या सत्याग्रहाचा हा भाग व्यवहारात येऊ शकतो, आणि खरा आत्मसम्मान या मार्गात आहे, हे मला आज (तरी) पटलं होतं ! □


तिसरी आवृत्ती



सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आत्मचरित्र

किंमत : बारा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

अवतीभवती । शरद कृष्णन्

# खळबळ उडवून देणारा पत्रकार अरुण शौरी

अंतुलेंच्या निधीप्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करून खळबळ उडवन देणारा पत्रकार म्हणून 'इंडियन एक्सप्रेस' या दैनिकाचे कार्यकारी सपादक अरुण शौरी सर्वांच्या परिचयाचे आहेत. आज तरी आक्रमक लिखाण करण्यात त्याचा हात धरणारा पत्रकार नाही. एखादा विषय हाती घेतला की, आपल्या सहाय्यकाच्या मदतीने ते त्या विषयाचे परिपूर्ण चित्र तयार व्हावे इतका खात्रीलायक मजकूर प्रथम मिळवतात आणि नंतर त्या मजकुराच्या संदर्भात निर्भीड भाष्य करतात. पत्रकारितेचा फार मोठा अनुभव त्यांच्या पदरी नाही अथवा याबाबत त्यानी काही शिक्षणही घेतलेले नाही. अरुणजीचा जन्म जालंदरचा. दिल्लीच्या मॉडर्न स्कूलमध्ये आणि पुढे सेंट स्टिफन कॉलेजमध्ये त्यानी शिक्षण घेतले अर्थशास्त्रामध्ये डॉक्टरेट संपादन केल्यावर ते जागतिक बँकेच्या नियोजन विभागामध्ये कामास लागले. १९६७ ते १९७२ पर्यंत त्यानी या विभागात काम केले. याच काळामध्ये दोन वर्षे त्यानी भारताच्या नियोजन मंडळामध्ये जागतिक बँकेतर्फे काम केले. जागतिक बँकेमध्ये विख्यात पाकिस्तानी अर्थतज्ज्ञ प्रा. महतूल हक् यांच्या हाताखाली काम केले. १९७२ नंतर अरुणजी इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स अँड रिसर्च या संस्थेमध्ये आले तेथे अभ्यासक म्हणून काम करत असतानाच त्यानी 'हिंदूइझम, गीता अँड उपनिषद्स्' या नावाचा ग्रंथ लिहिला. अशाच स्वरूपाचे आणखी पाच ग्रंथ लिहिण्याचा त्याचा विचार होता; पण दरम्यान आणीबाणी आली. दिल्लीमध्ये न्यायमूर्ती व्ही. एन. तारकुंडे याच्या मार्गदर्शनाखाली पीपल्स युनियन ऑफ सिव्हिल लिबर्टीज् नावाची जी संस्था अस्तित्वात आली त्या संस्थेच्या कामात अरुणजी रस घेऊ लागले. अभ्यासासाठी निवडलेले विषय बाजूला ठेवून त्यानी जवळजवळ पूर्ण वेळ याच संस्थेचे काम करण्यास सुरुवात केली. याच वेळी त्यानी आणीबाणीविरोधी लिखाणास प्रारभ केला. अभ्यासक म्हणून त्याना जे पैसे मिळत असत ते पैसे मिळण्याचे बंद झाले असतानाच केवळ योगायोगाने त्याची 'एक्सप्रेस 'चे संचालक रामनाथजी गोएंका याच्याशी गाठ पडली. त्यानी अरुणजीना आपल्या पत्रामध्ये काम करण्याबाबत विचारले आणि अरुणजीनी होकार दिला. आत्मविश्वासाने त्यानी या व्यवसायात पाऊल टाकले आणि केवळ पाच–सात वर्षांच्या कालावधीमध्ये स्वत.चे खास स्थान निर्माण केले.

अत्यंत निर्भीड लिखाण करण्याबद्दल अरुणजीची ख्याती आहे. परिणामाची तमा न बाळगता लिखाण करून त्यांनी अंतुले–प्रकरण चव्हाट्यावर आणले. लोकसभेमध्ये त्यांच्याविरुद्ध हक्कभंगाचा ठराव दाखल करण्यात आला; पण तो गृहाकडून स्वीकारलाही गेला नाही. अर्थात तो स्वीकारला गेला असता तर परिणामाना तोड द्यायची तयारी अरुणजीनी ठेवली होतीच. आपल्या लिखाणातून त्यानी अर्थमंत्री श्री वेंकटरामन यानी अंतुलेंचे जे जोरदार समर्थन केले त्यावर प्रखर हल्ला चढवला आणि खोटारडेपणाचा आरोप त्याच्यावर केला. 'एक्सप्रेस 'ने अगदी योजनाबद्ध पद्धतीने हे अंतुले-प्रकरण चव्हाट्यावर आणले. या प्रकरणाचा तपशील 'संडे ऑब्जर्व्हर 'ने आपल्या ताज्या अंकामध्ये दिला आहे ३१ सप्टेंबर १९८१ रोजी 'एक्सप्रेस 'ने पहिला जोरदार हल्ला चढवला. त्यापूर्वी आठ दिवस अरुणजी मुबईत येऊन दाखल झाले. त्याचे कायम वास्तव्य दिल्लीला असते. मुबईच्या 'एक्सप्रेस 'च्या ऑफिसमध्ये हालचालीना प्रारभ झाला होता. शरद पवार आणि रामनाथजी याच्या दोन भेटी झाल्या होत्या. हे निधी-प्रकरण चागले रगवता येईल अशी खात्री झाल्यावर शेठजीनी अरुणजीना दिल्लीहून बोलावून घेतले. त्यानतर गोएंका, शरद पवार, अरुणजी आणि 'महाराष्ट्र टाइम्स 'चे संपादक–गोविंद तळवळकर याची संयुक्त बैठक झाली. आवश्यक असलेली सर्व माहिती गोळा करण्यासाठी 'एक्सप्रेस 'चे तीन वार्ताहर अरुणजीच्या आदेशाप्रमाणे कामाला लागले आणि जसजशी माहिती मिळत गेली तसतसे हे प्रकरण रगत गेले शेठजीनी या प्रकरणी अरुणजीची निवड का केली ? तर आपल्याला हवे त्या पद्धतीने हे सारे प्रकरण उजेडात आणण्याची जबाबदारी अरुणजी पार पाडू शकतील, असा विश्वास त्याना होता आणि शेठजीच्या अपेक्षेपेक्षाही जास्त मजबूत कामगिरी बजावून अरुणजी दिल्लीला परत गेले आहेत. जास्त माहिती हाती आल्यास आपल्याशी संपर्क साधावा, असे आदेश त्यानी आपल्या सहकाऱ्यांना दिले असून आपण या प्रकरणाचा शेवटपर्यंत पाठपुरावा करणार असल्याचे आश्वासन दिले आहे. 'मिड् डे 'ने प्रसिद्ध केलेल्या एका मुलाखतीमध्ये ही गोष्ट त्यानी आवर्जून सांगितली आहे.

### कातडीबचाऊ पत्रकारिता

यापूर्वी मद्रास विधानसभेच्या कामकाजाबद्दलही एक लेख लिहून त्यानी कठोर टीका केली होती गृहामध्ये सभासद ज्या पद्धतीचे वर्तन करतात त्यावर त्यानी ताशेरे ओढले होते. त्याबाबत त्याच्यावर कारवाई का करू नये, असे त्यांना विचारण्यात आले तेव्हा त्यानी आपले उत्तर पाठवून दिले आणि त्यानंतर काही हालचाल झाली नाही. पुढे त्यानी लोकसभेच्या कामकाजाबाबत 'अ फ्यूरर अ हे ' नावाचा लेख लिहिला. त्याबाबतही त्याच्याकडे खुलासा मागण्यात आला. अरुणजीनी अकरा पानी खुलासा पाठवून दिला. त्यानतर पुन्हा मामला थड ! आता अंतुले-प्रकरणी त्याच्याकडे राज्यसभेच्या अध्यक्षानी विचारणा केल्यावर त्यानी प्रत्येक मुद्द्याचे सुस्पष्ट उत्तर देणारे २३ पानी निवेदन पाठवून दिले आहे. आता कारवाई का होत नाही ? आणि ज्यानी ही कारवाई करायची ते कसे असतात याबाबत ते लिहिणार आहेत. याबाबत बोलताना अरुणजी म्हणतात, मी फक्त आरसा समोर धरून खरे प्रतिबिंब जनतेसमोर ठेवतो मी दोषी कसा ? मी ज्यांच्याबद्दल लिहितो ती मंडळी खरी दोषी म्हटली पाहिजेत !

पत्रकारितेबाबत भाष्य करताना ते म्हणाले–इग्रजी वृत्तपत्रांना अवाजवी महत्त्व आले असून दिल्लीमधील प्रमुख वृत्तपत्रामध्ये एखादी

गोष्ट प्रसिद्ध झाल्याखेरीज त्या बातमीला खरे 'तेज' प्राप्त होत नाही. प्रसिद्धी माध्यम आणि सत्ता याचे दिल्लीमध्ये झालेले केंद्रीकरण ही एक शोकातिकाच मानावी लागेल. अतुले-प्रकरणी 'टाइम्स ऑफ इडिया'ने जे कातडीबचाऊ धोरण स्वीकारले त्यावर अरुणजीनी कठोर टीका केली आहे ते म्हणतात—वृत्तपत्राबाबत शासन नाराज आहे आणि असे अनेक पत्रकार आहेत की, जे शासनाचा जराही रोष स्विकारण्यास तयार नाहीत. याबाबत व्यवस्थापनावर दोषारोप करून त्याना मोकळे होता येणार नाही. बड्या वृत्तपत्रामधील मोक्याच्या जागा अडकवून बसलेले हे पत्रकार सत्तास्थानी असलेल्या राजकारण्याशी संबंध ठेवून असतात त्याच्या हितसंबंधाना बाधा येईल असे काहीही ते लिहीत नाहीत व्यवसायामधील या गिरीलाल जैन प्रवृत्तीच्या पत्रकाराची मला विलक्षण चीड आहे. आपल्याला अनुकूल असे लिखाण करणाऱ्या पत्रकाराना शासन अनेक प्रकारे सहाय्य करते शासकीय मान्यतेचा शिक्का असलेले पत्रकार तयार करण्यास इदिराजीनी सुरुवात करावी, असेही ते उपहासाने म्हणाले. आपला हा मुद्दा स्पष्ट करताना अरुणजी म्हणाले. आय्. ए. एस्, आय. एफ् एस्. याच्या धर्तीवर इंदिराजीनी आय् जे एस्—म्हणजे इंडियन जर्नलिस्टिक सर्व्हिस' सुरू करावी आणि 'टाइम्स ऑफ इंडिया'च्या गिरीलाल जैन याच्या हाती याबाबतची सूत्रे सुपूर्त करावीत. शासनाला हवे तसे पत्रकार ढिगाने तयार होतील आपला स्वत.चा अनुभव सागताना ते म्हणाले—अंतुले-प्रकरणाचा माझा लेख— 'एक्सप्रेस'-खेरीज अन्यत्र कधीही प्रसिद्ध होऊच शकला नसता! दिल्लीमध्ये अन्य चार मोठी दैनिके आहेत, पण तरीही मला हवे तेवढे स्वातंत्र्य अन्य कोणत्याही वृत्तपत्रामध्ये मिळू शकले नसते.

इदिराजीचे ज्या पद्धतीने स्तोम माजवले जात आहे त्यावर अरुणजीचा राग आहे. शासकीय व्यवस्थापनामध्ये महत्त्वाचे निर्णय घेण्याबाबतचे इतके परिपूर्ण केंद्रीकरण यापूर्वी कधीही झाले नव्हते. आता अंतुले-प्रकरणी एवढे वाभाडे काढले गेले तरी त्यानी जायचे की नाही, हे केवळ इदिराबाईंच्या निर्णयावर अवलंबून! अंतुलेजी राजीनामा पाठवतात तोही थेट इदिराजीकडे आणि राजकारणामधील मंडळीही ढोंगीपणाने, बाईजी, आम्हाला तुमचे आशिर्वाद हवेत, यासारखी लाचारीची निवेदने करतात सत्तेच्या इतक्या परिपूर्ण केंद्रीकरणाबद्दल कुणालाही खत नाही त्यामागील धोका कुणाच्या लक्षातच येत नाही आणि काहीही कारण नसताना थेट राजीवचा अनुनयही केला जातो, ही खरी शोकान्तिका आहे अरुणजी पुढे म्हणतात, ही परिस्थिती मला हास्यास्पद वाटते आणि मी त्याविरुद्ध आवाज उठवतो या व्यक्तिपूजेची मला चीड आहे इंदिराजीविरुद्ध लिखाणामागे असलेली ही पार्श्वभूमी लक्षात न घेता टीका केली गेली तर त्याला ही मी जबाबदार नाही. अर्थात लाचार मंडळीसमोर खुलासा देण्याची माझी इच्छा नाही, तशी गरजही मला वाटत नाही, पण आता तुम्ही प्रश्न विचारला म्हणून खुलासा केला. जनता राजवट सत्तेवर असताना अंतर्गत संघर्षाबद्दल मी कडाडून लिहिले. चरणसिंग व बहुगुणा याच्यामधील पत्रव्यवहाराला मी प्रसिद्धी दिली आणि जनता पक्षाचे नेते सर्व आलबेल असल्याचे भासवत होते त्या वेळी त्याना खऱ्या परिस्थितीची जाणीव व्हावी या दृष्टीने मी लिखाण केले.

'एक्सप्रेस' गटाने आक्रमक पत्रकारितेचे जे धोरण स्वीकारले आहे त्याचा इतरांकडून वापर होईल का? असा प्रश्न विचारला असता अरुणजी म्हणाले—अशा पत्रकारितेच्या सदर्भात बातमीदाराना झटून काम करावे लागते. प्रसंगी धोकाही पत्करावा लागतो. सपादक अथवा मालक आपल्याला पूर्ण संरक्षण देईल अशी खात्री असल्याखेरीज कोणीही बातमीदार असा धोका पत्करणार नाही आज मोठ्या इंग्रजी दैनिकाचे द्रुढ्ढाचार्य संपादक कसे आहेत याची जाणीव त्याच्या हाताखाली काम करणाऱ्या मंडळीना आहे स्वाभाविकपणे, अशा मंडळीच्या हाती नियंत्रण असेपर्यंत मेहनत घेऊन पुराव्यनिशी प्रकरणे सादर करण्याची जबाबदारी बातमीदार घेणार नाहीत. ज्या पद्धतीचे लिखाण तुम्ही करत आहात त्यावर खूष असणारा मोठा वाचक वर्ग आहे या लिखाणाचा शासनावर किंवा सार्वजनिक जीवनावर काय परिणाम होईल? असे विचारले असता अरुणजी म्हणतात—आज तरी मला तसे नेमके काही सागता येणार नाही; परतु सार्वजनिक जीवनात वावरणाऱ्या व्यक्ती आपल्या सत्तेचा वापर जबाबदारीने करतील अर्थात एकटे अरुणजी किंवा एक 'एक्सप्रेस' फारसे काही करू शकणार नाही त्यासाठी पत्रकारितेचे स्वरूप बदलले पाहिजे. सत्तास्थानी असलेल्या अनेक मंडळीना दुखावल्यामुळे आपल्या जीवित-वित्ताला धोका संभवतो असे तुम्हाला वाटत नाही का? या प्रश्नाला उत्तर देऊन मुलाखतीचा समारोप करताना अरुणजी म्हणतात—असा धोका तर असतोच ना! पण मी त्याबाबत काय करणार? मला धमकी देणारी पत्रे वगैरे येतात; पण मी त्याचा फारसा बाऊ करत नाही. मी स्वत हा धोका पत्करतो त्यामुळेच मी ज्याच्यावर अवलबून आहे ते बातमीदारही मला हवे त्या पद्धतीने काम करतात. मी गुलदस्तात राहून काम करून घ्यायचे ठरवले तर ते निश्चितच जमणार नाही. तेव्हा आपण स्वीकारलेल्या व्यवसायाचा एक भाग म्हणून मी ही बाब स्वीकारली आहे.

## □ सेनादलामधील सेवानिवृत्तिनंतरचे जीवन

सैनिकी सेवाबाबत असलेल्या नियमाप्रमाणे सैनिकाना आणि सेनादलामधील कनिष्ठ अधिकाऱ्याना आडवयामध्ये निवृत्ती स्वीकारावी लागते. प्रत्येक वर्षी सेनादलातून सुमारे ६० हजार सैनिक व एक हजार अधिकारी सेवानिवृत्त होत असतात. सैनिक सामान्यत ३५ ते ३६ वर्षांचे असतात, तर अधिकाऱ्याचे वय ४२ वर्षांचे असते. म्हणजेच सेवानिवृत्तिनतरही भरपूर क्रीयाशील आयुष्य त्याच्यासमोर असते. खेरीज, प्रापंचिक जबाबदाऱ्याचा बोजा ज्या वेळी जास्तीत जास्त वाढलेला असतो त्याच वेळी त्यानाही सेवानिवृत्ती स्वीकारावी लागते. लगेच पर्यायी नोकरी मिळाली तर ठीक, अन्यथा अनेक कौटुंबिक प्रश्नाना त्याना तोड द्यावे लागते. मिळणारे निवृत्तिवेतन तुटपुंजे असते मुले-बाळे सामान्यत शिकत असल्याने त्यांनी कौटुंबिक जबाबदाऱ्या उचलण्याचा प्रश्नच नसतो. स्वाभाविकपणे आडवयात सेवानिवृत्त झालेल्या या सेनादलामधील मंडळीना कठीण आर्थिक परिस्थितीला तोड द्यावे लागते आज सुमारे ५० लाख सेवानिवृत्त सैनिक व अधिकारी आहेत. सेवानिवृत्तिनंतर त्याच्या-

साठी काही सुविधा आहेत. काही जागाही त्यांच्यासाठी राखून ठेवलेल्या आहेत; परंतु या सुविधा फार अपुऱ्या आहेत आपल्या प्रश्नावर तोड काढण्यासाठी या मंडळींनी एक सघटना स्थापन केली आहे एक्स-सर्व्हिसमेन लीग असे या संस्थेचे नाव असून गेल्याच सप्ताहामध्ये या सस्थेने स्वत साठी आर्थिक बळ उभे रहावे म्हणून काही कार्यक्रम दिल्लीमध्ये सादर केले. ही सस्था गेली १७ वर्षे अस्तित्वात असून आपल्या सभासदाना जास्तीत जास्त सहाय्य मिळावे म्हणून प्रयत्नशील आहे कमोडर बी एस् बारुआ हे या सस्थेचे अध्यक्ष आहेत सेनादलामधील कामासाठी शारीरिक तदुरुस्ती हा महत्त्वपूर्ण भाग असल्याने सेवानिवृत्तिवयाबाबत श्री. बारुआ याची कोणतीही तक्रार नाही त्याचे म्हणणे इतकेच की, ३७-३८ व्या वर्षी सेवानिवृत्ती स्वीकारल्यानंतर पुढे ५६ व्या वर्षापर्यंत या मडळींना काम मिळाले पाहिजे जेथे सैनिकी शिस्तीची आवश्यकता आहे अशा विकासयोजनामध्ये माजी सैनिकाना व अधिकाऱ्याना सामावून घेतले गेले पाहिजे त्याची मुख्य तक्रार अशी की, असंख्य माजी सैनिक काम शोधत हिंडत असताना शासकीय सेवामधील राखीव जागाही भरल्या जात नाहीत आणि या जागा रिकाम्या असल्या तरी त्याची फारशी पर्वाही कुणाला वाटत नाही. याबाबत लगेच कारवाई झाली तर किमान ४० ते ५० टक्के माजी सैनिकाचा प्रश्न सुटू शकेल. आज प्रत्यक्षात जेमतेम वीस टक्के लोकाची वर्णी लागू शकते.

सैनिकी सेवेमधून निवृत्त होत असलेल्या जवानाचा प्रश्न विशेष गभीर असतो निवृत्त होणारे हे जवान मुख्यत्वे गरीब शेतकरी-कुटुबातून झालेले असतात. ते पुन्हा माघारी येतात तेव्हा त्याना शेतीसाठी जमीन उपलब्ध नसते आणि अन्य कुटुबीय मंडळी परत येणाऱ्या या सैनिकाबाबत फारशी उत्साही नसतात. स्वाभाविकपणे या परत आलेल्या सैनिकाचे जीवन-स्वास्थ्यच हरवते. नेमके काय करावे, हे त्याला उमजत नाही आणि नोकरी करण्याची इच्छा असली तरी नोकरीही सहजी मिळत नाही पेन्शन तर कमालीचे तुटपुंजे असते निवृत्तिवेतनात सुधारणा केल्यानंतर आताही किमान निवृत्तीवेतन केवळ ६५ रुपयेच आहे आज ६५ रुपयात एका माणसाचे एकवेळचे जेवण मिळणेसुद्धा अवघड आहे किमान निवृत्तिवेतन शभर रुपये करावे अशी त्याची मागणी आहे आणि ती अवाजवी म्हणता येणार नाही. अर्थात देशाच्या आर्थिक परिस्थितीशी हा प्रश्न निगडित असल्याने त्याची सोडवणूक ही सोपी बाब नाही या प्रश्नाबाबत आपल्या सस्थेने केंद्र-शासनाकडे अनेक निवेदने पाठवली असल्याचेही श्री. बारुवा यानी सागितले ते म्हणाले; आमच्या सर्व मागण्या मान्य करा, असेही आमचे म्हणणे नाही. मात्र सेवानिवृत्तीवेतनात-सुधारणा करूनही बीस रुपये निवृत्तिवेतन घेणाऱ्याना या सुधारणेचा लाभ मिळालेला नाही; तो मिळावा एवढी आमची किमान मागणी आहे. येत्या २६ जानेवारीपूर्वी ती मान्य होईल असे *अर्थ-मंत्र्यानी जाहीररीत्या सागितले आहे या प्रश्नाची सोडवणूक झाली* नाही तर ससदेवर 'एक्स सर्व्हिसमेन लिग 'तर्फे मोर्चा न्यावा असे कार्यकारिणीच्या काही सदस्याना वाटते; पण हे सेवादलामधील शिस्तीला सोडून होईल अशी माझी भावना असल्याने शक्यतो सामोपचाराने हा प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न चालू आहेत.

*लीगतर्फे* प्रतिवर्षी गरजू माजी सैनिकांना ५० हजार रुपयापर्यन्त *अर्थसहाय्य* देण्यात येते. त्यासाठी सभासदाकडून अर्ज मागवण्यात येतात व निवड समिती गरजाचे मूल्यमापन करून अर्थसहाय्याबाबतचे निर्णय घेते. कित्येक माजी सैनिकाना नातेवाईकांचा आधार नसतो. अशा गरजू माजी सैनिकाचे जीवन सुसह्य व्हावे म्हणून 'लीग 'मार्फत जालदर येथे एक सैनिकी वृद्धाश्रम चालवण्यात येतो. सध्या तेथे ३० माजी सैनिकांची सोय आहे. प्रतिवर्षी सुमारे ४०० ते ५०० अर्ज येतात; परतु सर्वांची सोय करता येत नाही. देशाच्या इतर *भागामध्ये किमान आणखी तीन आश्रमाची गरज आहे; पण* पैसा नसल्याने याबाबत तूर्त तरी काहीच करता येत नाही.

सेनादलामधील निवृत्त सैनिकाबाबत जनतेला आपुलकी असते. आम्ही पैसा उभा करण्यासाठी जे कार्यक्रम करतो त्याला अनेक चित्रपट-कलाकाराचे उत्तम सहकार्य मिळते. तथापि कितीही प्रयत्न केले तरी आमची आर्थिक ताकद व कार्यालयीन यत्रणा कमी पडते शासनाने याबाबतची आपली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन श्री. बरुवा यानी केले आहे. युद्धात कामी आलेल्या सैनिकाचे स्मारक नवी दिल्लीत इंडिया-गेट येथे आहे माजी सैनिकातर्फे आपल्या या शूर बाधवाना गेल्या सप्ताहात आदराजली वाहण्यात आली तेव्हा युद्धामध्ये पाय गमावलेल्या एका सैनिकाने स्मारकावर पुष्पचक्र अर्पण केले या प्रसगी जमलेल्या नागिरकाकडून सुमारे तीन हजार रुपयाची रक्कम 'लीग 'ला मिळाली जनतेने दाखवलेल्या या प्रेमाबद्दल श्री. बरुवा यानी कृतज्ञता व्यक्त केली आहे.

## □ इराणी चषक सामना-भवितव्य ठरणार !

येत्या हिवाळ्यात भारतामध्ये येणार असलेल्या इग्लिश संघाबद्दलचा अंतिम निर्णय अद्याप झाला नसला तरी क्रिकेट-खेळाडूनी या दौऱ्यावर लक्ष केंद्रित केले आहे. रणजी करंडकविजेता मुबई सघ व शेष-भारत यांच्यामधील इराणी चषक सामना कसोटी सामन्यासाठी निवडल्या जाणाऱ्या भारतीय संघाबाबतचे धोरण स्पष्ट करणारा ठरणार आहे. १६ ऑक्टोबरपासून इदूर येथे सुरू होत असलेल्या या सामन्यासाठी जो शेष-भारत सघ घोषित झाला आहे त्याचे नेतृत्व गुडाप्पा विश्वनाथ करणार आहे. या सघामध्ये रॉजर बिन्नी, भारत रेड्डी, व योगराज यांचा समावेश नाही. यशपाल शर्मा बारावा खेळाडू आहे, तर सुरेंद्र अमरनाथ व मदनलाल (दिल्ली) याचा समावेश करण्यात आला आहे कसोटी सामन्यातून मागे पडलेल्या या खेळाडूना इराणी चषक सामन्याच्या निमित्ताने एक उत्तम संधी उपलब्ध झाली असून त्यानी या संधीचा फायदा घेतला तर त्याचा फेरसमावेश होण्याची शक्यता आहे. संजीव राव (म. प्रदेश), अशोक मल्होत्रा (हरियाणा) या खेळाडूच्या कामगिरीकडेही निवड समितीचे सदस्य लक्ष ठेवून आहेत.

दरम्यान देवधर करंडक स्पर्धेमधील अतिम सामना अगदीच एकतर्फी होऊन दक्षिण विभागाने हा चषक जिंकला आहे. मध्यविभागाविरुद्धच्या या सामन्यामध्ये अखेरच्या टप्प्यामध्ये विश्वनाथने गोलंदाजी केली आणि खदा फलदाज म्हणून प्रसिद्ध असलेल्या या खेळाडूने गोलंदाजाना लाज वाटावी अशी कामगिरी केली. त्याने तीन षटके टाकली आणि तेरा धावा देऊन चार बळी मिळवले. अर्थात क्रिकेटमध्ये असेही होऊ शकते, याची सहज नोद केली इतकेच. कारण कसोटीच्या सदर्भात विश्वनाथचा कोणी गोलंदाज म्हणून विचार करणार नाही आणि या सामन्यात विश्वनाथने तेरा धावा नोंदवल्या. निवड समितीचे सदस्य खेळाडूचा फॉर्म लक्षात घेऊन या सामन्यामधील कामगिरीचे मूल्यमापन करत असले तरी त्याचे खरे लक्ष इदूर येथे होणाऱ्या इराणी चषक सामन्याकडेच असून इंग्लंडविरुद्ध उतरणाऱ्या भारतीय सघाबाबतचे खरे चित्र या सामन्यानंतरच स्पष्ट होऊ शकेल. □

# मनपसंत जोडीदार कसा गाठावा व गटवावा ?

कि. मो. फडके, डायरेक्टर, फडके सेंटर, मुंबई.

आज नंदा खूप दिवसांनी माझ्याकडे आली होती आणि नेहमीपेक्षा बराच वेळ गप्पा मारीत बसली होती माझ्याकडून वाचायला नेलेली काही पुस्तके परत करायला म्हणून ती आली होती. साहजिकच प्रथम त्या पुस्तकाबद्दल तिने आपल्या प्रतिक्रिया मला सांगितल्या व मग आमच्या थोडया इकडच्या-तिकडच्या गप्पा सुरू झाल्या. तेव्हा बोलता बोलता मी सहज तिला म्हणालो, 'नंदा, आता आम्हाला लाडू केव्हा देणार ?' यावर नेहमीप्रमाणेच तिने माझ्या प्रश्नाला उडवाउडवीची उत्तरे दिली व तो विषय टाळण्याचा प्रयत्न केला अर्थात तिच्या घरची मंडळी तिला स्थळ शोधत असली तरी अजून कोठे काही जमलेले दिसत नव्हते. खरे पाहाता घरची परिस्थिती, रूप, स्वभाव, शिक्षण इत्यादी बाबतीत नंदाची बाजू भक्कम आहे. तरी प्रत्येक स्थळाच्या बाबतीत कोठे तरी माशी शिंकते व सर्व विनसते !

ही सर्व वस्तुस्थिती मला माहीत होती. म्हणून नंदाच्या उडवाउडवीच्या उत्तराकडे दुर्लक्ष करून मी चेष्टेने तिला म्हणालो; 'तू मानसशास्त्र विषय घेऊन बी. ए झाल्याला आता तीन वर्षे होत आली आणि स्वत साठी तुला एखादा झकास मुलगा गाठता येत नाही म्हणजे तू कसलं मानसशास्त्र शिकलीस ?'

'सर, कमाल करता तुम्ही ! मानसशास्त्र शिकले म्हणून काय रस्त्यात उभी राहून दिसेल त्या गोऱ्या–गोमटया मुलाचा हात धरून पळून जाऊ की काय ?' नंदाने थोडयाशा त्रासिक सुरात दिलेले उत्तर.

'अगदी तसं नाही तरी स्वतःला साजेसा जोडीदार मिळविण्यासाठी तू काही तरी हालचाल केली पाहिजेस असं नाही तुला वाटत ?' माझा रोखठोक सवाल.

'असं ठरवून कधी कोणावर प्रेम करता येतं का ?' नंदाची प्रामणिक कैफियत.

'पण चार–चौघाच्या ओळखी करून घेतल्याशिवाय कोणाबद्दल आकर्षण वाटणार तरी कसं ?' माझी रास्त शंका.

'मला नाही कोणाशी मुद्दाम ओळख वगैरे करून घ्यायला आवडत. ' नंदाचा अपेक्षित पवित्रा.

'आता तू असं कर की इतर सर्व पुस्तकं वाचायचं बंद करून मी तुला आज देतो त्या पुस्तकाची पारायणं कर !' माझा शर्थीचा प्रयत्न.

'कसलं पुस्तक देता आता ? नवरा शोधण्याच्या कलेवरचं की काय ?' चेष्टेच्या सुरात नंदाची प्रतिक्रिया.

'अगदी बरोबर ! मानसशास्त्रातील तू आजपर्यंत वाचलेली सर्व पुस्तकं तुला या कामात मदत करण्यात असमर्थ ठरलेली दिसतात. तेव्हा मी तुला आज एक पुस्तक देतो त्याचं नाव आहे The Intelligent Woman's Guide to Dating and Mating ! आणि ते लिहिलं आहे एका चावट मानसशास्त्रज्ञाने.' माझी गंभीर शिफारस.

'असली पुस्तकं वाचून काय होताय सर ! बर, येते मी !' पायात चपला सरकवून जाता जाता नंदाने घेतलेला निरोप.

नंदाने मी सांगितलेल्या पुस्तकाबद्दल फारशी जिज्ञासा दाखवली नाही. कदाचित तिला मनापासून असे वाटत असेल की, अशी पुस्तके काही कामाची नसतात किंवा माझ्याकडून उघडपणे ते पुस्तक वाचायला नेण्याचा तिला संकोच वाटला असेल ते काहीही असो, तो गेल्यावर मी मात्र ठरवले की, लेखकाने मला प्रेमाने भेट दिलेल्या व आपल्याकडे दुर्मिळ असलेल्या या ग्रंथचिंतामणीची ओळख नंदासारख्या अनेक जणींना करून द्यायला हवी आणि म्हणून नंदाची पाठ वळल्यावर लगेच मी हा लेख लिहायला घेतला !

१९६३ सालची गोष्ट आज ज्याला स्त्री–मुक्ती आंदोलन म्हणतात ते त्या वेळी उदयास आलेले नव्हते असे म्हटले तरी चालेल. अशा वेळी न्यूयॉर्क शहरातील दि इन्स्टिटयूट फॉर रॅशनल लिव्हिंग व आज जिला दि इन्स्टिटयूट फॉर रॅशनल-इमोटिव्ह थेरपी असे म्हणतात अशा दोन संलग्न संस्थांचे कार्यकारी संचालक व ख्यातनाम मानसोपचारतज्ज्ञ डॉ अल्बर्ट एलिस यांच्या एका पुस्तकाची पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाली त्या पुस्तकाचे नाव होते The Intelligent Woman's Guide to Man–Hunting. म्हणजे, 'पुरुषांना कसे गटवावे ? चतुर स्त्रियांसाठी मार्गदीपिका !' त्यापूर्वी सुप्रसिद्ध आंग्ल नाटककार जॉर्ज बर्नार्ड शॉ यांनी लिहिलेले An Intelligent Woman's Guide to Socialism म्हणजे 'बुद्धिमान स्त्रियांसाठी समाजवादाचा ओनामा !' हे पुस्तक लोकांना परिचयाचे झाले होते; परंतु डॉ. अल्बर्ट एलिस यांनी बुद्धिमान स्त्रियांसाठी विषय निवडला तो हा असा म्हणजे स्त्रियांना अधिक जवळचा वाटावा असा तऱ्हेचा. वरवर पाहता फाजील व उथळ वाटणाऱ्या या पुस्तकात पुढे ज्याला स्त्री–मुक्ती आंदोलन म्हटले गेले त्याची बीजे विखुरलेली दिसतात. कारण या पुस्तकात एका विद्वान पुरुष मानसशास्त्रज्ञाने मुख्यतः स्त्रियांच्या समान हक्कांचा हिरीरीने केलेला पुरस्कार वाचायला मिळतो.

स्त्रियांनी मनपसंत जोडीदार कसा मिळवावा या विषयावर याहीपूर्वी पुस्तके प्रसिद्ध झाली नव्हती असे नाही, परंतु आपल्या या विलक्षण पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत डॉ. एलिस प्रथमच सांगून टाकतात की, या विषयावरील पूर्वीची बहुतेक सर्व पुस्तके स्त्रियांना फारशी उपयुक्त ठरली नाहीत. कारण ती सर्व पुस्तके स्त्रियांनी लिहिलेली होती आणि पुरुषांच्या मनात काय असते ते हेरून त्याला खूप कसे करावे हे चतुर स्त्री–लेखिकेने

कितीही रंजक व रोमांचकारी भाषेत इतर स्त्रियाना सागितले तरी त्याचा काय उपयोग ? कारण कितीही चतुर स्त्री झाली तरी पुरुषांच्या मनातील खास इच्छा-आकाक्षा ती विचारी स्त्री–लेखिका कशी ओळखणार ? तेव्हा आता पुरुषानेच त्यासंबधी सविस्तरपणे लिहिण्याची जरुरी आहे. या पुस्तकाचे वैशिष्टय असे की, अखेर एकदाचे एका पुरुषाने या पुस्तकात स्त्रियानी पुरुषाला कसे गाठावे व गटवावे ते स्पष्टपणे सागून टाकले आहे अर्थात याचा परिणाम असाही होईल की ज्या स्त्रिया हे पुस्तक वाचतील त्यापैकी कित्येकांना या पुस्तकातील काही गोष्टी अजिबात रुचणार नाहीत किंवा काहीना या गोष्टीचा तर तिटकाराच वाटेल; परंतु काय करणार ? गुणकारी औषध कडूसर असले तरी गुणकारी असल्यामुळे ते घ्यावेच लागते ना ? शिवाय, या विषयावर पुस्तक वाचावयाची इच्छा व हिंमत असलेल्या बुद्धिमान स्त्रियासाठीच हे पुस्तक लिहिलेले आहे.

असे हे चाकोरीबाहेरचे पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर व्हायचे तेच झाले. म्हणजे असे की Sex Without Guilt किंवा The American Sexual Tragedy अशी काही पुस्तके व लैंगिक विषयावरील अनेक स्फोटक लेख प्रसिद्ध केल्यामुळे डॉ. एलिस यानी जी दुष्कीर्ती सपादन केली होती त्या त्याच्या दुष्कीर्तीत अधिकच भर पडली. पुरुषानी मेजवानीच्या प्रसगी, वाचनालयात, बागेत, बाजारात किंवा अगदी रस्त्यात स्त्रियाना गाठून ओळख करून घ्यावी व ती वाढवावी ही गोष्ट जर सामाजिक रूढीच्या चौकटीत बसते तर स्त्रियांनीही पुढाकार घेऊन पुरुषांशी ओळख करून घेण्याचा व ती ओळख वाढविण्याचा तसाच खुल्लम् खुल्ला मार्ग अवलवला तर त्यात काहीच वावगे नाही; नव्हे तसे करणे हा त्याचा हक्कच आहे अशा तऱ्हेचे मार्गदर्शन करणाऱ्या या 'दीपिके'वर केवळ टीकाकारांनीच नव्हे तर डॉ. एलिस याच्या काही व्यवसायबंधूनीही टीकेची सरबत्ती केली; परतु स्त्रियानी मात्र या पुस्तकाला छान प्रतिसाद दिला. असंख्य स्त्रियानी हे पुस्तक वाचले; इतकेच नव्हे तर त्यापैकी कित्येकीना बहुमोल मार्गदर्शन मिळाले असे हळूहळू लक्षात येऊ लागले.

याचा परिणाम असा झाला की, हे पुस्तक दुर्मिळ होऊन बसले सुमारे पंधरा वर्षांनतर म्हणजे १९७९ साली डॉ. एलिस यानी वेळात वेळ काढून या पुस्तकाची सुधारून लिहिलेली दुसरी आवृत्ती प्रसिद्ध केली नव्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत डॉ. एलिस आवर्जून सागतात. की, त्यानी चाळीसहून अधिक पुस्तके लिहिलेली असली तरी त्याच्या या पुस्तकाचे वाचकानी जेवढया उत्साहाने स्वागत केले तेवढे दुसऱ्या कोणत्याच पुस्तकाचे केले नाही आणि तरीही या पुस्तकाची दुसरी आवृत्ती निघण्यास इतकी वर्षे लागली याला ते अनेक कारणे देतात. त्यापैकी पहिले असे की, आजच्या अमेरिकेत विवाह व लैंगिक जीवन या क्षेत्रात जी क्रांती झालेली दिसत आहे व जिला सुरुवात करण्याच्या कामाला डॉ. एलिस यानी सुमारे पचवीस वर्षांपूर्वी फार मोठे सहाय्य केले, त्या क्रांतीमुळे आजच्या अमेरिकेत वैवाहिक व लैंगिक जीवनात बराच बदल घडून आलेला आहे आणि म्हणून या पुस्तकाच्या मूळ आवृत्तीत बरेच फेरफार करणे क्रमप्राप्त होते परिणामी नवी सुधारित आवृत्ती प्रसिद्ध करण्यास इतका प्रदीर्घ कालावधी लागला.

या पुस्तकाची पहिली व दुसरी आवृत्ती प्रसिद्ध होण्याच्या दरम्यान जी पंधरा वर्षे लोटली त्यात अमेरिकेतील सामाजिक जीवनात मुख्यत. जे बदल झाल्याचे दिसून येतात त्यापैकी पहिला बदल असा की, १९६३ सालच्या सुमारास स्त्रियाना पुरुषाशी ओळख करून घ्यावी व वाटल्यास ती वाढवावी असे वाटत असे तेव्हा त्याच्या मनात अखेर आपल्या मनपसत जोडीदारावरोवर विवाह करून ससार करण्याचा उद्देश असे. कालातराने अशा स्त्रियाच्या जोडीला स्त्रियाच्या एका नव्या वर्गाची वाढ होत गेली या नव्या वर्गातील स्त्रियाना पुरुषावरोबर मैत्री व लैंगिक संबध हवे असतात तरी त्याना पुरुषाबरोबर लग्न करून ससार करण्याची इच्छा नसते. याचा अर्थ असा नाही की, अमेरिकेत आज या दुसऱ्या वर्गातील स्त्रिया बहुसंख्य आहेत किंवा आजच्या सर्वसामान्य स्त्रीला विवाह व संसार नको आहे. फक्त इतकेच म्हणता येईल की, पुरुषाना कसे गाठावे व गटवावे या विषयावर जर कोणी स्त्रियाना सल्ला देऊ इच्छित असेल तर त्याने या दुसऱ्या गटातील स्त्रियाकडे दुर्लक्ष करून आपला वाचकवर्ग विनाकारण थोडासा मर्यादित करू नये ! तेव्हा नव्या आवृत्तीच्या निमित्ताने डॉ. एलिस याना आपल्या या पुस्तकाचे पुन्हा एकंदा बारसे करण्याची सधी मिळाली तिचा त्यानी पुरेपूर उपयोग करून घेतला व सुधारित स्वरूपात प्रसिद्ध झालेल्या या पुस्तकाचे नाव ठेवले The Intelligent Woman's Guide to Dating and Mating !

डॉ एलिस याच्या मते पंधरा वर्षांत झालेला दुसरा बदल असा की, १९६० सालानतर अमेरिकेतील स्त्रियामधील समलिंगी सभोगाचे अस्तित्व व प्रमाण या गोष्टीबद्दलची माहिती सर्वत्र उघडपणे उपलब्ध होऊ लागली. किंबहुना पुरुषामधील समलिंगी सभोगाप्रमाणेच स्त्रियामधील समलिंगी सभोगालाही समाजात मान्यता मिळत गेली. याचा अर्थ असा की, स्त्रियाना जोडीदार कसा गाठावा व गटवावा या कलेचे धडे देणाऱ्याने 'जोडीदार' स्त्रीही असू शकते हे ध्यानात ठेवलेले बरे !

### स्त्रियांकडून उत्तम प्रतिसाद

अमेरिकेतील सामाजिक जीवनात मध्यंतरीच्या १५ वर्षांत झालेला तिसरा बदल म्हणजे या पुस्तकाची पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाली त्या वेळी स्त्री-मुक्ती आदोलन जवळजवळ अस्तित्वातच नव्हते. उलट, १९७९ साली दुसरी आवृत्ती प्रसिद्ध झाली तेव्हा स्त्री-मुक्तीची चळवळ अमेरिकेतील सर्व क्षेत्रात दृढमूल झालेली होती. डॉ एलिस म्हणतात की, स्त्री-मुक्तीची चळवळ अशी प्रभावी झाली हे फारच छान झाले; कारण ते स्वत: सर्व क्षेत्रात स्त्रियाना समान हक्क असले पाहिजेत या मताचे पूर्वीपासूनच खदे पुरस्कर्ते आहेत, परंतु ते असेही म्हणतात की, कितीही उदारमतवादी असले तरी अखेर ते एक पुरुष आहेत व त्यामुळे पुरुष स्त्रीहून श्रेष्ठ असल्याचा थोडा तरी अहंकार त्याच्या मनाच्या खोल कप्प्यात कोठे तरी दडून बसलेला असण्याची शक्यता नाकारता येणार नाही साहजिकच आत्मश्रेष्ठत्वाच्या या पुरुषी अहकारामुळे त्याचे विचार थोडे पूर्वग्रहदूषित व एकागी असणे सहज शक्य आहे तेव्हा त्याच्या पुस्तकातील या उणीवेची भरपाई करण्यासाठी त्यानी दुसऱ्या सुधारित आवृत्तीला 'उपोद्घात' लिहिण्यास सागितले ते एका स्त्रीला ! ती स्त्री म्हणजे जेनेट वॉल्फ, पीएच. डी. ही विदुषी स्त्री-मुक्ती चळवळीची कट्टर व सक्रीय पुरस्कर्ती तर आहेच; परतु ती व्यवसायाने मानसो-

पचारतज्ञ असून न्यूयॉर्क शहरातील दि इन्स्टिटयूट फॉर रॅशनल लिव्हिंग व दि इन्स्टिटयूट फॉर रॅशनल-इमोटिव्ह थेरपी या दोन संलग्न संस्थांची सहायक कार्यकारी संचालकही आहे. स्त्री-स्वातंत्र्याची ही बाणेदार पुरस्कर्ती दुसऱ्या आवृत्तीच्या उपोद्घातात म्हणते की, या पुस्तकाची पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाल्यानंतर तिच्याकडे ज्या स्त्रिया मानसोपचार करून घेण्यासाठी आल्या त्यापैकी कित्येकींना तिने हे पुस्तक वाचण्याची शिफारस केली आणि आश्चर्य म्हणजे तिने स्त्रियांना जी काही पुस्तके वाचण्याची शिफारस केली त्यापैकी स्त्रियांना आवडलेले व सर्वांत उपयुक्त वाटलेले पुस्तक म्हणजे मनपसंत जोडीदार कसा गाठावा व गटवावा या विषयावरील एका पुरुषाने लिहिलेले हे पुस्तक ! ही विदुषी पुढे असेही म्हणते की, पहिल्या आवृत्तीच्या प्रकाशनाचे वर्ष व लेखकाचे नाव न समजता हे पुस्तक कोणी वाचले तर त्याचा नक्कीच असा समज होईल की, पुस्तक स्त्रीस्वातंत्र्याच्या एखाद्या तेजस्वी पुरस्कर्तीने बहुधा १९७० सालानंतर केव्हा तरी लिहिले असावे आणि आता नव्या आवृत्तीच्या स्वरूपातील हे पुस्तक म्हणजे तर स्त्रियांना लाभलेली एक बहुमोल देणगीच आहे असे म्हणावे लागेल. स्त्रियांच्या समान हक्कासाठी सतत क्रियाशील असणाऱ्या एका विदुषीने एका पुरुषाने १९६३ साली लिहिलेल्या एका पुस्तकावर असा अभिप्राय द्यावा, हा त्या पुरुष लेखकाचा मोठा गौरवच आहे !

### तात्त्विक बैठक–तांत्रिक मार्गदर्शन

सुधारित स्वरूपात प्रसिद्ध झालेल्या या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या अंतरंगाबद्दल अगदी थोडक्यात सांगायचे झाले तर असे म्हणता येईल की,या पुस्तकाचे दोन भाग कल्पिता येतील पहिला भाग म्हणजे,स्त्रियांना जोडीदार गाठण्याच्या व गटवण्याच्या कलेची तात्त्विक बैठक आणि दुसरा भाग म्हणजे त्या कलेची तांत्रिक बाजू. आपण स्वत च पुढाकार घेऊन जोडीदार शोधण्याची खटपट करणे यात कोणताही चवचालपणा नाही व तसे करण्यात आपल्याला काही वैयक्तिक व सामाजिक संकोच किंवा भीति वाटत असेल तर त्यामुळे आपलेच नुकसान होणार आहे, हे स्त्रियांना पटवून देणे हा झाला या पुस्तकाचा तात्त्विक भाग आणि स्त्रियांच्या मनातील याविषयीचे संकोच व भीती याचे समूळ उच्चाटन करून त्यांना योग्य जोडीदार कोठे, केव्हा व कसा गाठावा व गटवावा यासंबंधीच्या क्लृप्त्यांची माहिती करून देणे, हा झाला या पुस्तकाचा तांत्रिक भाग अर्थात पुस्तकाच्या अंतरंगाचे हे 'वर्गीकरण मी केवळ सोयीसाठी केले आहे प्रत्यक्ष पुस्तकात या विषयाच्या तात्त्विक व तांत्रिक बाजू डॉ. एलिस यांनी सारख्याच खेळकरपणे हाताळलेल्या दिसतात.

आता मी सोयीसाठी कल्पिलेल्या पहिल्या म्हणजे तात्त्विक भागाचा परिचय करून घेऊ या. समजा, नंदासारख्या एखाद्या मुलीने हे पुस्तक वाचले तर तिला काय फायदा होईल ? या पुस्तकाचे वाचन करून नंदासारख्या मुलीला पहिली गोष्ट अशी शिकता येईल की, आपण स्त्री असलो तरी एखाद्या पुरुषाची ओळख करून घेण्यासाठी पुढाकार घेणे यात काहीच गैर नाही. कित्येकदा नंदासारख्या सुशिक्षित मुलीला पुरुषाशी आपणहून ओळख करून घेण्यात जरी काही वावगे वाटत नसले तरी त्यांना अशी भीती वाटत असते की, जर आपण खरोखरच या दृष्टीने काही पावले टाकली तर अगदी थोडया अवधीतच आपल्या घरचे लोक, नातेवाईक, शेजारी-पाजारी व इतर स्त्रिया आपल्याला एक 'चालू' मुलगी समजतील आणि अशा विचारामुळे नंदासारख्या मुली चिंताग्रस्त न होतील तरच नवल ! शिवाय, या चिंतेमुळे हैराण झालेल्या मुली सहाजिकच सदोदित दबून-दबकून वागतील कारण सरळ, सोज्वळ, गृहकृत्यात दक्ष व सुसंस्कृत घरातील मुलीने कसे वागावे यासंबधीचे सामाजिक संकेत त्यांना गुदमरवून टाकतात. या सगळयाचा परिणाम असा होतो की, त्यांना हवाहवासा वाटणारा संभाव्य जोडीदार अगदी त्यांच्या समोरच्या घरात राहत असला तरी त्याने पुढाकार घेतल्याशिवाय त्याच्याशी अशा मुलींची साधी ओळखही होत नाही.

नंदासारख्या मुलींच्या या समस्येकडे डॉ एलिस कोणत्या दृष्टिकोणातून पाहतात हे समजावून घेण्यासाठी नंदाचेच उदाहरण घेऊ. समजा, नंदाच्या एका मैत्रिणीचा वाढदिवस आहे व त्या मैत्रिणीने आपल्या घरी संध्याकाळी काही मित्र-मैत्रिणींना बोलावले आहे. नंदा संध्याकाळी त्या मैत्रिणीकडे जाते त्या वेळी जवळजवळ वीस तरुण-तरुणींच्या घोळक्यात असूनही ती गप्पगप्पच असते. जर आपणहून कोणी तिच्याशी बोललेच तर ती बोलते व तेही अगदी मोजके. असे का होते ?

तरुण-तरुणींच्या सहवासात असताना केव्हा तरी नंदाच्या मनात 'अ' या टप्प्यावर जरूर असा विचार येतो की, कोणी मुलाने आपल्याशी बोलायला सुरुवात करण्याची वाट पाहण्याऐवजी आपणच पुढाकार घेऊन चार मुलांशी ओळखी करून घ्यायला काय हरकत आहे ? परंतु असा विचार मनात आल्याबरोबर क्षणार्धात 'ब' या टप्प्यावर नंदा मनातल्या मनात स्वत.ला सांगू लागते, 'नको बाई ! उद्या माझी ही मैत्रीण व यांपैकी काही मुलेही मला निर्लज्ज, चवचाल नाही तर 'चालू' मुलगी समजू लागली...आणि मग हळूहळू माझ्याबद्दल असा बोभाटा सर्वत्र पसरला तर...तर मला त्या परिस्थितीला तोंड देणे अशक्य होईल शिवाय समजा, पुढाकार घेऊन यांपैकी एखाद्या मुलाशी मी आपणहून बोलायला गेले व जर तो मुलगा माझ्याशी नीट बोलला नाही किंवा त्याला माझे वागणे पसंत पडले नाही तर ..बाप रे ! केवढा भयंकर अपमान होऊन मी पराजित होईन...त्यामुळे मी अगदी कुचकामी किंवा कवडीमोल असल्याचे सिद्ध होईल...' नंदाने स्वत.च्या मनात अशा तऱ्हेच्या विचारांना थारा दिला की, 'क' या टप्प्यावर ती अस्वस्थ व चिंताग्रस्त होते आणि अस्वस्थ करणाऱ्या या चिंतेचे निर्मूलन करण्याचा मार्ग म्हणून ती अगदी सोज्वळपणे दबून-दबकून वागते; म्हणजे उगीच नको कोणी टीका करायला अन् कोणी अपमान करायला !

'ब' या टप्प्यावर नंदा स्वत.ला वरील तऱ्हेची जी वाक्ये सांगते त्या वाक्यांचा काळजीपूर्वक अभ्यास केला तर असे दिसून येईल की, त्या वाक्यांच्या मुळाशी नंदाच्या मनात खोलवर रुजलेल्या काही अविवेकी कल्पना आहेत. उदाहरणार्थ, वरील वाक्यांच्या मुळाशी दोन अविवेकी कल्पना संभवतात. पहिली अशी की, लोकांनी मला निर्लज्ज किंवा 'चालू' मुलगी समजणे ही एक महाभयंकर आपत्ती आहे; व दुसरी अविवेकी कल्पना अशी की, माझे धीट वर्तन एखाद्या मुलाला पसंत पडले नाही तर माझा घनघोर अपमान व पराजय होईल व त्यावरून मी नालायक असल्याचे सिद्ध होईल जी कोणी स्त्री या दोन कल्पना उराशी घट्ट कवटाळून बसेल तिला मनासंत

जोडीदार गाठणे व गटवणे अशक्यप्राय वाटेल, यांत काय आश्चर्य ? कारण, अशी स्त्री जीवन जगताना आपल्याला आयुष्यात काय हवे आहे व ते कसे मिळवावे या रास्त प्रश्नाचा विचार करण्याऐवजी आपण काय करणे इतराकडून अपेक्षित आहे व ते करण्याचा कोणता मार्ग इतराना समत होईल याच प्रश्नाच्या ओझ्याखाली दबून जाईल व त्यामुळे प्रसंगी अगदी परीकथेतील राजपुत्र शोभावा असा पुरुष समोर दिसत असला तरी त्या सुवर्णसंधीचा लाभ उठवणे तिला अशक्य होईल. साराश, ज्या कोणा स्त्रीला आपल्या इच्छेप्रमाणे जीवन जगायचे असेल व आपल्या मनाजोगता जोडीदार निवडायचा असेल तिला दोन बागुलबुवांशी सामना करावा लागेल पहिला बागुलबुवा म्हणजे, लोक काय म्हणतील याची भीति; आणि दुसरा बागुलबुवा म्हणजे, पराजयाची धास्ती ! या दोन्ही बागुलबुवाशी मुकाबला करायचा म्हणजे कोणत्याही बागुलबुवाशी मुकाबला करण्याच्याच तंत्राचा अवलंब करायचा ते तत्र म्हणजे, आपल्यासमोर उभा ठाकलेला राक्षस हा राक्षस नसून तो बागुलबुवाच आहे, हे स्वत च्या मनाला पूर्णपणे समजावून देणे.

हे काम चोखपण करण्यासाठी डॉ. एलिस नंदाला 'ड' या टप्प्यावर एका प्रभावी तंत्राचा उपयोग करण्यास शिकवतात ते तत्र म्हणजे 'ब' या टप्प्यावर नंदाच्या मनात घोळणाऱ्या विचाराची निर्भीडपणे तर्कशुद्ध पद्धतीने कसून छाननी करणे उदाहरणार्थ, नदाने 'ड' या टप्प्यावर स्वत ला सतत पुढील प्रश्न विचारायला शिकले पाहिजे ओळख करून घेण्यासाठी नेहमी फक्त पुरुषानेच पुढाकार घ्यायला हवा असे कोणत्या महान ग्रंथात कोणी लिहून ठेवले आहे ? केवळ मी पुढाकार घेऊन स्वत हूनच काही मुलाशी बोलले तर माझ्या मैत्रिणीसकट इतर काही लोक मला निर्लज्ज, किंवा 'चालू' मुलगी म्हणतील असे समजण्यास कोणता पुरावा आहे ? आणि समजा, काही लोकाना तसे वाटले व त्यानी माझ्याबद्दल तसा काही बोभाटा केलाच तर अशी कोणती परिस्थिती निर्माण होईल की जिला तोड देणे मला अशक्य होईल ? एखाद्या मुलाला माझे वागणे आवडले नाही व म्हणून त्याने माझ्याकडे दुर्लक्ष केले तर त्यामुळे माझा भयंकर अपमान किंवा पराजय होईल व त्यामुळे मी कुचकामी किंवा कवडीमोल मुलगी ठरेन, असा निष्कर्ष काढण्यास कोणता वस्तुनिष्ठ आधार देता येईल ?

जर खरोखरच नंदा 'ड' या टप्प्यावर वरील तऱ्हेचे प्रश्न नेटाने विचारून त्याची तर्कशुद्ध उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करील तर ती 'इ' हा टप्पा गाठेल. म्हणजे 'इ' या टप्प्यावर तिची खात्री पटेल की, ओळख करून घेण्यासाठी नेहमी पुरुषानेच पुढाकार घेतला पाहिजे असा कोणताही त्रिकालाबाधित सिद्धात अस्तित्वात नाही. मी पुढाकार घेऊन स्वत च एखाद्या मुलाशी बोलण्यास सुरुवात केली तर माझ्या मैत्रिणीसकट इतर काही लोक मला निर्लज्ज, किंवा 'चालू' मुलगी समजतील असे वाटत नाही आणि जरी काही लोकांना तसे वाटले व त्यानी माझ्याबद्दल तसा काही गैरसमज पसरवलाच तर त्यामुळे अशी कोणतीही परिस्थिती निर्माण होणार नाही की, जिला मी तोड देऊ शकणार नाही एखाद्या मुलाला माझे वागणे रुचले नाही तर त्यावरून फार तर असे म्हणता येईल की, त्याची विचारसरणी माझ्या विचारसरणीहून भिन्न आहे असो. बापडी ! परंतु त्याला माझे वागणे न आवडल्यामुळे त्याने माझ्याकडे दुर्लक्ष केले म्हणून माझा काही भयंकर अपमान होणार नाही व त्यावरून मी एक कुचकामी किंवा कवडीमोल मुलगी आहे, असे सिद्ध होणार नाही.

एकदा का म्हणता नंदाने आपल्या अविवेकी विचाराना व त्या विचाराच्या मुळाशी रुजलेल्या अविवेकी कल्पनाना अर्धचंद्र दिला की तिला चिंताग्रस्त व अस्वस्थ करणाऱ्या दोन्ही बागुलबुवाचा नि:पात होण्यास वेळ लागणार नाही मात्र लोक काय म्हणतील याची भीती व पराजित होण्याची धास्ती या दोन्ही बागुलबुवाचे नदाने वेळीच पारिपत्य करून टाकले नाही तर तिची चिंताव्यग्रता अधिकच वाढत जाईल. कारण या दोन्ही बागुलबुवानी माणसाच्या मनात एकदा का म्हणता प्रस्थान ठोकले की ते आपले काम कसे फत्ते करतात ते पाहा.

नंदा बी ए. होऊन जवळजवळ तीन वर्षे झाली आहेत व तिचे वय आता चोवीसच्या घरात आहे तेव्हा तिला असेही वाटू लागले की 'इतकी वर्षे आपले लग्न जमत नाही ... अशीच आणखी काही वर्षे गेली तर लोक म्हणतील ... ही बहुधा आता आजन्म कुमारीच राहणार ! बाप रे ! आणि इतकी वर्षे माझे लग्न जमले नाही...व समजा कधीच जमले नाही तर ... तर तो माझा मोठा पराजयच म्हणावा लागेल ! छे छे ! मला ती कल्पनाच सहन होत नाही...' अशा तऱ्हेच्या विचारानी नदा इतकी भयभीत होऊन जाईल की, तिची अस्वस्थता अधिकच वाढेल आणि मग न जाणो, एखादा अनुरुप जोडीदार गाठण्यासाठी चातुर्याने व विचारपूर्वक काही प्रयत्न करण्याऐवजी ती बावळटपणे काही तरीच मार्ग चोखाळेल किंवा आता समोर येईल त्या पहिल्या स्थळाला घाईघाईने होकार देऊन बसेल !

## स्त्री मुक्तीचा खरा मार्ग

परंतु नंदाने स्वत.च्या मनातील वाक्याची व कल्पनाची तर्कशुद्धपणे छाननी करून लोक काय म्हणतील याबद्दलची अवास्तव भीति व पराजयाची धास्ती या दोन्ही बागुलबुवाचा नायनाट केला तर ती खऱ्या अर्थाने विमुक्त किंवा स्वतंत्र स्त्री होईल व मग नि:संकोचपणे स्वत च्या मनाप्रमाणे आपले जीवन जगण्यास ती समर्थ होईल. असे जीवन जर तिला मनपसंत जोडीदाराबरोबर जगता आले तर उत्तमच; मनासारखा जोडीदार मिळाला नाहीच किंवा मुळी जन्माचा जोडीदार नकोच, असे तिला वाटले तरी ती आपले स्वत.चे एकटीचे जीवन आनंदी व सुखी करू शकेल.

या सर्व विवेचनाचे सार म्हणून असे म्हणता येईल की, कोणत्याही परिस्थितीत आपण स्वत ला कुचकामी किंवा नालायक लेखणे अविवेकी व आत्मघातकी आहे. आपल्या जीवनात आपल्याला काय करायचे आहे व काय करायचे नाही, हे ठरवण्याचा आपल्याला अधिकार आहे आपण जे काही करू त्यात प्रसगी आपल्याला अपयश आले तरी त्यामुळे व्यक्ती म्हणून आपण पराजित होऊ शकत नाही; आपण स्वत साठी जोडीदार शोधण्याचा प्रयत्न स्वत च पुढाकार घेऊन करण्यात काहीच गुन्हा नाही, हे सर्व विचार स्त्रियानः समजावून देण्याचा प्रयत्न करणे हा झाला डॉ. एलिस याच्या पुस्तकाचा मी कल्पिलेला तात्त्विक भाग. एकदा एखाद्या स्त्रीला हे विचार पूर्णपणे पटले की मग उरलेले काम त्या मानाने सोपे आहे आणि ते म्हणजे मनपसंत जोडीदार कोठे, कसा गटवावा याची कला

आत्मसात करणे.

या पुस्तकाच्या मी कल्पिलेल्या दुसऱ्या भागात मनपसंत जोडीदार गाठण्याच्या व गटविण्याच्या तंत्राची डॉ एलिस यानी खुमासदार परंतु सुस्पष्ट शैलीत माडणी केली आहे उदाहरणार्थ, मनपसत जोडीदार कोठे शोधावा या प्रश्नाला त्यानी अगदी सरळ व सुटसुटीत उत्तर दिले आहे. ते उत्तर असे की, डोळे उघडे ठेवून चाणाक्षपणे सर्वत्र शोधावा! मित्र-मैत्रिणीच्या मेळाव्यात किंवा मगलकार्यालयात, वाचनालयात किंवा वाटेत, कचेरीत किंवा कोपऱ्यावर, बागेत किंवा बाजारात, कोठेही संभाव्य जोडीदाराशी ओळख करून घेण्यासाठी काय करावे हे सागून डॉ एलिस थाबत नाहीत एकदा ओळखी वाढू लागल्या की, ज्या पुरुषाची जोडीदार म्हणून निवड करायची त्या पुरुषात कोणते गुणविशेष आहेत याची खात्री करून घेणे उपयुक्त ठरेल. याबद्दलही ते मौलिक मार्गदर्शन करतात आपण निवडलेल्या जोडीदाराला विवाह करण्याची इच्छा आहे का? तो उदारमतवादी आहे का? त्याच्यात व आपल्यात लैंगिक सुखाच्या इच्छेप्रमाणेच इतर काही महत्त्वाच्या बाबतीत काही साधर्म्य आहे का? या प्रश्नाचा विचार करणे जरुरीचे आहे, हे सागून डॉ एलिस असेही म्हणतात की, स्त्रियानी आणखीही एका महत्त्वाच्या बाबतीत आपल्या जोडीदाराच्या स्वभावाचा अभ्यास करणे श्रेयस्कर ठरते. आणि जोडीदाराच्या स्वभावातील तो गुणविशेष म्हणजे, त्याचा भावनिक समतोल. अर्थात, एखाद्या स्त्रीने निवडलेला जोडीदार सर्व माणसाप्रमाणेच भावनिकदृष्ट्या कमी-अधिक प्रमाणात बिथरलेला असणाराच; परतु तो भावनिकदृष्ट्या फारच अपरिपक्व असेल तर त्याचा नाद सोडावा हेच उत्तम, असा नि:सदिग्ध सल्ला देण्यासही डॉ. एलिस कचरत नाहीत.

अखेर समजा, आपल्याला अगदी हवा तसा जोडीदार स्त्रीला आपल्या मायाजाळात गुरफटवता आला तर पुढची पायरी म्हणजे, त्याला खूष ठेवून आपला जीवनसाथी म्हणून त्याचा स्वीकार करणे. यासाठी प्रथम स्त्रियानी धूर्तपणे पुरुषाना स्त्रियाकडून काय हवे असते ते नीट समजावून घेतले पाहिजे. डॉ. एलिस म्हणतात की, या बाबतीत एक खेदजनक गोष्ट वारंवार प्रत्ययास येते. ती अशी की, पुरुषाना स्त्रियाकडून काय हवे असते याबद्दलच्या स्त्रियाच्या कल्पना व खरोखरच पुरुषाना स्त्रियाकडून काय हवे असते यात बरीच तफावत आढळून येते अनेकदा स्त्रियाना वाटते की, पुरुषाना स्त्रियाकडून लैंगिक सुखापेक्षा गाढ प्रीतीची अपेक्षा असते दुर्दैवाने प्रत्यक्षात अशा स्त्रियाचा भ्रमनिरास होतो. कारण त्याना कळते की, कित्येकदा पुरुषाची लैंगिक भूकच अधिक तीव्र असते! साराश, धूर्त स्त्रियानी पुरुषाना स्त्रियाकडून काय हवे असते याबाबतच्या आपल्या कल्पना एकदा काळजीपूर्वक तपासून पाहाव्यात, म्हणजे असे निराशजनक प्रसग त्याच्यावर येणार नाहीत किंवा निदान कमी वेळा येतील. गळाला लागलेल्या आपल्या प्रियकराला खूष कसे ठेवावे याचे डॉ. एलिस यानी दिलेले सोपे उत्तर म्हणजे—सर्वतोपरीने व सर्वांगानी!

पुरुषाना वश करून घेण्याच्या कलेवरील डॉ एलिस यानी लिहिलेल्या मनोरंजक व उद्बोधक पुस्तकाचे अंतरंग असे अनंतरगी (व अनगरगी!) आहे त्याच्या सर्वांगाचा परिचय एका लेखात करून देणे हे अर्थातच अशक्य आहे; परंतु ज्या स्त्रियाना आपला जीवनसाथी आपणच पुढाकार घेऊन शोधून काढायची भीती वाटते त्याना हा लेख वाचल्यामुळे निदान मूळ पुस्तक नि:सकोचपणे वाचावे असे वाटले तरी हा लेख लिहिण्याचे चीज झाले असे मला वाटेल. स्त्रियानी मूळ पुस्तक वाचल्यावर, न जाणो त्याच्यापैकी काहीजणीना एका उपयुक्त कलेचे शिक्षण घेण्याचा मोह झाला तर मग जी जे वाछील ते ते...येवढीच सदिच्छा! □

---

श्यामचा संसार (कथा चोवीसवी)

फिरोज रानडे

# "आता हिन्दू राहू नका!"

'काय मद्रासच्या भागात चाललय बघा. शेकड्यानी आपले हरिजन मुसलमान होताहेत!' कामत कळवळून म्हणाला.

येत्या गणेश-उत्सवाचा कार्यक्रम ठरवण्याकरता श्यामच्या हौसिंग सोसायटीच्या कार्यकारी मडळाची बैठक होती रात्री जेवून-खाऊन साडेआठ-नऊ वाजता सर्व सभासदानी यावे, अशी सर्वांना विनती करण्यात आली होती; पण नेहमीप्रमाणे विनंतीला मान देणारे फार थोडे निघाले होते. कार्यकारी मंडळाच्या बारा कार्य करणाऱ्यापैकी फक्त कामत, बर्वे, श्याम व लिमये एवढीच मंडळी नऊ वाजेपर्यंत आली होती. बाकी मडळी व मुख्यत: अध्यक्षमहाराज आल्याशिवाय सभेला सुरुवात होणे शक्यच नव्हते. अध्यक्षमहाराज आले की सभेला कोरम नावाची काही गोष्ट असते हे लोक विसरून जाणार होते तेव्हा मुख्य विषयावर म्हणजे गणपतीउत्सवाच्या कार्यक्रमाबद्दल काही बोलणे शक्य नव्हते. तेव्हा कोणी काही, कोणी काही विषयावर बोलत असता 'काय मद्रासच्या भागात चाललय बघा, शेकड्याने हरिजन मुसलमान होत आहेत!' असे कामत कळवळून म्हणाला होता

कामत नुकताच लग्न झालेला चोवीस-पंचवीस वर्षांचा तरुण होता म्हणून मडळाचा चिटणीस व एक उत्साही कार्यकर्ता होता. तो तरुण होता म्हणून अशा प्रत्यक्ष सबंध नसलेल्या गोष्टीनीही त्याचे मन कळवळायचे. अफगाणिस्थानात रशियन फौजा शिरल्या, हे वाचून तो असाच कळवळला होता आयर्लंडमध्ये दर दोन-चार दिवसानी एक देशभक्त उपास करून प्राणत्याग करतो आहे, हे वाचून त्याचे मन नुसतेच भडभडून आले नव्हते, तर तो म्हणाला होता, 'आता हिन्दुस्थानातले

सगळे गांधीवादी उपास न करताच मेले की काय ? येथे साले गायीकरता नि बैलाकरता भाकड उपास करत असतात व उपासाची मोठी गोडवी गात असतात पंतप्रधानांनी कोणाला फळाचा रस देताच तो पिऊन परत साले उपास करायला तयार.! तो एक विचारा,आन्ध्र व्हावा म्हणून जिवाला मुकला,पण तो सोडून बाकी साले कधी कोणी मेले आहेत ? निदान आयर्लंडच्या देशभक्ताकरता एक दिवसाचा तरी उपास करावयाचा !'

त्या गटात बर्वे प्रज्ञा स्थिरावल्यापैकी होते. त्यांचे वयही त्याच गटातले होते आयुष्याचे पंचावन्न-साठ पावसाळे त्यांनी पाहिले असल्यामुळे त्यांना कोणत्याही गोष्टीचे तडफडून काही वाटत नसे. त्यातून त्या पंचावन्न साठ पावसाळयातले तीस-पस्तीस पावसाळे त्यांनी ओल्ड-कस्टम हाउसच्या दुसऱ्या मजल्यावरच्या खिडकीतून पाहिले होते. त्यामुळे त्यांनी प्रत्यक्षात फक्त पंचवीसएक पावसाळे पाहिले होते. त्या वेळी त्यांच्या हेड-क्लार्कने त्यांना एक गुरुमंत्र दिला होता तो म्हणजे जोपर्यंत तुमच्यासमोर कोणत्याही विषयाची 'फाईल' येत नाही तोपर्यंत त्या गोष्टीबद्दल विचार करू नका वा त्यावद्दल बोलू नका. अर्थात मद्रासकडल्या हरिजनावद्दल कोणतीही फाइल त्यांच्यासमोर आली नव्हती. त्यामुळे त्यांनी त्याचा विचार केला नव्हता.

त्यांच्या हेड-क्लार्कने दिलेला सल्ला त्यांनी कामतला पण देऊन पाहिला होता,पण कामतला तो पटेना. तो म्हणत असे की, आपल्याला जगात रहावयाचे आहे, देशात रहावयाचे आहे, समाजात रहावयाचे आहे, तर मग असल्या गोष्टीबद्दल समोर फाइल न येताही विचार केला पाहिजे जमले तर काही केले पाहिजे.

'काय मद्रासकडल्या भागात चालले आहे बघा,' असे कामतने म्हणताच बर्वे म्हणाले, 'अहो कामत, आपल्याला करायचंय काय त्यांच्याशी ? झाले पाच-पन्नास हरिजन मुसलमान, तर काय मोठा फरक पडतो आहे ? आणि मुसलमान कोण होताहेत ? खालच्या वर्गाचे हरिजनच ना ? दहा-बारा कोटी आहेत त्यात पाच-पन्नास जास्त.'

'असं म्हणून कसं चालेल ? कामत म्हणतात ते बरोबर आहे. आपण सुशिक्षित व हिन्दु समाजातल्या पुढारलेल्या लोकांनी त्याबाबत बोलल पाहिजे, त्याची काळजी केली पाहिजे' लिमये शांतपणे म्हणाले. लिमयांचे आडनाव लिमये असूनसुद्धा ते मोठ्या समजुतीने व सर्वांना बरोबर घेऊन जाण्याच्या दृष्टीने बोलत असत. त्यावद्दल सर्वांना त्यांचे मोठे कौतुक वाटत असे श्याम तर त्यांना म्हणायचा की, 'लिमये, तुम्ही तुमचे नाव बदला पाहू. डोक्यात राख न घालता शांतपणे व सामोपचाराने तुम्ही वागता, त्याला लिमये हे नाव शोभून दिसत नाही.'

ह्या बोलण्यातली खोच न समजण्याइतके काही लिमये भोळे नव्हते ते नेहमीच्याच शांतपणे विचारत, 'श्यामराव, कोणते आडनाव घेऊ म्हणता ? महाराष्ट्रात असे कोणते नाव आहे की, जे अभिमानाने घेता येईल ?' ह्या प्रश्नामुळे श्यामचे पुढे बोलणेच खुटले.

'पण हा प्रश्न नुसता धार्मिक वा जाति-व्यवस्थेचा नाही ह्या धर्मबदलामागे आर्थिक कारणे आहेत' कर्वेवाईचे कर्वे म्हणाले कर्वे कोणा वर्तमानपत्रात काम करत असल्याकारणाने ते स्वत:ला 'टाइम्स ऑफ इंडिया'च्या श्यामलाल वा गिरीधरलाल जैनसारखा कोणत्याही विषयावर बोलण्याचा हक्क प्राप्त झाला आहे, असे समजत खरे म्हणजे ते त्या वर्तमानपत्राच्या जाहिरात खात्यात काम करत असत, पण आव मात्र असा ! कोणत्याही प्रश्नाला आर्थिक कारण असते, हे त्यांचे सतत टुमणे असे. ते म्हणत, 'प्रथम आर्थिक प्रश्न सोडवा व मग बघा सगळे जाती-जमातीचे प्रश्न सुटतात की नाही ते.'

कामतला कर्व्यांचा फार राग यावयाचा व त्यांच्या आर्थिक कारणाचा तो म्हणवयाचा 'ह्यांचे साल्याचे जाहिरातीचे पैसे गोळा करून करून डोके 'अनार्थिक' म्हणजे अर्थ नसलेले झाले आहे!' पूर्वी म्हणजे फार पूर्वी कर्वे 'अर्धी खाकी' घालणाऱ्यांपैकी होते, हे कामतला माहीत होते तेव्हा कर्व्यांनी आर्थिक टुमणा लावताच तो भडकून म्हणाला,

'आता कोठे गेले सगळे अर्धे-चड्डीवाले ? आध्रला पूर आला त्या वेळी कसे सगळे धावत गेले होते ? आता मद्रासला एवढा महापूर आलाय व सर्व धर्म वाहून जाणारसे वाटते आहे आणि स्वयंसेवक करताहेत काय ? का स्वयंसेवक स्वत चीच सेवा करण्यात गुतले आहेत ?'

'त्यांना कशाला बोल लावता कामत ? हिंदु धर्माचे एवढे चार शंकराचार्य. आता त्यांना कोठे जाग आली आहे ? आता ऑक्टोबरमध्ये ते एकमेकांना भेटणार आहेत म्हणे. त्यानंतर ते काही कार्यक्रम आखणार व मग तो अमलात येणार हिंदु धर्म हा गळती लागलेल्या पिपासारखा आहे गेले शेकडो वर्ष तो गळत चालला आहे. कोणाला त्याची पर्वा आहे ? ना तुम्हा-आम्हाला, ना स्वयंसेवकांना,ना शंकराचार्यांना!' एवढे समजूतदारपणाचे वाक्य अर्थातच लिमयेच बोलले होते श्याम शांतपणे आपल्याशीच विचार करत होता

तेवढ्यात अध्यक्षमहाराज आले. महाराज एका मोठ्या कंपनीत मोठे 'एक्झिक्युटिव्ह' होते त्यांना कंपनीच्या दोन गाड्या होत्या. त्यांचे गाडीवान पांढऱ्याशुभ्र गणवेषात येत असत येतायेताच ते म्हणाले, 'हे काय ? बाकीची मंडळी अजून आली नाहीत ? सॉरी हं, मला उशीर झाला ! टोकियोला 'लाँग डिस्टन्स कॉल' लावला होता म्हटलं, तो मॅच्युअर झाल्यावर जावे मीटिंगला. तो झाला तडक आलो.' तेवढ्यात टोकियोला 'लाँग डिस्टन्स कॉल' न लावलेलेही चार-पाच सभासद आले

श्यामकडे बघून अध्यक्षमहाराज म्हणाले, 'काय दुबईला जाताय म्हणे ?' श्याम कसनुसे हसत म्हणाला 'दुबईला नाही, मस्कत -ओमानला !'

'तेच ते. आम्ही आमच्या नायलॉनच्या दोरखंडाची मोठी ऑर्डर पुरवली आहे तेथे बिर्ला पण खटपट करत होता; पण शेवटी आम्हालाच मिळाली ती दुबईला आपला माणूस आहे जाताना पत्ता घेऊन जा !' श्याम दुबईला जात नसून मस्कतला जात आहे व मस्कत व दुबईमध्ये मुंबई ते दिल्लीइतके अंतर आहे, हे अध्यक्षमहाराजांच्या गावीही नव्हते !

मग गणेश-उत्सवाच्या कार्यक्रमाची चर्चा सुरू झाली. नेहमीप्रमाणे पहिली पूजा अध्यक्षमहाराज व महाराणी करणार होत्या. बाकीच्या दिवसाच्या पूजा सभासदांच्या अर्थप्राप्तीप्रमाणे वाटल्या गेल्या. मग चढाओढीचे कार्यक्रम चर्चिले गेले. भावगीतांच्या, फॅन्सी ड्रेसच्या, दोरीवरच्या उड्यांच्या चढाओढी पक्क्या केल्या गेल्या

करमणुकीचा कार्यक्रम ठरवावयाची वेळ आली त्या वेळी कोणी तरी एकदम म्हणाले, ' पण भगिनीवर्गाच्या कोणी प्रतिनिधी नाहीत हे कसे ?' आता श्यामने कान टवकारले कारण कर्वेबाई सगळ्या भगिनींचं प्रतिनिधित्व करत असत.

' मी म्हटलं सुलभाला, पण ती म्हणाली, आम्ही बायका आमचे आम्ही कार्यक्रम ठरवू म्हणून !' अध्यक्षमहाराज म्हणाले सुलभा म्हणजे अध्यक्षमहाराणी हे वेगळे सागायला नकोच. बाकी लोक आपआपल्या बायकाना, आमची ही, किंवा आमचे कुटुब वा बायको, फारतर आमच्या मिसेस म्हणत असत; पण अध्यक्ष–महाराज मात्र मोठ्या स्टाइलमध्ये, सुलभा असे म्हणाली, सुलभा तसे म्हणाली वगैरे म्हणत असत त्या वेळी बाकी सभासद त्यांच्या चेहऱ्याकडे मोठ्या कौतुकाने पहावयाचे अध्यक्षमहाराणी–महाराण्या असतात तश्याच होत्या. त्याचे सुलभा नाव आहे, की विशेषण आहे, असा कोणालाही प्रश्न पडावा.

तेवढ्यात कर्व्यांनी कोणा माननीय मंत्र्याना बोलवावे अशी सूचना केली. त्याचे एक कारण म्हणजे सध्याच्या मंत्रिमंडळातला एक मंत्री त्याचा लंगोटीयार होता

' पण गणेशउत्सवापर्यंत ते मंत्री रहाणार आहेत का ? दररोज वाचतो आहे पेपरात, की साहेब मंत्रिमंडळात आज बदल करणार आहेत. उद्या करणार आहेत म्हणून.' अर्थात हे सगळे कामत कर्व्यांना बोचावे ह्या उद्देशानेच म्हणाला होता.

' असं म्हणू नका कामत. प्रत्येकाला सूचना करावयाचा अधिकार आहे व प्रत्येक सूचनेचा गंभीरपणे विचार व्हायला पाहिजे.' अर्थातच लिमये. ' कोणाला बोलवावयाचे म्हणता कर्वेसाहेब ?'

'अहो, आपले दादासाहेब, औरंगाबादचे ! ते आणि मी हायस्कूलात बरोबर होतो. हॉस्टेलवर बरोबर होतो. ते माझे अगदी लंगोटीयार आहेत –' कर्वे.

' लिमयेसाहेब, मी गंभीरपणेच म्हणालो होतो. आता तुम्हीच सागा मंत्रिमंडळात बदल होण्याच्या बातम्या आहेत की नाही ? आपण पत्रिका छापावयाच्या व दादासाहेब गळावयाचे, म्हणजे पत्रिका परत छापणे आले की नाही ? मंत्री नसतील तर दादासाहेबाना बोलावते कोण व ते येताहेत कशाला ? पत्रिका परत छापण्याचा खर्च – म्हणजे ह्या प्रश्नाला आर्थिक बाजू आहे.' कामत आपल्या बोलण्याचे समर्थन करू लागला.

आता प्रश्नाला आर्थिक बाजू आहे, म्हटल्यावर कर्व्यांना पुढे काही बोलणे सुचेना तेव्हा दादासाहेब मंत्री राहिले तर अध्यक्षमहाराजानी व कर्व्यांनी त्याना प्रत्यक्ष जाऊन बोलावणे करावे, असे ठरले. श्याम मनाशी म्हणाला, झाले हे बरेच झाले. मंत्रिमहोदय कशाला येताहेत, एका सोसायटीच्या गणेशउत्सवाला ? भले कर्व्यांचे लगोटीयार असतील, पण मंत्री, झाल्यापासून त्यानी आपली लंगोटी बदलली आहे, हे कुठे कर्व्यांना माहीत आहे ?

होता होता रात्रीचे साडेबारा वाजले. सर्व कार्यक्रम नेहमीप्रमाणेच होता, पण परत एकदा ठरवला गेला. अध्यक्षमहाराज उठता उठता म्हणाले, ' तुमचे सर्वांचे ठीक आहे. रविवार आहे विश्राती घेता येईल मला सकाळच्या ' फ्लाइट ' ने दिल्लीला जावयाचे आहे लवकर झोपले पाहिजे. ह्या उद्योग मंत्रालयात दर दोन दिवसानी काही तरी असते बघा.' ' मग त्यानी आपली कपनी, मंत्रालय, मंत्री, सरकारी नोकरशाही ह्याची ' एल पी.' लावली आता सगळेजण गणेशउत्सव विसरले होते व मद्रासकडले हरिजन तर त्याच्याही पलीकडे जाऊन विसरले होते.

पण श्यामच्या मनातून तो मद्रासच्या हरिजनाचा विषय गेला नव्हता. तो विचार करत होता की, आपला समाज असा कसा राहिला ? एका बाजूला धर्माचे स्तोम माजले आहे. दररोज कोणी स्वामी, गुरु, सत वा महंत अमेरिकेत जाऊन मठ काढतो आहे, मदीर बाधतो आहे. शेकडो गोरे लोक चमनगोटा करून, गध लावून, धोतर नेसताहेत. बायका साड्या नेसाहेत व हिंदू नाव घेत आहेत. पण हिंदुस्थानात हरिजन धर्म सोडत आहेत, त्याच्याकरता काही करावे असं म्हणणारा हरीचा लाल निघत नाही ?

एक कामत काही थोडे कळवळला, पण बाकी कोणाला त्याचे काही नाही. कोणाला गणेशउत्सवातल्या चढाओढीची काळजी तर कोणाला कंपनीचे दोरखंड खपवण्याची ! असा थडपणा, अशी दूर रहाण्याची वृत्ती कशी निर्माण झाली ? ह्या सगळ्याच्या मागे भेकडपणा आहे का ? हे विचार करत तो घरी आला.

बाहेरच्या दाराची चावी तो घेवून गेला असल्याकारणाने राधाला उठवावयाचा प्रश्न व्हता. पोरे झोपली होती. राधान झोपली होती. अगदी हिंदु समाजाला लागली आहे तशी गाढ झोप त्यांना लागली आहे, असे श्यामच्या मनात आले. तो गादीवर पडला पण त्याला झोप येईना गेली हजार वर्षे असे चालले होते शेकडो लढाया झाल्या पण बहुतेकात विजय मुसलमानाचा, असे कसे व का झाले ? हा काही नुसता योगायोग नाही त्याला मुसलमानाच्या काही गुणाचे पाठबळ असले पाहिजे

थोडे हिंदु बहादूर निघाले, नाही असे नाही; पण त्यातले फक्त शिवाजी व पहिले बाजीरावच कसे यशस्वी झाले ? व ते जर यशस्वी झाले तर बाकीचे का होऊ नयेत ? ह्या दोघानाच यश मिळायचे काय कारण असावे, ह्या प्रश्नाचे त्याला उत्तर मिळाले; पण त्या उत्तराने तोच स्वत.शी चपापला. व असा विचार करताना आपल्याला कोणी पाहिले तर नाही ना, अशी त्याला भीती वाटली. कारण ते उत्तरच तसे होते.

शिवाजीच्या व बाजीरावाच्या यशाचे कारण ते हिंदू राहिले नाहीत हे होते ! ह्याचा अर्थ त्यांनी आपला धर्म बदलला होता असे नाही. राज्यकर्त्यांचा एक धर्म असतो तो त्यानी स्वीकारला होता.

आता राज्यकर्त्यांचा धर्म कोणता ? आपल्याला राज्य स्थापन करावयाचे आहे ना ? आपल्याला आपले राज्य भक्कम करावयाचे आहे ना ? आपल्याला आपले राज्य वाढवावयाचे आहे ना ? मग हा आपला भाऊ, हा आपला काका, ही आपली आत्या ही नाती व ह्या नात्यामुळे येणारा दुबळेपणा टाकून दिला पाहिजे !

शिवाजीमहाराजानी काय केले ? जे लोक स्वराज्य स्थापनेच्या आड आले त्याना कापून काढले. भाऊ गडबड करू लागला त्याच्याशी युद्ध केले. नातेवाईक व जातवाले असूनही जावळीच्या मोऱ्याचा नायनाट केला अगदी प्राणापेक्षा प्रिय असलेल्या मित्राला नेताजी पालकरला जबर शिक्षा केली. स्वत.च्या मुलाला संभाजीला तुरुगात टाकले.

विश्वासघातकी म्हणून पुढे मोरारजी देसाई आपल्यावर आरोप करतील ह्याची पर्वा न करता अफझुलखानाला ठार मारले रात्री बेरात्री जाऊन शाहिस्तेखानाची बोटे तोडली. हे सगळे का ? तर स्वराज्य स्थापन करावयाचे आहे, लोकात दरारा निर्माण करावयाचा आहे म्हणून. मग त्याकरता सूरत लुटायला लागली तरी हरकत नाही. खोटे–नाटे तह करावे लागले तरी हरकत नाही, ही मुसलमान वृत्ती होती. म्हणून स्वराज्य स्थापन झाले, हिंदवी स्वराज्य !

राज्यकर्ते मोगल दाढी राखतात ना ? ती त्यावेळच्या अधिकाराची निशाणी होती ना? मग ठेवू या दाढी. अगदी मुसलमान पद्धतीची. शेंडी साभाळावयाची असेल व त्या करता दाढी ठेवावी लागत असेल तर त्यालाही हरकत नाही, ही शिवाजीची वृत्ती. दाढी ठेवणारा शिवाजी हा पहिला हिंदू राज. असेल नाही ?

मुसलमानाच्या चार बायका असतात म्हणून इतके बोलले जाते. शिवाजीने त्याच्या दुप्पट म्हणजे ठणठणीत आठ बायका केल्या. प्रत्येक लग्न म्हणजे एकेका घराण्याशी राजकीय सबंध जुळवण्याचा मार्ग होता. त्यांनी एकपत्नीव्रताच्या बागड्या भरल्या असत्या तर आज मद्रासमधले हरिजन मुस्लिम होण्याचा प्रश्न आला नसता. केव्हाच सगळे मुसलमान झाले असते!

पहिला बाजीराव तर त्याच्याही पुढे गेला. युद्धावर जाणाऱ्या माणसाने कसली करावयाची खाण्या–पिण्याच्या गोष्टीची पर्वा ? ब्राह्मण असून अभक्ष्य भक्षण करायला व अपेय प्यायला त्याने सुरुवात केली. आपले आपले म्हटले जाणाऱ्याशी युद्धे केली हे आपले म्हणून खोट्या प्रेमात पडले नाहीत.

दिल्लीला गेल्यावर व तेथे पैसा कमी पडतो आहे बघितल्यावर त्याने अगदी कालकाजीचे मंदिरसुद्धा लुटले. कारण काय ? जर हिन्दूचे राज्य राहिले तरच हिन्दूची देवळे व हिन्दुधर्म राहणार होता ना ? देवळातली संपत्ती उगाच वाया जात होती. लुटा मंदिरे व वाचवा धर्म ! आता ऑक्टोबरमध्ये चार शंकराचार्य जमणार, मग ते कार्यक्रम ठरवणार, मग हरिजनाकरता ते काही करणार का नाही वेंकटेशाचे वा नाशिकच्या काळयारामाचे दागिने मोडून व हरिजनाना मदत करत. धर्म कधी स्वत च्या पायावर उभा राहिला आहे? त्याला नेहमी राज्याचे अधिष्ठान मिळाले. किंबहुना ज्या धर्मांना राज्याचे अधिष्ठान मिळाले तेच धर्म वाचले व वाढले.

तेच माधवराव पहा राघोबादादा घरबुडवे फितुर झाले काकाना कसे काय करणार, असे मनात कुंथत न राहता त्याच वेळी त्याचा सफाया केला असता तर सगळ्या काकांना जरब बसली असती व कदाचित् पेशवाई वाचली असती. पण माधवराव हिंदु राहिले व शेवटी सगळेच मातीला मिळाले !

हिंदु न राहिल्यामुळे यशस्वी झालेल्याचे जवळचे व ताजे उदाहरण म्हणजे इंदिराजीचे! 'मला राज्य करावयाचे आहे', हे तिचे एकमेव उद्दिष्ट ! मग हे लोकनायक, हे जुने गांधीवादी, हे खादीभांडारचे मुख्य हा काही काही विचार तिने केला नाही अगदी ८४ वर्षांच्या भीमसेन सच्चरपासून तो १४-१५ वर्षांच्या मुलापर्यंत सर्वांना बेधडक तुरुगात टाकले. दिल्लीच्या कोण्या भागात शस्त्रे लपवली आहेत कळले सगळा भाग जमीन दोस्त करून टाकला. जामा–मशिदीचा मौलवी आजूबाजूच्या दुकानाचे पैसे गोळा करून सरकारविरुद्ध कारवाई करतो आहे ती सगळी दुकानेच तिने पाडून टाकली आणि एवढे करून परत निवडून आली !

आणि आमचे 'हिंदू' मोरारजी ? पतप्रधान झाल्यावर प्रथम कोणाला भेटायला गेले ? तर इंदिराजीना ! इकडे म्हणतात तिने इतके अत्याचार केले, सरकारी नोकरांचा छळ केला. त्याच्या चौकशीसाठी ह्यानी कमिशनं नेमली, कोर्ट बसवली; पण प्रथम भेटीचा मान तिला ! का तर म्हणे महात्मा गांधीची शिकवण आहे म्हणून ! इंदिराजीचे मंत्री कधी हू का चू करतात का ? नाही तर जनता पक्ष म्हणजे नुसती हिंदू धर्मशाळा झाली होती !

हे सर्व विचार करता करता श्यामला झोप लागली. सकाळी उठता उठता राधाने विचारले 'काय ठरलं मग रात्री ?'

'काही नाही, आता आपण हिंदूनी हिंदू राहून चालावयाचे नाही !'

राधा त्याच्याकडे बघतच राहिली. □

पुस्तके

# लहानी

'लहानी' हे पुस्तक म्हणजे ख्यातनाम विचारवंत श्रीमती दुर्गा भागवत यांनी केलेले आत्मलेखन आहे. या पुस्तकात दुर्गा–भागवत यानी आपल्या अडीच–तीन वर्षां–पासून ते दहाव्या वर्षापर्यन्तच्या बालपणच्या आठवणी कथन केल्या आहेत.

'पूर्वा', 'पैसा', 'भावमुद्रा', 'डूब', 'महानदीच्या तीरावर', 'प्रासंगिका' यासारख्या पुस्तकांतून दुर्गाबाईंचे धीरगंभीर व्यासंगी व्यक्तिमत्त्व जाणवते. 'व्यासपर्व', 'सिद्धार्थजातक', 'केतकरी कादंबरी', 'मुक्ता' ही पुस्तके वाचताना दुर्गाबाईंचे गाढ विद्वत्व शब्दाशब्दातून जाणवते. त्याची मोहिनी पडते आणि दराराही वाटतो दुर्गा भागवत यांच्या आजवरच्या लेखनात 'लहानी' हे एकशेचोवीस पानांचे छोटेसे पुस्तक अगदी वेगळे आहे. बालपणच्या आठवणी सांगताना दुर्गाबाईंचे ते एरवीचे दरारा दाखविणारे मोठेपण कोठेच्या कोठे पळून गेले आहे. लक्ष्मीबाई टिळकांसारख्या साध्या सोप्या सुरस शैलीत दुर्गाबाईंनी अतिशय रंगून जाऊन 'लहानी' या पुस्तकात आपले बालपण कथन केले आहे.

हे पुस्तक वाचून डोळ्यांसमोर येते एक अवखळ, महाउपद्व्यापी बालिका ! ही 'लहानी' बहिणीला विड्यांची थोटके कुटून खाण्यास मदत करते. भिंतीवर चढून नाचते. तान्ह्या बाळाच्या तोंडात लाडू कोंबते सर्कसमध्ये जाण्याचा ध्यास घेते. त्यासाठी डोके टणक हवे म्हणून जाता-येता ते भिंतीवर आपटते. झोक्यावर कसरती करताना आपटून डोळे चकणे करून घेते. सहावं वर्ष पूर्ण होण्याआधीच, कोणाला न सांगता स्वत: एकटीच शाळेत जाऊन बाईंना म्हणते, 'मी नाव घालायला आले आहे !' घोड्याचा मृत्यू पाहून विव्हल होते. त्याची आईच्या मृत्यूशी सांगड घालते. आजोबांनी सांगितलेली एक थंडगार गोष्ट ऐकते.

साध्या शैलीत एक एक प्रसंग जिवंत होत जातो. 'आई संडासात गेली. संडास अंगणाच्या एका टोकाला होते. तिच्यामागून आजी दुसऱ्या संडासात गेली. अंगणात चिटपाखरू नव्हतं. एकटी मी होते नि मला राहवलं नाही. मी दोन्ही संडासांना बाहेरून कड्या घातल्या नि धूम ठोकली!'

ते घर, त्या घराचं अंगण, दुर्गेचा खोडकर स्वभाव याचं चित्र सहजपणे डोळ्यांसमोर उभं रहातं. लहान मुलांना माहिती नसलेलं पण दुर्गेच्या आईच्या क्षयाच्या आजारामुळं घरावर पसरलेलं मृत्यूच सावट संयमाने, पण तीव्रतेनं व्यक्त झालं आहे. लोणावळ्याच्या मुक्कामात मुल रानातून खूप डिंक गोळा करून आणतात. आईला ताकद येण्यासाठी डिंकाचे लाडू खायला मिळावेत म्हणून! तो डिंक उत्साहाने आजोबांना दाखवतात आणि मग काय होते? 'आजोबा शाबासकी देतीलसे वाटले होते; पण ते तोंड फिरवून एकदम बाहेर एकटेच निघून गेले! आम्हा नातवंडांना बोलावल्यावाचून ते कधी असे फिरायला जात नसत....आता उत्साह गेलाच होता. 'आजी, वहिनीसाठी डिंक आणला आहे, लाडू कर!' काका म्हणाला. आजीने तोंड वाईट केले. तिचा चेहरा रडवेला झाला. 'बघीन कधी तरी!' ती म्हणाली. मृत्यूच्या चाहुलीमुळे घरातलं जड झालेलं वातावरण या प्रसंगातून सहजपणे काळजाला भिडतं.

दुर्गा भागवतांच्या लेखणीला विनोदाचा गंध आहे अशी त्यांची इतर पुस्तके वाचून शंकाही येत नाही; पण 'लहानी'मध्ये ठिकठिकाणी विनोद आहे. लहानपणचं रडणं, भिकू गड्याच्या आठवणी, पहिल्या स्वयंपाकाची गोष्ट हे सारे कथन विनोदी शैलीत झाले आहे. काकाच्या सर्कसचा खेळ तर फारच गंमतीदार वर्णन केला आहे. 'बेबूकाका जन्माचाच दुबळा. खूप आजारी असायचा; पण त्याची वाणी दांडगी होती. आम्हा तिघी पुतण्यांना तो प्रेक्षक म्हणून जमिनीवर बसवायचा. मग त्याचा खेळ सुरू व्हायचा. 'आता राममूर्ती लोखंडाचा सावळदंड तोडताहेत' असं म्हणून त्याने पुडीच्या कच्च्या दोऱ्याची लडी करून ती हातात अडकवून फसदिशी तोडायची. आम्ही टाळ्या वाजवायचो!'

लहानपणच्या या आठवणी निरनिराळ्या प्रकरणात विभागल्या आहेत. काटेकोर कालानुक्रमाने ही प्रकरणे आलेली नाहीत. 'सर्कस आणि मी' हे प्रकरण 'आई आणि मी' या प्रकरणाआधी यायला हवं होत. म्हणजे 'आई आणि मी' मधल्या संयमाच रहस्य अधिक कळलं असतं. 'आमचा सर्वांत धाकटा काका वसंत', 'आपल्या आईला आजी म्हणणारा धाकटा काका' ही माहितीवजा वाक्यं अनेक ठिकाणी पुन पुन्हा आली आहेत. एकदा सांगितल्यावर त्यांची पुन्हा आवश्यकता नव्हती.

श्री. अनंत सालकर यांचं मुखपृष्ठ आणि आतील चित्रे अनुचित वाटतात. मुखपृष्ठावरील बालिकेचे चित्र हे आजच्या आधुनिक बालिकेचं चित्र वाटत. हे दुर्गा भागवतांचं आत्मलेखन असल्यामुळे सुमारे साठ वर्षांपूर्वीच्या महाराष्ट्रीय बालिकेचे चित्र हवं होत. आतील चित्रही कधी ओबडधोबड, कधी काळाशी विसंगत, एकंदर परिणामहीन आहेत.

तरी पण या पुस्तकामुळं बालवाचकांना 'लहानी' दुर्गा आपली मैत्रीण वाटेल. जाणत्या, प्रौढ वाचकांना 'लहानी ते विदुषी' हा प्रवास कसा झाला हे जाणून घेण्याची उत्कंठा लागेल.

—विनया

लहानी
दुर्गा भागवत
वरदा बुक्स प्रकाशन
पृष्ठे : १२४, मूल्य : रु. १५.

*

---

फिनिक्स निवड

# Errol Flynn

The Untold Story
Charles Higham
Pages 585. $ 3.50

---

आम्ही ग्रंथालय सुरू केल्यापासून, 'अहो, तुमच्याकडे एरॉल फ्लिनचे 'विकेड, विकेड वेज' आहे का?' असा प्रश्न इतक्या वेळा विचारला गेला की माझी मान हलवून मला थोडासा स्पॉंडिलॉसिस होता तो गेला; पण पुस्तकाची स्पाइन मात्र अक्षरशः मोडली! (मराठी मन जेव्हा 'हो' म्हणते व जेव्हा 'नाही' म्हणते तेव्हा त्यात बरेच साम्य असते. (म्हणजे मानेच्या हालचालीत!) अशी आमच्यात पुष्कळदा चर्चा झालेली आहे. To shake, and to nod असे दोन स्पष्ट प्रकार एनीड ब्लाइटनच्या 'नोडी'मध्ये आहेच!) शेवटी त्या पुस्तकाच्या विसाव्या वाढदिवशी त्याचे क्लॉनिंग केले–म्हणजे दुसरी कॉपी आणली.

मला 'स्पॉंडिलॉसिस' वगैरे आठवला. कारण एरॉल फ्लिनलासुद्धा 'स्पायनल आथ्रायटिस' होता. त्याचं कारण मात्र भलतंच चमत्कारिक होतं. त्याला एकदा डंकन मार्टिनने जोरात थोबाडीत मारली होती! हे झालं एक आणि दुसरं कारण म्हणजे एकदा एका तरण्याताठ्या स्त्री फॅनने त्याच्यावर अशी काही विचित्र झेप (Cart wheel) घेतली की तिचा उजवा पाय फ्लिनच्या गळ्यात अडकला. गळ्याला इतका जोराचा हिसका बसला की मणका जागेवरून सरकला! नाही तर एरॉलला हा *मध्यमवर्गीय रोग कधीच जडला नसता!* ठीकच घडलं. इतका बाहेरख्यालीपणा!

आणि वर एरॉल फ्लिन हा नाझी जासूस होता, ही बातमी अलीकडे आपण वाचलीच असेल. याबाबतचा भरपूर पुरावा या पुस्तकात आहे. *या फ्लिनने काय केले नाही?* तो आंतरराष्ट्रीय गुंड होता, रामोशी होता, मादक औषधे घेणारा होता, (अमेरिकेतील बहुतेक सर्वच यशस्वी लोक मादक औषधे फ्लिनच्या वेळेपासून घेत होते की काय? प्रेसिडेंट केनेडीसुद्धा 'एम्फिटॅमाइन्स' घेत असत आणि परवा तर तिकडील एका गुन्हेगाराने आठ रॅटलस्नेक्सना 'एम्फिटॅमाइन' देऊन एका मध्यमवयीन जोडप्याच्या गाडीत ते जिवंत ठेवून दिले!) त्याने बलात्कार केले होते, सोन्याचा चोरटा व्यापार केला होता!

एका बोटीच्या संदर्भात एकदा फ्लिनवर खुनाच्या आरोपाचे वॉरंटही निघाले होते. पेगी सेटर्ली नावाच्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याचा आरोपही त्याच्यावर होता. हे बलात्कार–प्रकरण कोणत्याही सिनेमाइतकेच नाट्यपूर्ण झाले. सर्व प्रेस म्हणे फ्लिनच्या खिशात होता. कारण, बहुतेक पत्रकारांची नावे त्याला मुखोद्गत असत.

शिवाय पत्रकारांना तो आपुलकीने वागवत असे. अर्थात कीर्तीच्या शिखरावर बसणारा फ्लिन सुटेल असे सर्वांना वाटले; परंतु फ्लिनला आतल्या आत फार असुरक्षित वाटायला लागले होते. त्याला एक हजार डॉलर्सच्या जामिनावर सोडण्यात आले होते व त्याच्यावर स्टॅटय़ुटरी रेपचा गुन्हा दाखल केला होता. कोर्टाची केस आपल्याविरुद्ध गेली तर दुसऱ्या देशात पळून जायचे, असा त्याने बेत आखून ठेवला होता. हा बेत फक्त त्याच्या मूठभर मित्रांनाच माहीत होता. पोलीस हातकड्या घेऊन आले रे आले की फ्लिनचे बॉडीगार्ड त्याला एका गाडीत बसवून भन्नाट वेगाने बरबॅंक विमानतळावर नेणार होते. तेथे स्टंट पायलट पॉल मॉन्टॅम त्याची वाट बघत बसणार होता. बरबॅंक विमानतळावरून उडाल्यावर वॉलकॉटसारखा दिल्ली विमानतळावर चॉकलेटस व मिठाई टाकण्याचा मात्र त्यांचा बेत नव्हता! मेक्सिकोपर्यन्त उड्डाण केल्यानंतर तिथून अर्जेंटिनाला जायचं, असा त्याचा प्लॅन होता कारण अर्जेंटिना व यू.एस.ए. यांच्यामध्ये आरोपीस आपापल्या देशात स्वाधीन करण्याचा तह (Extradition Treaty) नव्हता! याउपर तेथे नाझी एजंटाचा सुळसुळाट! मार्टिन बोरमन वगैरे मंडळी तिथे अजून जिवंत आहेत अशा किती तरी अफवा आहेत!

त्या काळात पिवळ्या नियतकालिकांची (yellow journalism) तर पर्वणीच झाली. फ्लिन घराबाहेर पडला की त्याच्यावर प्रश्नांचा भडीमार होई. एका चहातीने तर सर्व प्रकरणाबद्दल सहानुभूती व्यक्त केली. शिवाय तिने कबूतराच्या पायावर चिठ्ठी बांधून फ्लिनला लग्नाची ऑफर दिली!

सकृद्दर्शनी फ्लिन बलात्कार करेल यावर फार लोकांचा विश्वास बसला नाही. कारण 'गुन्हा' घडल्यानंतर बऱ्याच अवधीनंतर पोलीस-तक्रार नोंदवली गेली होती.

बलात्कार-प्रकरणी जेव्हा कोर्टात केस उभी राहिली तेव्हा परत फ्लिनच्या चाहत्यांनी त्याच्याभोवती गलका केला. काहींनी सुव्हीनूर म्हणून त्याची बटणे उपटायला सुरुवात केली. एका बाईने सुव्हीनूरसाठी त्याचा एक बूटच घरी न्यावा असा चंग बांधला. तसा प्रयत्न तिने केलासुद्धा!

या बलात्कार-प्रकरणात एक सर्वांत गंमतीदार किस्सा घडला तो असा. बलात्कार केस चालू असतानाच फ्लिनला एक धमकीचे पत्र मिळाले. त्यात असे लिहीले होते की, अमक्या अमक्या दिवशी, अमुक ठिकाणी, अमुक वाजता फ्लिनने दहा हजार डॉलर्स पाकिटात टाकून पाठवावे, नाही तर त्याचं सारं करीयर व आयुष्य उध्वस्त करण्यात येईल. खाली टिपण होते की, हे पत्र पेगी सेटर्लीच्या बलात्काराच्या संदर्भातच आहे. हा किस्सा गंमतीदार जरी असला तरी त्या वेळेला फ्लिन अगदी चिंताग्रस्त झाला. आता ऊठसूट कुणीही सोम्यागोम्या आपल्याला धमक्या देऊ शकतो असे त्याला वाटले. फ्लिनने ही माहिती पोलिसला व FBI ला दिली. FBI ने खुद्द जे. एडगर हुवर यानी अशा सूचना दिल्या होत्या की, फ्लिनच्या या बलात्कार-केसची तंतोतंत माहिती त्याला पाठवावी. पोलिसांनी पैशाच्याऐवजी एका पाकिटात चॉकलेट, पेपरमिंटस गुंडाळल्या व व ते पुडकं चिठ्ठीमधल्या ठिकाणी नेऊन पोचवले.

पुष्कळ अवधी लोटल्यानंतर एक तेरा वर्षाचा मुलगा ते पाकीट घ्यायला आला. लागलीच त्याला पोलिसांनी धरले तेव्हा तो म्हणाला, मी फ्लिनचा फॅन आहे. फ्लिन हा खरोखर अपराधी आहे का नाही याची चाचणी मला घ्यायची होती! शिवाय त्याला फ्लिनचा ऑटोग्राफही घ्यायचा होता. फ्लिन तरुण असताना अनेक वेळा आर्थिक अडचणीत येत असे. असल्या वेळेला पावसाच्या दिवसांत डिपार्टमेंटल स्टोअर बाहेरील वाळत ठेवलेल्या छत्र्या तो आणि त्याचा मित्र लांबवित असे. पुढं थोडं लांब जाऊन याच छत्र्या तो त्याच लोकांना सेकंडहॅन्ड म्हणून विकत असे!

टॉपच्या लोकांसाठी कधीकधी बॉलडान्सचा प्रोग्रॅम होई. फ्लिनकडे कपडेही नसत किंवा तिकिटाला पैसेही नसत. टक्सीडॉ (tuxedo) तर तो कुणाचा तरी उसना घेत असे. (हे एक काळे डीनर जॅकेट असते. त्याची कॉलर सॅटीनची असते. काळी पॅन्ट व गडद रंगाचा बो टाय. अशा संपूर्ण युनिफॉर्मलाही टक्सीडॉ म्हणतात.) नंतर तो प्रवेशद्वारापाशी उभा राहून 'टिकेटस् प्लीज' म्हणत असे! तिकिट फाडून काउंटर फॉइल तो का देत नाही असे त्याला विचारले असता 'त्याची आवश्यकता नाही,' असे तो हसून सांगत असे. थोड्या वेळाने तो एखाद्या बाईला घेऊन ते तिकीट घेऊन आत घुसत असे!

पैशासाठी कधीकधी त्याने पुरुषवेश्याव्यवसायही पत्करला होता.

चार्लस हायहॅमचा हॉलीवुडच्या नट-नटयांबद्दल व प्रोड्युसरांबद्दल लिहिण्याचा हातखंडा आहे. आतापर्यंत त्यांनी आव्हा गार्डनर, मार्लिन डिट्रिच, चार्लस लाफ्टन, कॅथेरिन हेपबर्न, सेसील डी. मिली व हॉलीवुडवर अनेक पुस्तके लिहिली आहेत. त्यांनी कॉनन डॉईलवरही एक पुस्तक लिहिले आहे. त्याचे अगदी जवळचे प्रतिस्पर्धी म्हणजे श्री. ए. ई. हॉचनर. श्री हॉचनरसुद्धा सुपरस्टारवर व लेखकावर पुस्तके लिहितात. त्यांचे 'पपा हेमिंग्वे' नावाचे पुस्तक जगप्रसिद्ध आहेच. श्री. ए. ई. हॉचनरच्या पुस्तकात जी खोली वाटतं ती चार्लस हायहॅमच्या पुस्तकात वाटत नाही. तरीसुद्धा माहिती नवी असल्याकारणाने त्यांची पुस्तके वाचनीय वाटतात.

लहानपणी फ्लिनचा रॉबिनहुड दोन-तीन वेळा पाहिला होता; पण तो खऱ्या अर्थाने असा हूड (hood) असेल अशी त्या वेळेला मला कल्पना नव्हती.

—जे. एन. पोंडा

---

# सर्वांना अज्ञात असणारा 'मार्क्स'


रघुपती भट्ट
पेठ वडगाव, कोल्हापूर


---

'कॅपिटाल' लिहून जगभर खळबळ उडवून देणाऱ्या मार्क्संच्या जीवनातले अनेक पैलू तसेच अज्ञात राहून गेले आहेत. कामगाराच 'बायबल' लिहिणाऱ्या या महान माणसाने आपल्या आयुष्यात किती हालअपेष्टा काढल्या, त्याच्या कुटुंबियांना या 'भांडवल' यज्ञाच्या कशा झळा पोहोचल्या याची थोडी-फार कल्पना त्याचे चरित्रलेखक देतात; पण त्याच्या असामान्य सवयी आणि अभ्यास करण्याची पद्धत याबद्दल फक्त जेनी मार्क्स, एलिनॉर मार्क्स आणि पॉल लाफा हे आपल्या आठवणीतून थोडेथोडे सांगतात.

'कॅपिटाल'च्या लिखाणासाठी मार्क्सने प्रचंड अभ्यास केला होता. कित्येक तास वाचत राहायचे, वाचता वाचता लिहायचे यामध्ये जेवण आणि झोप याचा त्याला विसर पडत असे. कंटाळा आला तर जवळच्या सोफ्यावर पडून एखादी साहसकथा

किंवा विनोदी वाङ्मय तो वाचत असे. वाचताना पुस्तकात आवडलेल्या भागाला अधोरेखन करणे किंवा लेखकाकडून अतिरेक होतो आहे असे वाटल्यास तिथे एखादे प्रश्नचिन्ह किंवा एखादे वाक्य लिहून ठेवण्याच्या त्याच्या पद्धतीमुळे मार्क्सने ब्रिटिश म्युझियममधली कोणती पुस्तके वाचली, त्याला त्यामध्ये काय आवडले किंवा काय खटकले हे आजही सांगता येते.

शेक्सपियर म्हणजे, त्याच्या लेखी मानवजातीत जन्माला आलेल्यांत सर्वश्रेष्ठ नाटककार होता. त्याच्या अगदी नगण्य पात्रावरसुद्धा मार्क्स भाषण ठोकू शके. प्रसिद्ध जर्मन कवी गटे आणि हैन हे त्याला अक्षरशः मुखोद्गत होते. डान्टे आणि बर्न्स् यांच्या कविता त्याच्या मुलींनी गाऊन दाखवलेले त्याला बरे वाटे.

साहस कथांमध्येही मार्क्सला रस होता.डॉन क्विटझोट लिहिणाऱ्या कारव्हान्टिसबद्दल त्याला खूप आदर होता. कॅपिटालचे लिखाण संपल्यावर ला कामेडी ह्युमेन या बालझॅकच्या कृतीचे परीक्षण लिहायचे त्याने ठरवले होते.

मार्क्सची स्मरणशक्ती अफाट होती.स्मरणशक्ती वाढवण्यासाठी परकीय भाषांतले पद्य-उतारे तो पाठ करायचा. त्याचा गुरू हेगेल याने ती पद्धत सांगितली होती. स्मरण कायम ठेवण्यासाठी अधूनमधून वह्यांतले उतारे, अधोरेखित परिच्छेद यांचे वाचन चालूच असे.

मार्क्सला बोलता बोलता मध्येच थांबून अवतरणे द्यायची सवय होती, त्यामुळे त्याला कोणतेही पुस्तक मध्येच लागे. त्याच्या खोलीतली पुस्तके वाटेल तशी पडलेली असत. त्याच्या मते हा 'व्यवस्थितपणा' होता. पुस्तके नीट लावून ठेवणे याला तो 'अव्यवस्थितपणा' म्हणे. 'They are my slaves and they must serve me as I will!' असे त्याचे म्हणणे होते. असे मार्क्सकडे हजारभर गुलाम होते.

त्याला जर्मन, फ्रेंच, इंग्रजी या तीन भाषा उत्तम येत होत्या. ५० व्या वर्षी त्याने रशियन शिकायला सुरुवात केली. सहा महिन्यांत 'पुश्किन'चे रसग्रहण करण्याइतपत त्याने प्रगती केली. रशियन अधिकाऱ्यांचे चौकशी-अहवाल मुळापासून वाचण्यासाठी त्याने हा उपद्व्याप केला होता. त्याच्याशिवाय इतर कोणीही ते वाचले नाहीत.

गणित हा मार्क्सचा आवडता विषय होता. इन्फिनिटेसिमल कॅलक्युलसवरचा त्याचा ग्रंथ अतिशय महत्त्वाचा असल्याचा निर्वाळा विद्वानांनी दिला आहे. 'Science is not really developed untill it has made the extensive use of Maths', असं तो नेहमी म्हणायचा.

'विचार करत बसणे' हा त्याच्या लेखी जीवनातला सर्वांत मोठा आनंद! एखादा अत्यंत वाईट विचारसुद्धा स्वर्गसुखापेक्षा मोठा असतो, असंही तो म्हणे.

मार्क्स एक उत्कृष्ट शिक्षक होता. शिकणाऱ्यांना कल्पनाही न येता त्यांनी शिकलं पाहिजे असं हसत-खेळत तो शिकवी. फिरायला जाताना त्याने 'कामगार नेते' तयार केले. जाताजाता तो 'कॅपिटाल' शिकवी. कोणतीही समस्या मांडायची, तिचे छोटे भाग करायचे, मग त्याचा विकास कसा झाला, त्याला कारणीभूत काय होते हे उदाहरणे देऊन तो स्पष्ट करी. श्रोत्यांना तो मग प्रश्न विचारायला लावी. जर कोणी विचारले नाहीत तर स्वतःच प्रश्न उपस्थित करून सखोलपणे त्यांची उत्तरे देई.

'मार्क्सिस्ट व्ह्यू' मधून विवरण करण्यात त्याच्याइतका दुसरा कोणी तरबेज नव्हता. पॉल लाफार्गला त्याने जगाचा इतिहास समजावून दिला, तोही फिरायला जाताना; पॉल म्हणतो, 'माझी सगळी दृष्टीच मार्क्सच्या सहवासात बदलून गेली. शाळा-कॉलेजात आपण शिकलो असे मला वाटले.' असा हा शिक्षक होता.

मार्क्सला ऐकीव माहिती चालत नसे.कोणतीही माहिती पूर्ण असल्याशिवाय तो लिहीत नसे की बोलत नसे. फॅक्टरी लेजिस्लेशनचा अभ्यास करण्यासाठी ब्ल्यू बुक लायब्ररीत जाऊन फॅक्टरी-इन्स्पेक्टर लोकांचे कपाट भरलेले अहवाल त्याने वाचले. मार्क्सने अधोरेखित केलेले परिच्छेद आपण अजूनही पाहू शकतो.

'कॅपिटाल'मध्ये अनेकांची अवतरणे आहेत. त्यापैकी काही फक्त मार्क्सनेच वाचली असावीत; पण कोणाचेही नाव द्यायला तो विसरलेला नाही.प्रत्येकाचा तो उल्लेख करतो. भगवद्गीतेचासुद्धा उल्लेख तो करतोच.

त्याची हस्तलिखिते पक्की झाल्याशिवाय कोणाला दिसत नसत.

□

त्याच्या घरच्यांना फार सहन करावं लागलं; पण मार्क्सच्या स्वभावामुळं त्यांना हे सहन करण्याची शक्ती मिळाली. मुलींच्या बाबतीत तो फार हळवा होता. अमकी गोष्ट करा,असा हुकूम त्याने कधी दिला नाही.केली तर मला बरे वाटेल, असा त्याचा सूर असे आणि एखादी गोष्ट करू नये असं न सांगता त्यांनी ते करू नये असंच आपण वागावं, असं त्याचं मत होतं. 'Children should educate their parents' हे त्याचं आवडतं वाक्य! आपल्या मुलींना घेऊन तो रविवारी फिरायला जाताना, त्यांना गोष्टी सांगे. 'मूरच्या (मार्क्सला घरच्यांनी दिलेलं नाव) गोष्टीतून आमचं शिक्षण झालं.' असं एलिनॉरला (मुलगी) वाटते. 'कॅपिटाल'वाला मार्क्स रुक्ष नव्हता. या कल्पनातरल, संवेदनक्षम 'मूर'च्या गोष्टी ऐकायला लहान मुले नेहमी उत्सुक असत.

जेनी मार्क्स (बायको) राजघराण्यातली; पण पहिली खरीखुरी मार्क्सवादी! ती मार्क्सची बालपणापासूनची साथीदार. तिची साथ नसती तर कामगार तत्त्वज्ञान जन्माला आले नसते. पाठीवर संसार घेऊन ती मार्क्ससवे हिंडली; पण तक्रारीचा सूर नाही. मार्क्सच्या घरी येणाऱ्या देशोदेशीच्या कामगारांनी तिच्या आतिथ्याचा लाभ घेतला. त्यांच्या उष्टया बशा विसळणारी जेनी राजघराण्यातली होती असं समजलं असतं तर त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला असता अनेक कठीण प्रसंग आले, पण तिने ते धीराने निभावून नेले.

तिने स्वतःच त्या दिवसाचे वर्णन Short Sketch of an Eventful Life मध्ये केले आहे. जेवायला नाही असे प्रसंग या जोडप्यावर पुष्कळदा आले. एंजल्सने पैसे दिल्यावरच यांची चूल पेटे.

जेनीबद्दल मार्क्सच्या कट्टर शत्रूनाही आदर होता. हेन्नला जेनीच्या गुणाचे नवल वाटे. तिची पत्रं वाचताना तिच्यातल्या बुद्धिमत्तेविषयी आणि सुप्त साहित्यगुणांविषयी कळते.

मार्क्सची हस्तलिखिते तो प्रथम तिला दाखवी. जेनीने प्रती उतरल्यावरच ते प्रेसकडे जाई.

जेनी एक भौतिकवादी म्हणून जगली आणि तशीच मेली! 'कार्ल, माझं आयुष्य संपत आलंय रे!' हे तिचे अखेरचे शब्द!

तिची सावली सरल्यावर या जगाचे ऊन मार्क्सला फार दिवस सहन करता आले नाही! □

रंगभूमी

# मित्राची गोष्ट

## नेटका प्रयोग, असमाधानकारक कलाकृती

समलिंगी आकर्षण (Homosexuality,) वाट्याला आलेल्या एका मुलीची कथा–शोक कथा, म्हणजे 'मित्राची गोष्ट'.

श्रीकांत मराठे ऊर्फ बापू हा एक कॉलेजात शिकणारा सत्प्रवृत्त, दुबळा, निरुपद्रवी, थोडा–फार विचारी मुलगा मुलांमध्ये मनमोकळी असणारी, पुरुषी थाटात वागणारी, 'मित्रा' किंवा 'मित्तरसिंग' या नावाने मुलांमध्ये चर्चिली जाणारी सुमित्रा देव ही मुलगी त्याच्याच कॉलेजातली योगायोगाने त्याची ओळख होते मैत्री होते एकदली आक्रमक मित्रा बापूशी सगळे काही मोकळेपणाने बोलू लागते. माझ्या भावी पतीच्या सहवासात मी उद्युक्त होत नाही, मी काहीतरी वेगळी आहे, हे मला कळून मी आत्महत्त्येचा प्रयत्न केला, हे मित्रा बापूला सांगते. बापूला हे असे काही असू शकते याचेच आश्चर्य वाटते. कॉलेजातल्या नाटकाच्या निमित्ताने मित्राचा नमा देशमुख या मुलीशी संबंध येतो. नमासाठी मित्रा वेडीपिशी होते. नमाच्या मागे असलेला मवाली मुलगा मन्या आणि मित्रा याच्यात सामना सुरू होतो. मित्रा–नमा प्रकरण सगळीकडे जाहीर होते. मित्राला कॉलेजातून कमी करण्याचा निर्णय घेतला जातो. नमा लग्न करण्यासाठी कलकत्त्याला जाते. मित्रा तिचा पाठलाग करण्यात अयशस्वी होऊन परत येते. लष्करातल्या लोकांबरोबर दारू पिऊन झिंगू लागते. शेवटी आत्महत्या करते. अशी ही 'मित्राची गोष्ट.'

नाटक पहाताना प्रथमपासून शेवटपर्यंत प्रेक्षक खिळून रहातात. लैंगिक विषय, ओघवते कथानक, सुजाण दिग्दर्शनामुळे नेटका प्रयोग, यामुळे प्रेक्षक शेवटपर्यंत नाटकात गुंतून रहातात.

समलिंगी आकर्षण हा विषय यापूर्वी श्री विजय तेंडुलकराच्याच 'वासनाचक्र' या अनुवादित नाटकात ओझरता येऊन गेल्याचे स्मरते. श्री. सतीश आळेकराच्या 'बेगम बर्वे' या नाटकानेही या विषयाला थोडा स्पर्श केला आहे, असे म्हणता येईल. तरीही इतक्या स्पष्टपणे, ठसठशीतपणे हा विषय तेंडुलकरांच्या याच नाटकात आलेला दिसतो. साहजिकच विषयाच्या वेगळेपणामुळे प्रेक्षक गुंतून रहातात -

मित्राच्या मृत्यूनंतर बापू तिची गोष्ट सांगायला सुरुवात करतो येथे नाटकाला सुरुवात होते. तिची ओळख कशी झाली येथपासून ते तिच्या मृत्यूपर्यंतची कहाणी तो सांगत जातो. या 'गतस्मृती' तून (Fash back) कथानक उलगडत जाते. बापू मधेमधे निवेदन करतो आणि प्रसंग दिसत जातात. नाटकाच्या सविधानकाची रचना अशा प्रकारची असली तरी हे तुकड्यातुकड्याचे बनविलेले नाटक वाटत नाही सुरुवातीपासून शेवटपर्यंत नाटकाला ओघ आहे, वेग आहे. तो कोठे खंडित झालेला नाही. त्यामुळे प्रेक्षक सहजपणे नाटकाबरोबर राहू शकतात. ओघवत्या कथानकाच्या जोडीला योग्य अभिनय आणि योग्य नेपथ्य यामुळेही प्रेक्षक सतत कथानकाबरोबर रहातात, वाहातात. टेबल–खुर्च्या, पायऱ्या, कॉरिडॉर याच्या सहाय्याने कँटिन, टेकडी, कॉलेज, खोली यांचे भास निर्माण केले आहेत. 'गतस्मृती' हा नाटकाचा फॉर्म असल्यामुळे श्री. रघुवीर तळाशिलकर याचे नेपथ्य अपेक्षित वातावरणनिर्मिती करते. वर्तमानकालीन कथानकाला या प्रकारची रंगमंचव्यवस्था खटकली असती.

### ढोबळ, धोपटमार्गी हाताळणी

या नाटकातील काही पात्रे अपवादात्मक मनोवृत्तीची ( abnormal ) आहेत. त्यामुळे भूमिकांसाठी कोणत्या व्यक्तिमत्त्वाचे, चेहऱ्याचे कलाकार निवडायचे आणि त्या भूमिका कशा साकार करावयाच्या हे ठरविणे कठीण काम होते पण येथे दिग्दर्शक आणि कलाकाराना ते जमून गेले आहे. राकट पण दिलदार व्यक्तिमत्त्वाचा पाडे श्री. विजय आपटे यानी अतिशय समर्थपणे उभा केला आहे आधी राकट असलेला नंतर 'अधिकच वातड' झालेला, पण तसाच दिलदार राहिलेला पाडे दाखविणे त्याना सहज जमले आहे. आधीचा समजस दुबळा बापू, नंतरचा धीट, परिपक्व झालेला बापू दाखविणे सोपे नाही. पण त्याचे बदलत जाणारे व्यक्तिमत्व साकार करण्यात श्री. मगेश कुळकर्णी यशस्वी झाले आहेत. उज्ज्वला जोग याची कोवळी, लहान चणीची शरीरयष्टी, सुकोमल चेहरा नमाच्या भूमिकेला अतिशय योग्य वाटतो. त्यानी आपली भूमिका उचित भानाने केली आहे. श्री. सतीश पुळेकर (मन्या) आणि रोहिणी हट्टगडी (सुमित्रा) याचा अभिनय मात्र काहीसा ठोकळेबाज वाटतो. बोलणे, चेहऱ्यावरचे भाव एकसुरी वाटतात, ज्यात मनाच्या सूक्ष्म छटा दिसू शकत नाहीत.

विषय, नेटका प्रयोग, अभिनय याच्या जोरावर प्रेक्षकाना गुतवून ठेवण्यात यश मिळवले तरी एक कलाकृती म्हणून हे नाटक समाधान देऊ शकत नाही.

याचे कारण एक आत्यंतिक गंभीर, अपवादात्मक विषय घेऊन त्याची हाताळणी मात्र फार ढोबळपणे, धोपट मार्गाने केली आहे ही मुलगी अशा स्वभावाची होती, ती अशी वागली, तिचा असा अंत झाला हे सरळ रेषेच्या स्वरूपात आपल्याला कळते. तिच्याबरोबरच बापू, पाडे, नमा, मन्या याच्याही वागण्याची अशीच एकेक सरळ रेषा आहे; यातून नाट्य उभे रहात नाही. या सर्वांची व्यक्तिमत्त्वे अपरिहार्यपणे एकमेकाना छेदत, गुता वाढवत, नाट्य चढवत नेत नाहीत. फार ढोबळपणे या सरळ रेषा एकमेकात गुंतवल्या आहेत. मूळ विषयातली समस्या किती विचित्र! किती गंभीर! थक्क करणारी! हादरवून टाकणारी! परंतु या समस्येशी निरनिराळ्या पात्रांची प्रतिक्रिया कोणत्या प्रकारची आहे ? नमाच्या मागे असलेल्या मित्राला मन्या दूर करण्याचा प्रयत्न करतो. कशा प्रकारे ? दुसरा पुरुष

प्रतिस्पर्धी दूर करावा त्या प्रकारे ! मित्रा विचित्र हेतूने नमाच्या मागे आहे, हे मन्याला कसे कळते ? अगदी सुरुवातीच्या क्षणापासून मन्याला ते कळल्याचे दाखवले आहे. आपल्याला योग्य असलेली मुलगी दुसऱ्या कोणत्या व्यक्तिने, म्हणजे मुलीनेसुद्धा नेता कामा नये अशीच केवळ मन्याची भूमिका दिसत नाही, तर मित्राला तो प्रतिस्पर्धी मानतो आहे, एखाद्या मुलीला मुलासारखे प्रतिस्पर्धी मानणे शक्य आहे का ? नमा ! तिच्या वागण्याचा अर्थ काय ? सुरुवातीला ती मित्राला घाबरत असली, भेटत नसली तरी हळूहळू तिच्याशी रमू लागते. गुलुगुलु गोष्टी करू लागते. बंद खोलीत मित्राबरोबर वेळ घालवण्यापर्यंत तिची मजल जाते. म्हणजे नमा ही समलिंगी आकर्षण असलेली मुलगी होती का? नमावर जबरदस्ती झाली म्हणावे तर दुबळेपणामुळे आपण शिकार झालो याचा मन:स्ताप, दु:ख कोठे दिसत नाही. मित्राच्या वाट्याला आलेल्या दुर्दैवामुळे तिच्याबद्दल सहानुभूती वाटून, कीव येऊन नमा स्वत:च्या मनाविरुद्ध जाऊन तिचे समाधान करते, असेही दिसत नाही मित्राबद्दलची तिची भीति आणि प्रेम ती मधेच कुठे तरी बोलून दाखवते एवढेच; तिचे व्यक्तिमत्त्व त्यातून स्पष्ट होत नाही पाडेला मित्राबद्दल वाटणाऱ्या आकर्षणाचे स्वरूप कोणते ? पुरुषवेषातले तिचे मर्दानी सौंदर्य पाहिल्यावर ती पाडेच्या काळजाला भिडते, तोपर्यंत नाही. पाडेमधेही समलिंगी आकर्षण लपले होते का ? पुढे कोठे ते प्रत्ययाला येत नाही. मित्रामधले समलिंगी आकर्षण कळताच पाडे बिथरून युद्धावर निघून जाणे, इतकी तीव्र प्रतिक्रिया म्हणजे त्याच्या मनात केवढा उत्पात झाला असेल ! पण पाडेचा धक्का प्रेक्षकाना समजू शकत नाही. ज्या अर्थी तो युद्धावर गेला त्या अर्थी त्याच्यावर जबरदस्त आघात झाला असावा, असे गणित माडून प्रेक्षक तो धक्का समजून घेतात. बापू आणि मित्रा याचे नाते दोन पुरुष–मित्राचे असावे तसेच साधारण वाटते, पण तिचा थडगार स्पर्श बापूला आठवतो. तिचा देह आवळण्याची इच्छाही त्याला एकदा होते. मधेच ती त्याला लहान मुलीसारखी भासते. का? मित्रा वारंवार त्याच्यावर उसळते त्याला दगड, घुबड, पडका बुरुज, फुटका टरबूज म्हणते; तरी त्याला' तिच्याविषयी आस्था, जिव्हाळा वाटतो. का?

### उथळ चित्रण, अडखळलेली लेखणी

ही झाली इतर पात्राची गत. मित्राचे व्यक्तिमत्त्व ते तरी एकसंध आहे का ? मित्रा पुरुषामध्ये अतिमोकळेपणाने वागणारी आहे. दोन उघड्या केसाळ पुरुषामध्ये उभी राहून फोटो काढून घेण्याइतकी ती बेदरकार आहे. एवढेच नाही तर तो फोटो ती निष्काळजीपणे कोठेही ठेवते. असे जर आहे तर कधीकधी ती दोन खाद्यावरून पदर घेणाऱ्या अस्सल स्त्रीसारखे का बोलते ? पाडेबद्दल ती बापूला म्हणते, 'त्याची नजर घाणेरडी आहे. शिवाय तो बेशरम आहे मला त्याची उघडी केसाळ बॉडी दाखवत होता.' घरातल्या नोकराशी चाळे करून पाहिल्याचे बापूला सांगितल्यावर हे कोणाला सागू नको, असे ती बापूला का बजावते ? तिच्या व्यक्तिमत्त्वाशी हे वागणे विसंगत आहे

एक समस्या किंवा एक शोककथा तेंडुलकरानी अतिशय उथळपणे चित्रित केली आहे. वर्तमानपत्री बातमीसारखे या नाटकाचे स्वरूप वाटते वर्तमानपत्री बातमीत घटना असतात. पण एखादा समग्र अनुभव जिवत झालो नसतो. व्यक्ति असतात, पण व्यक्तिमत्त्वे नसतात. अनेक शक्यता सभाव्यता असतात. पण त्याच्यात सखोल शिरण्याचा प्रयत्न नसतो तसे या नाटकाचे झाले आहे अभिनयाच्या जोरावर कल्पकतेने, हुषारीने एखादी वर्तमानपत्री बातमी जरा विस्ताराने रंगमंचावर दृग्गोचर केली आहे, असेच नाटक पाहून वाटते.

श्री विजय तेंडुलकर माणसाच्या मनाचा वेध घेऊ शकतात. लहानसहान अनुभव अतिशय तन्मयतेने, अतिशय उत्कटपणे, समग्रतेने अभिव्यक्त करू शकतात. त्याची पूर्वीची 'कोवळी उन्हे', दूरदर्शनवर त्यानी घेतलेल्या मुलाखती, 'सिंहासन' या चित्रपटाचे संवाद, 'पाहिजे जातीचे' हे नाटक यातून त्याच्या प्रतिभेची साक्ष मिळते. मात्र आता असे वाटते की, लैंगिकता या विषयाचे भाडवल बनवून त्याचे रंगभूमीवरचे लेखन थाबले आहे आणि सत्ताधाऱ्याचा स्वार्थ या विषयाचे वरवरचे चित्र दाखवण्यात त्याची पटकथाकाराची लेखणी घोटाळते आहे

–विनया खडपेकर

चित्रपटाबाहेर

# हम सब चोर है !

प्रत्येक शहराला एक स्वभाव असतो, व्यक्तिमत्त्व असतं. कलकत्याने दारिद्र्याने पिचलेल्या संतप्त तरुणाचं व्यक्तिमत्त्व पांघरलं आहे, तर चंदिगडने नीटनेटकेपणा अंगात मुरल्याचा 'मेक अप्' केला आहे. लोहिया म्हणतात त्याप्रमाणे दिल्लीने वेश्येची भूमिका पत्करली आहे, तर मुंबईने आपलं कॅरॅक्टर कसंही असलं तरी त्याला पदराखाली घालणाऱ्या 'त्या' महान वगैरे मातेची भूमिका स्वीकारली आहे.

मुंबईत खरं तर परस्परांवर जगणारी माणसंच जगत आहेत. एकानं दुसऱ्याचं लुबाडायचं, तिसऱ्यानं पहिल्याचा माल लंपास करायचा आणि मग हा दुसरा–तिसरा कोणी नसून पहिलाच आहे, असा न संपणारा खेळ खेळायचा, हा मुंबईचा खाक्या आहे. नुकतंच विधानसभेत गाजलेलं 'सिमेंट–चोर, सिमेंट–चोर' प्रकरण म्हणजे या मुंबईने दिलेल्या सर्वोच्च अशा भुरट्या चोराचं उघडकीस आलेलं एक मोठ्ठं प्रकरण आहे !

खरं म्हणजे असे 'भुरटे चोर', अर्थात इतके नसले तरी, कमी जास्त प्रमाणात याच प्रकारची कलाकुसर व कुशलता आत्मसात केलेले मुबईत–गल्ली-बोळात रस्तोरस्ती उभे आहेत. हा दिवस आहे की रात्र आहे, याची ओळख कदापि पटू न देणाऱ्या मुंबईच्या गर्दीत या भुरट्या चोरांचीच गर्दी अधिक आहे.

राजकीय पुढारी, स्मगलर, उद्योगपती, व्यापारी असे काही जम बसलेले चोर वगळता इथे बारीक–सारीक, बसल्याबसल्या, बोलताबोलता दिसेलं तिथे, बघाल तिथे याच चोरांची भरताड आहे. त्यांचं प्रमाण इतकं आहे की, बसस्टॉपवर निदान त्या वॉर्डापुरते असलेल्या चोराचे फोटो लावणंही अशक्य झालं आहे !

तेव्हा चोरांची राजधानी असलेल्या या मुंबईत बसलेली फिल्मी दुनिया याला अप-

वाद कशी ठरेल? तिथे तर गेल्या दशकात भुरटया चोरांना ऊतच आला आहे.

रुपेरी पडद्यावर 'दिल-चोर' नायक-नायिका उभ्या करणाऱ्या आणि 'स्मगलर' दरोडेखोरांना शासन देणाऱ्या या फिल्मी दुनियेने कॉपीराइटच्या कायद्याला तर मूठमातीच दिली आहे; पण साध्या सभ्य संकेतांनाही चेचलं आहे.

पाली-हिल, जुहू-पार्ले स्कीम, वांद्रा या सुखासीन परिसरात राहणाऱ्या फिल्मी दुनियेतील या 'भुरटया चोरांचा' इथे पंचनामा करायचं आम्ही ठरवलं आहे, (पंचनामा या शब्दातच 'पंच' असल्यामुळे नुसती नावाची यादी करून ती फाईलला 'पंच' करणे इतपतच अर्थ अभिप्रेत असल्यानं घाबरण्याचं मुळीच कारण नाही.) तर या सुखासीन भुरटया चोराचा चोऱ्या करण्याचा अड्डा, 'सिमेंटची चोरी' उघडकीस आलेल्या विधानभवनाच्या आसपासच आहे. पंचतारांकित हॉटेलला पटकथा लिहिण्याआधी ही भुरटी मंडळी भवनाच्या आसपास असलेल्या 'एरॉस', 'रीगल', 'एम्पायर', व थोडे लांब 'कॅपिटॉल, 'मेट्रो' अशा फोरन फिल्म दाखविणाऱ्या चित्रपटगृहांजवळ वास काढताना दिसतात! ज्यांच्याजवळ 'ऑन मनी' आहेत ते 'खाजगी शो' अॅरेन्ज करतात, तर काही भलत्याच कौशल्याने चित्रपट भारतात लागण्याअगोदरच एखादी 'फोरन' ट्रिप मारून अनेक 'फोरन फिल्लम' बघून येतात आणि ज्यांना थोडा-फार मानमरातब आहे असे निर्माते-दिग्दर्शक चित्रपटमहोत्सवाचं आमंत्रण आवर्जून मागवतात आणि चर्चा सोडून सर्व बहुविध देशांच्या चित्रपटांना उपस्थित राहतात.

'अड्डे' कोणते हे कळल्यावर लक्षात आलंच असेल की, या भुरटया चोरांचं लक्ष्य काय आहे! सरळ आहे, केवळ वाङ्मय-चौर्य करणं हाच या भुरटयांचा उद्योग आहे.

हॉलीवुडच्या धर्तीवर उभारलेल्या हिंदी सिनेमाच्या या 'फॉलीवुड'मधील शर्विलकाच्या या महान वारसदारांनाही थोडा इतिहास आहे. (थोडा आहे तेच बरं आहे!!) १९५० साली अशोक कुमार-प्राणच्या भूमिका असलेल्या 'मि. एक्स' या चित्रपटाने 'दि इन्व्हिझिबल् मॅन' या चित्रपटाचा निर्माता-दिग्दर्शकांना न विचारता एक प्रशस्तिपत्रक बहाल केलं होतं आणि तेव्हापासून या भुरटया चोऱ्यांचं व चोरांचं प्रमाण वाढतच गेलं. १९६० च्या सुमारास 'रिबेका'चा चित्रपटाचं अनुकरण करणारा 'कोहरा' आला; पण प्रेक्षकांनी त्याला नाकारलं.

हेले मिल्सची प्रशंसनीय भूमिका असलेला 'पेरन्ट ट्रॅप'चं भ्रष्ट अनुकरण ए. व्ही. एम. ने 'दो कलियाँ' त सादर केलं. मिल्सच्या तुलनेत नीतू सिंगचा करंटा अभिनय हेच या चित्रपटाचं वैशिष्ट्य म्हणावं लागेल.

अतिशय गाजलेला संगीतपट 'कम् सप्टेंबर' 'मेरे सनम' च्या रूपात सादर केला आणि नशिबच फुटकं असलेल्या प्रेक्षकांना प्रियकर रॉकच्या जागी ठोकळ्या विश्वजितला आणि त्याची प्रेयसी म्हणून स्त्री-सौंदर्याच्या पारखी असणाऱ्या आशा पारेखला पाहावं लागलं. 'फॅनी' हा काहीसा अभिजात चित्रपट पाहून खुशाललेल्या देवेंद्र गोयलांनी स्वतःच्या चित्रपटीय विहिरीत सूर मारून 'एक फुल दो माली'सादर केला आणि डोकं मात्र प्रेक्षकांचं आपटलं!

जपानवर हल्ला, हृषिदांचा डल्ला

'मॅन इज नोन बाय द कंपनी ही किप्स' या वाक्प्रचाराला अनुसरून चित्रपटदुनियेत आदरणीय ठरलेले हृषिकेश मुकर्जी या टोळीत सामील झाले. मात्र त्यांनी भारताला 'अननोन' अशा जपानी चित्रपटांकडे मोहरा वळवला. हृषिजींनी जपानच्या विलक्षण दिग्दर्शक अकीरा करोसोवाच्या 'इकिरू' ला फोडणी देऊन 'आनंद' सादर केला, तर 'मिली' हा चित्रपट अशाच एका जपानी चित्रपटावर बेतला आहे.

'जपानी तिजोरी'चा दरवाजा खुला केल्यामुळे हृषिदांचे 'किप' (ठेवलेला म्हणा हवं तर) गुलजारही या तिजोरीकडे आकर्षित झाले आणि त्यांनी तर 'हॅपीनेस फॉर अलोन' या जपानी चित्रपटाची फोटोस्टॅट कॉपीच 'कोशिश' च्या निमित्तानं हिंदी प्रेक्षकांना दिली. अर्थात कधीकधी नक्कल करण्याचा प्रयत्न असला तरी या 'कॉपी'वरही गुलजारच्या बुद्धिमत्तेचे डाग पडले आहेत. त्यामुळे निदान जपानी चित्रपटाचा दिग्दर्शक आपल्या या अनौरस संतानाला मुलगा मानणार नाही, अशी सोयच त्यांनी केली आहे आणि केवळ या जपानी प्रयत्नांवरच न थांबता गुलूभाईंनी त्याहीपुढे मजल मारली व ज्युली अॅन्ड्र्यूजसह गाणाऱ्या व्हॅन ट्रॅप कुटुंबाचा आवाज' परिचय' मध्ये ऐकवला (साउंड ऑफ म्युझिक)! यात सारे के सारे... ला ... दो .. रे ... मी चा प्रतिध्वनी उमटवून तर गुलूभाईंनी कमाल मर्यादासुद्धा ओलांडली. त्यांचा 'अचानक' चित्रपटही 'इनसिडन्ट अॅट औल क्रीक' या लघुपटावर बेतून उगाचच लांबवला आहे. (अर्थात कथा लांबवली आहेच.)

या शर्विलकांचं वाङ्मयचौर्य इतकं विपुल आहे की, त्याची यादी हिंदी चित्रपटाच्या रिळांसारखी लांबणारच आहे. विजय ऊर्फ गोल्डी आनंद हा एक समजदार दिग्दर्शक! त्याने ए. जी. क्रोनीन यांच्या 'मॅग्निफिसंट ऑब्सेशन्' या कादंबरीवर आधारित (अर्थातच उल्लेख टाळून) 'तेरे मेरे सपने' काढला, पण या 'क्षुल्लक' चोरीवर गोल्डी संतुष्ट नव्हता. तो सोन्याच्या मागे लागला आणि तयार झाला, 'मॅकेनाज गोल्ड'वर आधारित देवआनंद व हेमामालिनीचा 'छुपा रुस्तुम'! मग आता 'ज्वेल थीफ' कोण प्रश्नाचे उत्तर सरळच मिळालं.

त्यानंतर 'अ मॅन अॅण्ड द वुमन' या संस्मरणीय प्रेम-हल्ल्यामुळे व शीर्षक-गीतामुळे प्रभावी ठरलेल्या फ्रेंच चित्रपटातील तो नायक, ती नायिका आणि ते मृत प्रेमी साऱ्यांनाच रमेश सिप्पी यानी 'अंदाज'च्या निमित्ताने पुन्हा जिवंत केलं. अर्थात प्रयत्न तितकासा वाईट नसला तरी उचलेगिरीचा तो एक परिपाक होता. 'लिग ऑफ जंटलमेन'चा 'गद्दार' करण्यात आला.

उपहासात्मक विनोदी व्यक्तिरेखा उभी करण्यात हातखंडा असलेल्या जॅक लेमननं बैबऱ्या फिल्मवाल्यांना नेहमीच उचलेगिरी करण्यास प्रवृत्त केलं आहे. हॉलीवुडचा प्रथितयश दिग्दर्शक बिल विल्डरचा 'दि अपार्टमेंट' मधील जॅक लेमननं मुकुल दत्तनामक भुरटया दिग्दर्शकाला मोहित केलं; 'रास्ते का पत्थर' मध्ये त्याचे स्थानिक रूपांतर करण्यात आलं. जॅक लेमनऐवजी इथे अमिताभ जरी होता तरी 'दि अपार्टमेंट' पाहाणाऱ्यांनी निश्चितच दगडफेक करण्याच्या लायकीचाच हा 'रास्ते का पत्थर' होता.

जॅक लेमनप्रमाणेच पिटर ओ' टुल आणि ऑड्री हेपबर्न या अभिनेत्यानीही मुंबईच्या

फिल्मी सरदारांना 'कुर्निसात' करण्यास भाग पाडलं आहे. राज खोसला व पद्मनाभ या दोघा चोरांनी पब्लिकच्या खिशातून पैसे कसे ढापायचे याचे धडे 'ह्याउ टु स्टील मिलियन' मध्ये घेतले आणि 'दो चोर' असं स्वतःच्या कर्तृत्वाला शोभणारं शीर्षक देऊन चित्रपट काढला.

बर्नार्ड शॉच्या 'पिग्मेलियन' ला रेक्स हॅरिसन – ऑड्री हेपबर्नच्या 'माय फेअर लेडी' – नं पुरेपूर न्याय दिला, तर इथं धर्मेंद्र–हेमाच्या 'राजा–जानी' ने या कलाकृतीचं वाटोळं करण्याच्या दिशेनंच पहिलं पाऊल टाकलं. नंतर जितेंद्र–हेमाचा 'हम तो तेरे आशिक हैं' ने आणखीन पुढे वाटचाल केली, तर अमित खन्नाच्या दृश्य न् दृश्य व शब्द न् शब्द असं सहीसही नक्कल केलेल्या 'मनपसंद' नं कमालच केली. यातील इंग्रजी शब्दाला हिंदी शब्द देऊन तयार केलेल्या 'डिक्शनरी ओरिएंटेड' गाण्यांनी अमित खन्नाच्या मेंदूवरील सुरकत्यांची टंचाईच स्पष्ट केली. हेपबर्नची रोमँटिक विनोदिका म्हणून गाजलेली सदाबहार कलाकृती 'रोमन हॉलीडे' ला शशीकपूर–शर्मिलाच्या 'सुहाना सफर' नं भुक्कड प्रतिसाद दिला.

पुन्हा पुन्हा ज्याची आठवण दिली जाते आणि हिंदी चित्रपटावर ज्या चित्रपटाचा जबरदस्त पगडा बसला आहे अशा अमिताभ बच्चनच्या 'जंजीर' या चित्रपटातील 'संतप्त तरुणा' ची प्रतिमा क्लिंट ईस्टवुडच्या 'डर्टी हॅरी' ने पुरविली आहे. 'जंजीर' ची पटकथा लिहिणाऱ्या हिंदीतील सर्वांत महागड्या सलीम–जावेद या पटकथाकारद्वयांचं वैशिष्टच हेच आहे की, ते एकाच 'फोरन फिल्लेम' वर विसंबत नाहीत, तर अनेक 'फोरन फिल्लम' मधील कल्पनांची भुरटी चोरी करून एक सलग, अफलातून अशी जुळवाजुळव करतात. त्यांचे 'शोले,' 'दिवार,' 'इमान धरम' आणि 'काला पत्थर' या चित्रपटांतील सुटे प्रसंग अनेक 'फोरन फिल्लम' मधील प्रसंगांशी हुबेहूब जुळतात. त्यांचा 'शान' हा चित्रपट 'गोल्ड फिंगर,' 'द स्पाय हू लव्हड् मी,' व 'डॉ. नो' या इआन फ्लेमिंगच्या जेम्स बाँड मालिकेतून निवडलेल्या प्रसंगांचंच हिंदी रसायन होतं.

मरियो पुझोच्या कादंबरीवरील फ्रान्सिस फोर्ड कपोलाच्या जगविख्यात 'गॉडफादर' चं हिंदी चित्रपट उद्योगाचे माफिया एफ. सी. मेहरांनी 'खून खून' साठी सरळ सरळ कॉपी केली, तर फिरोझखानने 'इंडियन स्टाइल गॉडफादर' 'धर्मात्मा' मध्ये दृश्यरूपात आणला. मार्लन ब्रॅन्डोच्याऐवजी प्रेमनाथ आणि अल पॅकीनोच्या जागी फिरोझखान होते, हे सांगणेही लज्जास्पद आहे.

रिचर्ड बर्टन व पिटर ओ' टुल यांच्या जबरदस्त अभिनयाने नटलेल्या अप्रतिम 'बेकेट' चा 'इसेन्स' घेऊन निरागसतेचा मुखवटा चढविलेल्या हृषिदांनी 'नमकहराम' बनविला. वसंत कानेटकरांनी याच धर्तीवर 'बेईमान' नाटक बेतलं होतं. काही काळ कोणी कोणाची कल्पना उचलली यावर सिने-नाट्य पाक्षिकांमधून वादही गाजला होता. शेवटी 'ग्रेट मेन थिंक अलाइक' असं निर्वाणीचं वाक्य टाकून हृषिदांनी हा वाद संपुष्टात आणला. 'चोरी प्रथम कोणी केली' अशाच स्वरूपाचा हा वाद होता, हे मात्र शेवटपर्यंत लपवलं गेलं.

अर्थात हृषिदांचं टाळीचं वाक्य हाताला सुरसुरी आणणारं आहे हे निश्चित. कारण इथं मुळातच सच्चेपणा हरवला आहे. ॲलन रेनेचा 'हिरोशिमा मॅन अमोर' आणि विश्वास बेडेकरांची 'रणांगण' कादंबरी यातील कथासूत्र सारखं असूनही त्यातील सच्चेपणामुळं कोणावरही आरोप करण्याची धमक कोणीही दाखविली नाही, हेही सांगायलाच हवं!

'इर्माला दुस' आला आणि गाजला; पण नंतर आमच्या शम्मीकपूरने 'मनोरंजन' ची निर्मिती करून बिली विल्डरला श्रद्धांजलीच वाहिली!

कथा–कल्पना चोरण्याबाबत 'कस्टम' खातं नसल्यामुळे गेल्या काही वर्षात विनधोकपणे नव्या नव्या कल्पनांची 'चोरटी आयात' केली जात आहे. बसल्या बसल्या पैसे


**परमेश्वराचे पण एक घड्याळ असते,**
**जे माणसांच्या चुकांचा हिशोब ठेवते;**
**याचा रावसाहेबांना क्षणिक विसर पडला होता.**
**रावसाहेब मंडलिकांच्या दत्तकाची कथा.**

**माणूस दिवाळी ८१**

**लेखक : वि. ग. कानिटकर**

मिळवण्याच्या अनेक क्लृप्त्या आणि युक्त्या मुबईत शिकवल्या आहेत आणि त्याचंच प्रत्यंतर म्हणून भुरट्या चोरांचं आणि पर्यायाने चोऱ्यांचं प्रमाण वेगाने वाढत आहे.

नुकत्याच झालेल्या काही चोऱ्या म्हणजे 'इन्साफका तराजू' (लिपस्टीक), 'बेरहम' (द अदर साईड ऑफ द मिडनाईड), 'चेहरे पे चेहरा' (डॉ. जेकील अ‍ॅण्ड मि. हाईड), 'चंदा और बिजली' (ऑलिव्हर ट्विस्ट), 'खट्टामिठा', 'हमारे तुम्हारे' (युवर्स, माईन अ‍ॅण्ड अवर्स), 'सुनयना' (लाईम लाईट), 'काला पत्थर', 'बर्निंग ट्रेन' (द टॉवरिंग इन्फर्नो), 'लव्ह स्टोरी' (समर प्लस, फ्रेन्डस), 'रुस्तम' (द चॅम्प), 'बेनाम' (कॅट ओ नाइन टेल्स), 'खोटे सिक्के' (द फाइव्ह मॅन आर्मी) आणि क्रॅमर V/S क्रॅमर या चित्रपटाचे कॉपीराइट बिनमोबदला 'राजश्री फॅक्टरी'ने घेतले आहेत. उलटसुलट हीच कल्पना फिरवून तिथे या चित्रपटाच्या 'नक्कल' ते उत्पादन चालू आहे.

चोरी चित्रपटांच्या कथा–कल्पनापुरतेच मर्यादित नसून विविध तंत्र, सेटस्, मारामारीची दृश्ये, संगीत या क्षेत्रांतही भुरटेगिरीने उच्छाद माडला आहे. इतकंच काय, हिंदी नायक–नायिकांच्या अभिनयामध्ये, केसांच्या ठेवणीमध्ये, वागण्या–वोलण्यात व बाह्यरूपातही भुरट्या चोऱ्या चालूच आहेत! पब्लिकने पकडलेले दोन महान चोर म्हणजे देवआनंद (ग्रेगरी पेक) आणि राजकपूर (चार्ली चॅप्लीन)! तेव्हा चोरट्या संपत्तीवर निर्मिती केलेल्या चित्रपटांच्या कथाही चोरलेल्या आणि हा चित्रपट तयार करणाऱ्यांचा संच (टोळी) ही भुरट्या चोरांचाच! तरीही आपण समर्थन करायचं. 'चोरीचा मामला हळूहळू बोबला'

शेवटी चोरांची राजधानी असलेल्या मुंबईत राजकारणापासून वाङ्मयापर्यंत 'आमच्या घरात चाळीस चोर शिरले! शिरले!... आणि आम्ही त्याना पकडले' चा न संपणारा खेळ चालू आहे, तिथे आपण तरी काय करणार! पायरीवर बसून अंगणात चाललेल्या या खेळाकडे पोक्त आई–बापाप्रमाणे कंटाळा येईस्तोवर बघत बसायचं, दुसरं काय?

—बिलंदर

---


३ मार्च १८८७. मुबई हायकोर्ट.

प्रतिवादी : रखमाबाई. वय बावीस वर्षे.
विवाहित महाराष्ट्रीय मुलगी.

वादी : दादाजी भिकाजी. वय तीस.
रखमाबाईचा पती.

लग्न झाल्यापासून पत्नी म्हणून त्याला तिचा सहवास घडला नव्हता. पतीच्या घरी तिने यावे म्हणून त्याच्यावतीने कायदेशीर नोटीस बजावलेली. ती तयार नव्हती म्हणून ही फिर्याद.

सुमारे १०० वर्षांपूर्वीच्या एका अविस्मरणीय खटल्याची कहाणी.

डॉ. रखमाबाईंच्या आगामी चरित्रातील एक प्रकरण

**मोहिनी वर्दे**

**माणूस दिवाळी ८१**

महानोरामधला कवी जोपासला गावातल्या लोकगीतांनी.
स्वत:ला सपन्न करणाऱ्या या काव्यपरंपरेचा
म्हणूनच महानोरांना शोध घ्यावासा वाटला.
पिढ्या–पिढ्यातून प्रवास करणारे
छोटयाशा पळस खेड्यात झुळझुळणारे
अनाम गीतकारांचे हे काव्य कसे आहे?

**लोकगीतांच्या शोधात एक कवी**

**ना. धों. महानोर यांची मुलाखत**

**माणूस दिवाळी ८१**



प्रभात फिल्म कंपनी
मास्टर विनायक
सांगत्ये ऐका
( हंसा वाडकर आत्मचरित्र )
सत्यजित रे
गुरुदत्त
या चित्रपटपुरवण्या
माणूस दिवाळी अंकांतून
यापूर्वी सादर झाल्या.
यंदा
भारतीय बोलपटसृष्टीचे
सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे होत आहे.
त्यानिमित्त

# अर्धशतकाच्या उंबरठ्यावरील भारतीय बोलपटसृष्टी

हो खास सचित्र व अभ्यासपूर्ण पुरवणी

# माणूस दिवाळी अंक ८१

## यापुढील माणूस अंक

दिवाळी विशेषांक म्हणून नेहमीप्रमाणे प्रसिद्ध होईल

किंमत : रुपये बारा

ANOOS (Marathi Weekly) 100 Paise Regd. No. PNC-W 28
(Licensed to post without preyayment of postage-No. 11)


# नवे प्रकाशन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
आधुनिक भारताचा पुराणपुरुष.
राजकारण, समाजकारण, तत्वज्ञान
आणि साहित्य-कलांचा महानायक.
प्रसिद्ध लेखक बाबुराव बागूल सांगताहेत
या महानायकाचे गोष्टीरूप चरित्र

# आंबेडकर भारत

प्रसिद्धी : ८ ऑक्टोबर ८१ □ किंमत : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.